## खोपटा पुलावर कंटेनर पलटी

**उरण :** खोपटा पुलावर शुक्रवारी (दि.२४) सकाळी आठच्या



सुमारास मालाची वाहतूक करणारा कंटेनर रस्त्याच्या कडेला पलटी झाल्याची घटना घडली. या अपघाच्या वेळी रस्त्यावरुन जाणारे मोटारसायकलस्वार थोडक्यात बचावले. खोपटा-कोप्रोली येथून माल घेऊन जेएनपीए बंदराकडे कंटेनर निघाला होता. खोपटा पुलावरून चढत असताना समोरील मोटारसायकला वाचण्याच्या प्रयत्नात •> पान २ वर

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹

## दरीत कोसळलेल्या जोडप्याचा मृत्यू

**पोलादपूर :** रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील



आंबेनळी घाटातील धोकादायक वळणावर संरक्षक कठड्याला अडकलेली मोटारसायकल आढळल्यानंतर उघडकीस आलेल्या अपघातात ५०० फूट खोल दरीत कोसळलेल्या जोडप्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दोन दिवस चाललेल्या जीवघेण्या रेस्क्यू मोहिमेनंतर दोन्ही मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.ही घटना २३ एप्रिल •> पान २ वर

### आ. महेंद्र दळवींच्या नेतृत्वाला घरचा आहेर

# सत्ताधाऱ्यांचं बंड

**अलिबागच्या राजकारणात खळबळ**

**आठ कोटींच्या निधीवरून संघर्ष पेटला**



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि पंचायत समितीचे सत्ताधारी सदस्य यांच्यातील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आला आहे. आमदारांच्या कार्यपद्धतीला हुकूमशाहीची उपमा देत, अलिबाग पंचायत समितीच्या सभापती भाग्यता पाटील आणि गटनेते प्रकाश पाटील यांच्यासह सर्व सत्ताधारी सदस्यांनी मासिक सभेवर बहिष्कार टाकला. या ऐतिहासिक बंडामुळे अलिबागच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, आमदारांच्या नेतृत्वाला घरचा आहेर मिळाल्याची चर्चा रंगली आहे.**

अलिबाग पंचायत समितीची मासिक सभा शुक्रवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेत १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर झालेल्या सुमारे आठ कोटी रुपयांच्या विकासकामांचा मुद्दा गाजला. प्रशासकीय काळात मंजूर करण्यात आलेल्या कामांना स्थगिती द्यावी, अशी मागणी सभापती भाग्यता पाटील आणि गटनेते प्रकाश पाटील यांनी आक्रमकपणे लावून धरली होती.मात्र, उपस्थित गटविकास अधिकाऱ्यांनी (बीडीओ) तांत्रिक कारणास्तव कामांना स्थगिती देण्यास असमर्थता व्यक्त केली. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे संतप्त झालेल्या सभापती आणि सर्व सदस्यांनी थेट सभेवर बहिष्कार टाकला आणि सभागृहाबाहेर पडण्याचा निर्णय घेतला. कोरमअभावी अखेर ही सभा तहकूब करावी लागली.

दरम्यान, आ. महेंद्र दळवींचा हस्तक्षेप आणि हुकूमशाहीवर सदस्यांनी नाराजी व्यक्त केल्याने शिंदे गटात सर्व काही आलबेल नसल्याचे समोर आलू असून, अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे बोलले जात आहे. पंचायत समिती सदस्यांच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रयत्न झाल्यास आम्ही गप्प बसणार नाही. विकासकामांचा निधी सुचवण्याचा अधिकार हा स्थानिक लोकप्रतिनिधींचा आहे, अशी भावना संतप्त सदस्यांनी व्यक्त केली आहे.

### निधीवाटपावरून आमदारांशी संघर्ष

मिळालेल्या माहितीनुसार, १५ व्या वित्त आयोगाच्या ८ कोटींच्या निधीपैकी आमदारांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्याला केवळ २०-२० लाखांची कामे सुचवण्यास सांगितले होते. उर्वरित मोठ्या निधीवर आमदारांचे नियंत्रण राहणार होते. मात्र, सदस्यांच्या हक्काच्या निधीवर आमदारांचा हा हस्तक्षेप सदस्यांना अमान्य होता. ''आमच्या वाट्याचा निधी आम्हीच ठरवणार,'' अशी भूमिका घेत सदस्यांनी आमदारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली.

### वर्चस्वाला लगाम

**हुकूमशाहीला उत्तर :** आमदारांच्या वर्चस्ववादी भूमिकेला लगाम घालण्यासाठी सर्व सदस्यांनी एकत्र येत बंडाचे निशाण फडकवले.

**प्रशासनाची कोंडी :** गटविकास अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचण सांगितली असली, तरी सदस्यांनी थेट सभात्याग केल्याने प्रशासनाची मोठी अडचण झाली आहे.

**राजकीय परिणाम :** अलिबागमध्ये शिवसेनेच्या (शिंदे गट) अंतर्गत गटात तट पडल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे आमदार महेंद्र दळवींसाठी मोठे आव्हान मानले जात आहे.

# संजय गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आक्रमक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रशांत आंबी यांना अर्वाच्च शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या, आमदार संजय गायकवाड याला अटक करा! या मागणीकरिता गाव, तालुका, जिल्हास्तरावर स्वतंत्रपणे व शक्य त्या ठिकाणी डाव्या पुरोगामी समविचारी पक्ष संघटनांनी एकत्र यावे, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले आहे.



कॉ. गोविंद पानसरे यांनी १९८८ मध्ये लिहिलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड यांना साक्षात्कार झाला आहे. प्रकाशक प्रशांत आंबी यांच्याशी रात्रीच्यावेळी संपर्क साधून त्यांना शिवीगाळ करीत ठार मारण्याची धमकी दिली. कॉ. पानसरे यांच्याबाबतही अपशब्द बोलण्यात आले. शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड यांच्या वक्तव्याने शेतकरी कामगार पक्षासह •> पान २ वर

### गायकवाडांना अटक करा : सुरेश खैरे



स्वराज्य संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची खरी ओळख विशद करणारे 'शिवाजी कोण होता?' हे पुस्तक कॉ. गोविंद पानसरे यांनी ४० वर्षांपूर्वी मराठीत लिहिले असून, आजमितीपर्यंत भारतातील अनेक भाषांत ते भाषांतरित होऊन ते प्रकाशित करण्यात आले आहे. या पुस्तकाच्या लाखो प्रती विकल्या गेल्या आहेत. देशातील दिग्गज विद्वान, अभ्यासक आणि चळवळीतील जाणत्या कार्यकर्त्यांनी हे पुस्तक वाचले, अभ्यासले असून, हे पुस्तक शिवाजी महाराजांची खरी ओळख विशद करते, असा स्पष्ट निर्वाळा देताना ते •> पान २ वर

### व्यक्तीस्वातंत्र्यावर घात : चित्रलेखा पाटील



'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावर शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांच्यावर अर्वाच्च भाषा वापरली आहे. याबाबत शेतकरी कामगार पक्षाकडून निषेध व्यक्त केला जात आहे. लोकशाही व व्यक्ती स्वातंत्र्यावर घात असून, गायकवाड यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली आहे.

**वे|ध|क**

## रायगडात दोन दिवस धोक्याचे

**रायगड :** रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून वातावरणात सतत बदल होत आहे. कधी कडक ऊन, तर कधी ढगाळ वातावरण, तर कधी पावसाची रिपरिप सुरू आहे. पुढील दोन दिवस जिल्ह्यामध्ये धोक्याचे असून, भारतीय हवामान खात्याने यलो अलर्टचा इशारा दिला आहे. या कालावधीत तापमानात प्रचंड वाढ होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी विनाकारण उन्हामध्ये फिरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कडक उन्हामुळे बाहेर पडणे नकोसे होत आहे. डोळ्यांना त्रास होण्याबरोबरच डोकेदुखीदेखील वाढत आहे. या उन्हापासून बचाव करण्यासाठी •> पान २ वर

# विचुंबे घोटाळा झाकण्यासाठी धडपड?

- **चौकशी अधिकाऱ्यांची 'रातोरात' बदली**
- **आ. ठाकूर, आ. बादलींवर दबावाचे गंभीर आरोप**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

विचुंबे ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार प्रकरण आता धुमसत्या राजकीय वादळात अडकले असून, चौकशी प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रकरणात तक्रारदार असलेले पुरुषोत्तम भोईर यांनी भाजपा आमदार महेश बालदी आणि प्रशांत ठाकूर यांच्यावर अधिकाऱ्यांवर थेट दबाव टाकल्याचा स्फोटक आरोप करत या प्रकरणाला राजकीय रंग चढवला आहे.

भोईर यांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी सुरुवातीला पेण पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मार्च २०२६ मध्ये गजानन लेंडी यांच्याकडे ही चौकशी सोपवण्यात आली होती. मात्र, अवघ्या एका महिन्यातच ही नियुक्ती रद्द करून उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांच्याकडे चौकशी वर्ग करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी हा आदेश दिला असला, तरी या 'रातोरात' बदलामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा संशय अधिक गडद होत आहे. ''ग्रामसेवक आणि सरपंचांकडून झालेल्या कथित भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी होऊ नये म्हणूनच अधिकारी बदलण्यात आले,'' असा घणाघाती आरोप भोईर यांनी केला आहे.

दरम्यान, या प्रकरणात ग्रामपंचायतीच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. शालेय पोषण आहार, स्ट्रीट लाईट तसेच गटार दुरुस्तीसाठी बनावट बिल, जाहिरातीसाठी खर्च तसेच वाहनासाठी •> पान २ वर

### चौकशी की 'मॅनेजमेंट'?

विचुंबे ग्रामपंचायतीतील कथित घोटाळ्यात दीड कोटी रुपयांहून अधिक अनियमिततेचा संशय व्यक्त होत असताना, चौकशी अधिकाऱ्यांची अचानक बदली हीच या प्रकरणातील सर्वात मोठी 'ट्विस्ट' ठरत आहे. पेणचे गटविकास अधिकारी हटवून उरणच्या अधिकाऱ्यांकडे चौकशी सोपवण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय आहे की त्यामागे राजकीय 'मॅनेजमेंट' दडले आहे, याबाबत आता उघडपणे चर्चा सुरू झाली आहे. जनतेतून ''चौकशी खरंच होणार की प्रकरण दडपलं जाणार?'' असा संतप्त सवाल विचारला जात असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

या स्फोटक आरोपांनंतर प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, दबावाला झुकते की निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सभापतीपदी अनंत पाटील बिनविरोध



(छायाचित्र : अमोल नाईक)

- **अलिबाग कृषी उत्पन्न बाजार समितीची निवड**
- **चित्रलेखा पाटील, सुरेश खैरे यांच्याकडून अभिनंदन**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते अनंत हिराजी पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शुक्रवारी (दि.२३) ही निवड प्रक्रिया बाजार समितीच्या कार्यालयातील सभागृहात पार पडली. सभापतीपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने सभापती म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे प्राधिकृत अधिकारी यांनी जाहीर केले.शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्याकडून अनंत पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, अशोक म्हात्रे, स्वप्नील पाटील, अनंत पाटील, संजय पाटील, यशवंत भगत, सलीम तांडेल, संध्या पाटील, अशुप्रिता वेळे, गजानन झोरे, अमिताभ भगत, •> पान २ वर

## तरुणीचा बळी घेणारा मोकाटच!

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील लोणेरेमध्ये एका तरुणीवर अत्याचार करून तिचा बळी घेतल्याची धक्कादायक घटना घडली. ही घटना घडून तीन दिवस उलटून गेले तरी मारेकरी मोकाटच आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यात नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. मारेकऱ्याला तात्काळ अटक करण्यासाठी माणगावमध्ये बंद पाळण्याच्या पावित्र्यात नागरिक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पोलीस काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिस मोहम्मद खान मालदार असे या आरोपीचे नाव आहे. मयत तरुणी ही माणगाव तालुक्यातील •> पान २ वर

# साळाव ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण अहवाल गहाळ

- **हिशोब लपविण्यासाठी कागद गायब**
- **भ्रष्टाचाराच्या संशयावरून फौजदारी कारवाईची मागणी**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीच्या दप्तरातील सन २००४-०५ आणि २००५-०६ या दोन आर्थिक वर्षांचे शासकीय लेखापरीक्षण अहवाल जाणीवपूर्वक गहाळ किंवा नष्ट केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शंकर नागोठणेकर यांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित तत्कालीन ग्रामसेवक आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी रेवदंडा पोलीस ठाणे आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे.

नागोठणेकर यांनी माहिती अधिकारांतर्गत साळाव ग्राम पंचायतीकडे मागील १५ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल आणि ग्रामसभेचे ठराव मागितले होते. मात्र, ग्रामपंचायत कार्यालयाने सन २००४-०५ आणि २००५-०६ या वर्षांचे अहवाल दप्तरी उपलब्ध नसल्याचे लेखी कळवले. विशेष म्हणजे, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, रायगड यांच्याकडेही या दोन वर्षांच्या अहवालांची नस्ती उपलब्ध नसल्याचे •> पान २ वर

### अधिकारी अडचणीत?

याप्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक दिलीप महादेव तुरे आणि जगन्नाथ चांगू चवरकर तसेच जनमाहिती अधिकारी वि.सु. फासे (स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय) हे अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### दोषींवर कारवाईची मागणी

हे अहवाल महत्त्वाचे सार्वजनिक दस्तऐवज असून, त्यांचे जतन करणे ही ग्रामसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांची कायदेशीर जबाबदारी आहे. नागोठणेकर यांनी तत्कालीन ग्रामसेवक दिलीप महादेव तुरे आणि जगन्नाथ चांगू चवरकर, तसेच जनमाहिती अधिकारी वि.सु. फासे यांच्यावर जबाबदारी निश्चित करून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी रेवदंडा पोलीस ठाणे आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली आहे.

## महिना उलटला, आरोपी अजूनही फरार

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बोरगाव येथील सेलिब्रेशन रिसॉर्टमधील कुंटणखाना प्रकरणाला आज एक महिना पूर्ण झाला असला तरी यातील चार आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. मात्र, आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर कायम आहे.

या प्रकरणातील आरोपी गणेश गायकर आणि गणेश अण्णा यांनी मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, तिसरा आरोपी सुनील मेहता याचे •> पान २ वर

## आम आदमी पक्षात मोठी फूट

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षात (आप) फूट पडली आहे. आपचे खासदार राघव चड्ढा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राघव चड्ढा यांच्यासह खासदार संदीप पाठक आणि खासदार अशोक मित्तल यांनीदेखील भाजपात प्रवेश केला आहे. संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासोबत पत्रकार परिषदेला संबोधित करताना खासदार राघव चड्ढा यांनी सांगितलं की, ''राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे दोन-तृतीयांश सदस्य म्हणून आम्ही भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे.


**राजा हंबीररावांच्या नावाचा उल्लेख | नांदगावामध्ये सापडला दुर्मिळ शिलालेख**

# चौदाव्या शतकातील ऐतिहासिक ठेवा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे चौदाव्या शतकातील राजा हंबीरराव यांचा दुर्मिळ शिलालेख आढळून आला आहे. इतिहास अभ्यासक अनिकेत अशोक पाटील यांनी या शिलालेखाचे वाचन करत त्यातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक माहिती उजेडात आणली आहे.

मुरुड येथील भवानी पाखाडी परिसरात जनार्दन चोरघे यांच्या नारळ-सुपारीच्या वाडीत हा शिलालेख सापडला. विशेष म्हणजे, सुमारे २००० साली विहिरीतील गाळ काढताना ही शिळा प्रथम आढळली होती.



मात्र, अनेक वर्षे दुर्लक्षित राहिल्यानंतर आता तिचे ऐतिहासिक महत्त्व समोर आले आहे. शिलालेखाची लांबी सुमारे ५६ इंच आणि रुंदी २३ इंच असून, तो सध्या चांगल्या स्थितीत आहे. हा शिलालेख ''गधेगळ'' प्रकारातील असून, त्यामध्ये वरच्या भागात चंद्र-सूर्य व मंगल कलश, मध्यभागी २३ ओळींचा लेख आणि खालच्या भागात शिल्पांकन आहे.या शिलालेखात हिजरी सन ७६९, शके १२८९ (इ.स. १३६७-६८) •> पान २ वर

### शिलालेखाची वैशिष्ट्ये

**कालखंड :** इ.स. १३६७-६८

**लिपी :** देवनागरी (फारसी शब्दांचा वापर)

**प्रकार :** गधेगळ शिलालेख

**लांबी :** ५६ इंच

**रुंदी :** २३ इंच

**ओळी :** २३

**स्थान :** नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड

> हा शिलालेख राजा हंबीरराव यांच्या संदर्भातील पाचवा महत्त्वाचा पुरावा आहे. याचा सखोल अभ्यास केल्यास कोकणातील मध्ययुगीन इतिहासावर अधिक प्रकाश पडू शकतो.
>
> – अनिकेत अशोक पाटील, इतिहास अभ्यासक

महानगर गॅस

₹0 आगाऊ शुल्क

नवीन घरगुती पीएनजी ग्राहकांसाठी

पीएनजी रजिस्ट्रेशन कॅंपला भेट द्या आणि लगेच रजिस्टर करा!

दिनांक: रविवार, 26 एप्रिल 2026 | वेळ: सकाळी 9 ते रात्री 9 | स्थळ: दि. बा. पाटील शाळा, आगरी समाज मंदिर जवळ, जुने पनवेल, पनवेल - 410206

सूचना: डायरेक्ट मार्केटिंग एजन्सी/प्लंबर/सेल्समन/टेक्निशियन यांना कोणतेही शुल्क द्यायचे नाही.

*सर्व लागू शुल्क रजिस्ट्रेशन आणि पीएनजी मीटर इन्स्टॉलेशन नंतरच्या पहिल्या बिलात देय होईल.

सोबत मिळवा

₹500 किंमतीचा गॅस मोफत!

*अटी लागू.



आजच रजिस्टर करा

गॅसीफाईड बिल्डिंगसाठी

ज्या बिल्डिंगमध्ये आधीपासूनच कोणी ना कोणी पीएनजी वापरत आहे अशी बिल्डिंग.

खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा, आणि पीएनजी रजिस्ट्रेशन करा. एमजीएल वेबसाईटवरून पेमेंट करा.

नॉन-गॅसीफाईड बिल्डिंगसाठी

जिथे कोणीही पीएनजी वापरत नाही अशी बिल्डिंग

Call Us: (022) 6867 4500

WhatsApp : 9899203843 वर MGLPNG असा संदेश पाठवा

किंवा

आपल्या जवळचे वॉक-इन सेंटर शोधण्यासाठी स्कॅन करा.

अन्य माहितीकरिता आम्हाला support@mahanagargas.com वर लिहा.

**पान १ वरून**

## दरीत कोसळलेल्या जोडप्याचा मृत्यू

रोजी सायंकाळी उघडकीस आली. प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमचे सदस्य अमित जाधव यांना कुंभरोशी (ता. महाबळेश्वर) परिसरात संशयास्पद अवस्थेत स्प्लेंडर मोटारसायकल दिसली. मोटारसायकल कठड्यात अडकलेली असल्याने अपघाताचा संशय बळावला. तात्काळ सहकाऱ्यांना माहिती देत शोधमोहीम सुरू करण्यात आली. रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांनी दोरांच्या सहाय्याने दरीत उतरून अतिशय कठीण परिस्थितीत शोधकार्य सुरू केले. अंधार, दाट धुके, निसरडे उतार आणि सुरू झालेला पाऊस यामुळे मोहीम अत्यंत आव्हानात्मक ठरली. रात्री दीड वाजेपर्यंत सुरू असलेल्या प्रयत्नांनंतर प्रथम एका पुरुषाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.प्रतिकूल हवामानामुळे मोहीम थांबवावी लागली. मात्र २४ एप्रिल रोजी सकाळी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले. सुमारे तीन तासांच्या प्रयत्नांनंतर महिलेचा मृतदेहही दरीतून बाहेर काढण्यात आला आणि रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण झाले. या अपघातात मृतांची ओळख मोहन चव्हाण (५५) आणि जयश्री चव्हाण (४८, रा. सोनगिरवाडी, जि. सातारा) अशी पटली आहे. या मोहिमेत प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम व महाबळेश्वर ट्रेकर्सच्या सदस्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच पोलादपूर व महाबळेश्वर पोलीस, स्थानिक प्रशासन व युवकांनीही सहकार्य केले.

## संजय गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध

वेगवेगळ्या संस्था, संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. याबाबत शेतकरी कामगार पक्षाकडून निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे प्रकाशक प्रकाश आंबी यांना शिंदे गटातील आमदार प्रशांत गायकवाड यांनी अर्वाच्च भाषेत शिवीगाळी केली. आमदार असून घरात घुसून चिरडून टाकू, अशी जीवेठार मारण्याची धमकी दिली. गायकवाड यांच्या वक्तव्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून, गायकवाड यांच्याविरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीदेखील गृह विभागाकडे केली आहे. गायकवाड यांच्या गुंडगिरीची सर्व स्तरातून निषेध व्यक्त केला जात आहे. प्रशांत आंबी यांना अर्वाच्च शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या, आमदार संजय गायकवाड याला अटक करा या मागणीकरिता गाव, तालुका, जिल्हास्तरावर स्वतंत्रपणे व शक्य त्या ठिकाणी डाव्या पुरोगामी समविचारी पक्ष संघटनांना सोबत घेऊन निषेध करा, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले आहे.

### गायकवाडांना अटक करा : सुरेश खैरे

सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे, अशी शिफारस केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त दिवंगत न्यायाधीश पी.बी. सावंत यांची पत्ररूपी प्रतिक्रिया तर या पुस्तकाच्या सुरुवातीलाच प्रसिद्ध केली आहे. सदरचे पुस्तक न वाचता केवळ त्याचे शीर्षक पाहून पुस्तकाचे कोल्हापूरस्थित कार्यकर्ते प्रकाशक प्रशांत आंबी यांना आ. गायकवाड याने, आई–बहिणींचा उद्धार करणारी अर्वाच्च शिवीगाळ केली, जीवे मारण्याची धमकी दिली, ही बाब अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह असून, आमदार संजय गायकवाड याच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून, अटक करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने करण्यात येत असल्याचे शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी सांगितले.

## सभापतीपदी अनंत पाटील बिनविरोध

भास्कर भोपी, मुकेश नाईक, अर्चना हंबीर, सुभाष वागळे, प्रतिक पाटील, खलील तांडेल, सुडकोलीमधील शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था रायगड यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समितीच्या कार्यालयातील सभागृहात सभापतीपदाच्या निवडीसाठी शुक्रवारी (दि.२४) सकाळी सदस्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत सभापतीपदासाठी अनंत पाटील यांनी अर्ज दाखल केला. या पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाला. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली. अनंत पाटील यांच्या निवडीनंतर कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा करण्यात आला. अनंत पाटील हे अलिबाग तालुक्यातील सुडकोली येथील रहिवासी आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांनी वेगवेगळ्या संस्थेत काम केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कायमच त्यांनी आवाज उठविला आहे. अनंत पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

## खोपटा पुलावर कंटेनर पलटी

डावीकडे ओढल्याने सदर कंटेनर जागेवर पलटी झाला. या अपघातात मोटारसायकलस्वार थोडक्यात बचावले. मात्र, अपघात झाल्याने उरण, जेएनपीएकडे जाणारी वाहतूक बंद झाली होती. हा अपघात सकाळी घडला. वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला.

## विचुंबे घोटाळा झाकण्यासाठी धडपड?

डिझेल खरेदीपासून पेस्ट कंट्रोलसारख्या कामांपर्यंत आणि नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदाराला कामाचं टेंडर काढून लाखो रुपयांची उधळपट्टी झाल्याचा संशय व्यक्त होत असून, एकूणच दीड कोटी रुपयांहून अधिक रकमेतील गैरव्यवहाराचा मुद्दा पुढे आला आहे. प्राथमिक चौकशीत काही अनियमिततेची दखल घेण्यात आल्याची माहिती समोर येत असल्यानेच या संपूर्ण प्रकरणाभोवती संशयाचे ढग अधिकच गडद झाले आहेत.

या घडामोडींमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, चौकशी अधिकाऱ्यांची अचानक बदली का करण्यात आली, यामागे नेमका कोणाचा दबाव होता, दोषींना वाचवण्याचा प्रयत्न तर केला जात नाही ना, असे थेट सवाल उपस्थित केले जात आहेत. पनवेल आणि उरण परिसरात या प्रकरणामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडण्याची चिन्हे दिसत आहेत.

## ... लेखापरीक्षण अहवाल गहाळ

समोर आले आहे.याप्रकरणी तातडीने गुन्हा नोंदवण्यात आला नाही, तर पोलीस अधीक्षक आणि न्यायालयात दाद मागण्याचा इशारा नागोठणेकर यांनी दिला आहे. या प्रकारामुळे साळाव ग्रामपंचायतीचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. आता प्रशासन नेमकी काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**कोट्यवधींचा हिशोब हवेत?**

सदर कालावधीत ग्रामनिधी व विविध योजनांतील खर्चाचा तपशील याच लेखापरीक्षण अहवालांमध्ये असतो. तेच गायब झाल्याने त्या काळातील आर्थिक व्यवहारांवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात आर्थिक अनियमितता, निधी अपहार किंवा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कायदेशीर तरतूद**

तक्रारीत मुंबई उच्च न्यायालयाच्या 'विवेक कुलकर्णी विरुद्ध महाराष्ट्र राज्य' या निर्णयाचा संदर्भ देण्यात आला असून, 'अभिलेख उपलब्ध नाहीत' हे कारण ग्राह्य धरले जाऊ शकत नाही, असे नमूद केले आहे. तसेच, महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ च्या कलम ७ व ९ नुसार, अभिलेख जतन न करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे.

## चौदाव्या शतकातील ऐतिहासिक ठेवा

अशी कालनोंद आढळते. लेख देवनागरी लिपीत असून, त्यात फारसी शब्दांचाही वापर दिसतो, यावरून त्या काळातील भाषेवर मुस्लिम प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.शिलालेखात ''नांदिगौ'' (नांदगाव), ''मरुड'' (मुरुड) आणि ''चेउळ'' (चौल) या गावांचा उल्लेख आहे. तसेच राजा हंबीरराव यांना ''श्रीमत्य प्रौढिप्रताप चक्रवर्ती महाराजाधिराज'' अशी उपाधी दिलेली आहे. या लेखानुसार, हंबीरराव यांचे प्रधान 'सिहीप्रो' यांनी नांदगावातील एक वाडी ४०० द्राम किमतीत घेऊन राम जोशी, कृष्ण जोशी आणि कुम जोशी यांना दान स्वरूपात वाटून दिल्याचा उल्लेख आहे.

ही बातमी ''Journal of Research and Development'' या संशोधनपर मासिकात प्रकाशित झाली असून, या शिलालेखाचा पुढील अभ्यास होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

## महिना उलटला, आरोपी अजूनही फरार

लोकेशन उत्तर प्रदेशात आढळत असून, चौथा आरोपी राजू मंडल याचा ठावठिकाणा पश्चिम बंगालमध्ये असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. तसेच गणेश अण्णा हा बंगळुरुमध्ये असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. गणेश गायकर याने सर्व मोबाईल बंद केल्यामुळे त्याचा ठावठिकाणा अद्याप लागत नसल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, म्हाडा वसाहत येथील त्याच्या घरावर पोलीस लक्ष ठेवून आहेत. हे आरोपी वेगवेगळ्या राज्यांत लपून बसल्याने त्यांना पकडणे अधिक कठीण झाले आहे. या चारही आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांनी वेगवेगळ्या पथकांची स्थापना केली असून, त्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

## रायगडात दोन दिवस धोक्याचे

मफलर, टोपीसह गॉगलचा वापर केला जात आहे. काही ठिकाणी नागरिक शीतपेय, नारळ पाणी घेऊन शरीरात गारवा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मागील चार दिवसांपूर्वी जिल्हयातील अलिबागसह पनवेल, दक्षिण रायगडमध्ये अवकाळी पाऊस पडला. हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिक सुखावून गेले होते. त्यानंतर तापमानात प्रचंड वाढ होऊ लागली आहे. जिल्ह्यामध्ये २६ एप्रिलपर्यंत यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. आहे.

## तरुणीचा बळी घेणारा मोकाटच!

गोरेगाव परिसरात एका गरीब कुटुंबांतील होती. लोणेरे येथील ओमकार लॉजमधील कामगार सोमवारी (दि. २०) सकाळी खोली साफ करण्यासाठी आला. त्यावेळी त्या खोलीमध्ये तिचा मृतदेह सापडला. या घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मुलीची ओळख पटवून घेतल्यावर तिच्यासोबत कोण होता, याचा तपास सुरु केला. अनिस मोहम्मद खान मालदार याने या लॉजमधील खोलीमध्ये रविवारी (दि.१९) ते सोमवारी (दि.२०) दरम्यान तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर हात व पाय रस्सीने बांधून तिच्या डोक्यात व हाताच्या मनगटावर कोयत्याने वार करून ठार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. मारेकऱ्याला तात्काळ अटक करा, ही भूमिका नागरिकांनी घेतली. या घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेसह स्थानिक पोलिसांच्या मदतीने मारेकऱ्याचा शोध सुरु आहे.

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि.रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ.वर्षा राजेश ओसवाल यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ११७ | १/ब | ०.३२.१० | ०.५६ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
सही/-
**अ‍ॅड. कैलास अनंत बासरे**
१०३. पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड.मो.नं. ७७९८४३३८८८

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत :-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| मौजे धामोते | ९३ | ११ | ४-२५-०० | ४२-५० | ९३ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१.
सही / -
**अ‍ॅड. निलेश दामू मुंढे**
दिनांक :-२५/०४/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे वरसोली, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली | १६६/१९०/१९६/१९७/१९८/३२ | ४.५०.०० | ४५.०० |

तसेच वर नमुद मिळकतींवर बांधण्यात आलेल्या घर मिळकती खालील परिशिष्टांप्रमाणे

| मौजे | मालमत्ता क्रमांक | क्षेत्र (चौ.फुट) | मिळकतीचे स्वरूप | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| | १७५७ अ१ | ७८४ | विट सिमेंट बांधकाम पत्रा छप्पर उत्तरेकडील भाग | श्री. सुबोध रमेश पडवळ |
| ग्रामपंचायत वरसोली, ता. अलिबाग | १७५७ क, | ३९२ | दगड विटा सिमेंट बांधकाम स्लॅब छप्पर तळमजला | सौ. वृषाली अमोल शिवलकर |
| | १७५७ क १ | ३७१ | विटा सिमेंट बांधकाम पत्रा छप्पर | सौ. वृषाली अमोल शिवलकर |
| | १७५७ ड | ३९२ | दगड विटा सिमेंट बांधकाम स्लॅब छप्पर तळमजला | श्री. अभय रमेश पडवळ |
| | १७५७ इ | ३७७ | दगड विटा सिमेंट बांधकाम स्लॅब छप्पर तळमजला | श्री. अभय रमेश पडवळ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी

कळावे,
अलिबाग,
दिनांक- २४/०४/२०२६
सही/-
**अ‍ॅड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर,**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता -मु. लोणारे, पो. थळ,ता. अलिबाग, जि. रायगड
पिन नं. ४०२२०७ मो. नं. ७७१९९०७२६१

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक विक्रांत प्रकाश गुंजाळ यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २४४/१ | ०-४९-७० | १४.७५ |

सदर मिळकतीपैकी विक्रांत प्रकाश गुंजाळ यांचे मालकीचे ००-०९-०० हे.आर. इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २५/४/२०२६
**अ‍ॅड. रविंद्र विनायक ओक**
'गुरूकृपा',अलिबाग अर्बन बॅंके
शेजारी, ता.अलिबाग, जि.रायगड.

---

अर्जदारातर्फे वकील एम.पी.वेंगुर्लेकर.

**अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयांत**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.४८/२०२६
निशाणी क्र. ०७/ड

श्री. गुरूनाथ सिताराम पाटील वगैरे ..अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.बाबीबाई अनंत म्हात्रे वगैरे सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र. १ ते १० व १४ आणि सामनेवाला क्र. २ यांचे मामा व अर्जदार क्र. १५ व सामनेवाला क्र.१ यांचा सख्या भाऊ तसेच अर्जदार क्र. ११ ते १३ आणि सामनेवाला क्र. ४ व ५ चे मामा आजोबा व सामनेवाला क्र.३ चे पणजोबा कै. बाबु कावळया पाटील हे दिनांक ०५/०८/२०१२ रोजी रांजणखार डावली,ता.अलिबाग,जि.रायगड येथे त्यांच्या पूर्वीच्या राहत्या घरी आजारपणाने मयत झालेले आहेत व त्यांच्या नावे असलेले मौजे कावाडे, ता.अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २७७ या शेत जमीन मिळकतीचा येथील जमीन मिळकत ही अर्जदारांच्या नावे होण्याकामी, तसेच त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हे त्यांचे एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ VIII अन्वये मा.न्यायालयाकडे दि.१८/०३/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करावयाची असल्यास अशा लोकांनी दि. ०४/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हया न्यायालयात स्वतः वा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि.०४/०५/२०२६ रोजी वा तत्पूर्वी सदर वारस दाखला देणेबाबतच्या अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास सदरील अर्जदाराला आवश्यक तो वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. २० माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| सही/- | सही/- |
|---|---|
| **लिपिक** | **अधिक्षक** |
| **दिवाणी न्यायालय व स्तर** | **दिवाणी न्यायालय व स्तर** |
| **अलिबाग-रायगड** | **अलिबाग-रायगड** |

---

### मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्र. :- केजेटी/एचएसजी (टीसी)/४३६४/२०१९-२०२०/२०२०
पत्ता:- सर्व्हे नं. २/२ अ/प्लॉट क्र. १ ते ४ मौजे मुद्रे (बु.) ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१,

जा.क्र.MK5/०५/२६-२७
दिनांक : २४/०४/२०२६

**निविदा सूचना**

मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सर्व्हे नं. २/२ अ/प्लॉट क्र. १ ते ४ मौजे मुद्रे (बु.)ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१, कन्व्हेयन्स डीड सेवांसाठी अनुभवी कंपन्यांकडून कोटेशन मागवत आहे.
संस्थेची माहिती :
रजिस्टर नंबर : केजेटी/एचएसजी/(टीसी)/४३६४/२०१९-२०२०/२०२०
सभासद संख्या : २१०
संपर्क क्रमांक: ७३८७७२४९०४/९७६५४०५५३३
इच्छुक पक्षांनी सीलबंद कोटेशन दिनांक: ११/०५/२०२६
वेळ: संध्याकाळी ६.०० पर्यंत सादर करावेत:
१. कामाची व्याप्ती आणि कार्यपद्धती
२. तपशीलवार फी आणि कर
३. कामाकरिता लागणार कालावधी
४. संबंधित अनुभव आणि प्रमाणपत्रे
५. पॅन आणि जीएसटी तपशील
कोटेशन पत्ता: सचिव, मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नं. २/२ अ/प्लॉट क्र.१ ते ४ मौजे मुद्रे (बु.)ता. कर्जत, जि. रायगड, पिन -४१०२०१
कोटेशन स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समिती राखून ठेवते.
अंतिम तारीख: दिनांक: ११/०५/२०२६ वेळ: संध्याकाळी ६.०० पर्यंत

**मार्वल क्षिप्रा रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
सही/-
**अध्यक्ष** **खजिनदार** **सचिव**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे आशिलाने विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे-आमणोरी, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १)श्री.आशुतोष लक्ष्मण साठे | १४/१ | ०.३२.०० | ०.०६ |
| २) श्री. गणेश लक्ष्मण कानडे | १४/६ | ०.८६.०० | ०.१९ |
| ३) श्री. संदेश मनोहर कुंभार | १४/७/ब | १.५०.०० | ०.४१ |
| ४) श्री. मकरंद मोरेश्वर मोधे | १४/८ | ०.१०.०० | ०.०३ |
| | १४/९ | ०.२३.०० | ०.०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोजा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- २५/०४/२०२६

खरेदीदारांचे वकील,
**अ‍ॅड. सौ. मिनल निलेश मनोहर**
बी. कॉम. एल.एल.एम.एससी. (ईएनव्ही)
डी.सी.एल. अ‍ॅडव्हकेट अ‍ॅन्ड नोटरी
मधुबन मु. रोट, ता. रोहा, जि. रायगड.
मो. ९२७१५३३५६७/९१३०९३३५६७

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक सुरेश गजानन पाटील, वनिता हरिभाऊ म्हात्रे, मिनल मधूकर कवळे, महिंद्र अशोक म्हात्रे, आर्या अभिजीत पाटील, दक्षता दत्तात्रेय पाटील, प्रियदर्शनी दत्तात्रेय पाटील, प्रियंका दत्तात्रेय पाटील, मंदा रमेश पाटील, अमर रमेश पाटील, दिपा प्रदीप गुंजाळ, छाया विकास म्हात्रे व मृदूला मिलिंद मगर यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २४२/१ | ०-३०-३० | ९.०६ |
| २४०/३ | ००-१९-०० | ५.५६ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २५/४/२०२६
अ‍ॅड. रविंद्र विनायक ओक 'गुरूकृपा',
अलिबाग अर्बन बॅंके शेजारी, ता.
अलिबाग, जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. फहिम लियाकत खान यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| अब्दुल रेहमान एच. एच. वडगामा | १३१/२ | खाता क्र. ४३७ मधील विकत देणार यांचे मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र ००-५७-०० हे.आर. | ०-२५ |
| | १३१/३ | खाता क्र. ४३७ मधील विकत देणार यांचे मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र ००-१८-३० हे.आर. | २-२५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस (२१) दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २४/०४/२०२६
**अ‍ॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

---

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे**
**आवारात, अलिबाग- ४०२२०१**

दुरध्वनी क्र.०२१४१२२२४२८, Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.१३१/२०२५/ता. सुधागड/जि. रायगड/२०२६/३६०
अलिबाग दिनांक २१/०४/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री. उत्तम नारायण देशमुख
रा. मु. आवंढे, पो. खांडपोली, अपिलदार
ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
विरूद्ध
१. श्री. महेश राजाराम देशमुख जाबदार
२. श्री. विनोद राजाराम देशमुख
३. श्री. सत्यजित नितीन गावंड
४. श्री. मैनाथ नरसिंह शैणाय
५. सौ. दिपा मैनाथ शैणाय
६. श्री. जिक्कू कोशी बाबू
७. श्री. हेमंत गणेश तडवळकर
८. श्री. गोपिचंद चिमन देशमुख
नं. १ ते ८ रा. आवंढे, पो. खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड
९. श्री. प्रमोद नरसिंह अणावकर
१०. श्री. वृषाली प्रमोद अणावकर
नं. ९ व १० रा. रूम नं. २०५, २०६, बिल्डींग नं. बी. २, रौनक पार्क को. ऑप. हौ. सोसायटी, एलटीडी पोखरण रोड, ठाणे, पश्चिम ४००६१०
११. श्री. आबासाहेब वसंत देशमुख
१२. श्री जगदिश वसंत देशमुख
१३. ज्योती विनायक अधिकारी
१४. शिला वसंत देशमुख
नं. ११ ते १४ रा. आवंढे, पो. खांडपोली, ता.सुधागड, जि.रायगड
१५. सुगंधा वसंत देशमुख (मयत) तर्फे वारस
श्री. विवेक दत्तात्रेय घारे
रा. प्लॉट नं. ३७, सर्व्हे नं. १९/अे/८ब/हिंगणे होम कॉलनी,
कर्वेनगर, पुणे ४११०५२
१६. नंदा वसंत देशमुख
रा. आवंढे, पो. सुधागड, जि. रायगड,
१७. सुलेखा वसंत देशमुख (मयत)
तर्फे वारस रेपॉडंट क्र. ११ ते १६
१८. श्री. शांताराम दगडूजी देशमुख (मयत)तर्फे
श्री. प्रमोद शांताराम देशमुख
रा. आवंढे, पो. खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड
१९. श्री. भाऊ पांडूरंग देशमुख
२०. श्री. श्रीपत दगडू देशमुख
नं. १९ व २० रा. आवंढे, पो. खांडपोली, ता. सुधागड, जि.रायगड
२१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, सुधागड-पाली
ता. सुधागड, जि. रायगड

विषय :- मौजे आवंढे, ता. सुधागड, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८३ (जुना स.नं. १३३) या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार श्री. उत्तम नारायण देशमुख यांचा दि. ११/०८/२०२५ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. १३१/२०२५/जा.क्र. १३२ दि. १०/०२/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख ०३.०२.२०२३, १०.०२.२०२६, १७.०२.२०२६, २३.०२.२०२६, १०.०३.२०२६, २४.०३.२०२६, ०७.०४.२०२६ व २१.०४.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख ०५/०५/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/०४/२०२६
सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग.**

# निवडक



## कशेळेत डांबरीकरणाला सुरूवात

**नेरळ :** कर्जत कशेळे मुरबाड रस्त्यावरील पडलेले खड्डे भरून डांबरीकरणास सुरुवात झाली आहे. कशेळे गावातील व्यापारी आणि स्थानिक रहिवाशी यांनी यासाठी मुंबईपर्यंत जाऊन पाठपुरावा केला होता. कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या शहापूर मुरबाड कर्जत खोपोली. या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वरील कशेळे भागातील रस्त्याचे काँक्रीटीकरण झालेले नाही. त्या ठिकाणी रस्ता डांबरी असून काँक्रीटीकरण करण्यात आले नसल्याने येथील रस्ता खड्ड्यात हरवला होता. रस्ता खड्डेमय झाल्याने त्या ठिकाणी असलेले दुकानदार आणि स्थानिक यांना धुळीच्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.हे लक्षात घेऊन ग्रामस्थ आणि व्यापारी यांनी मुंबई येथे राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे जाऊन आपल्या भागातील त्याचे काम करण्याची मागणी लावून धरली होती. ही बाब लक्षात घेऊन कर्जत कशेळे मुरबाड रस्त्यावर अनेक महिन्यांपासून मोठ-मोठे खडे पडले होते. त्यामुळे अनेक वाहनांचा अपघात होत होते. हे अपघात थांबावा यासाठी कशाला येथील ग्रामस्थांनी अर्ज करून मागणी करण्यात आली होती. अखेर राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून ग्रामस्थांचे मागणीला यश आले असून खराब रस्त्यावर डांबरीकरणाला सुरुवात झाली आहे. कशेळे बाजारपेठ येथील डांबरीकरण करण्यात येत असून सुगवे येथील खड्डे देखील भरले जात आहेत.

## आंबोट गौळवाडी रस्त्याचे डांबरीकरण

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील आंबोट गौळवाडी रस्त्यासाठी पोलीस मित्र संघटना यांनी उपोषण करून पाठिंबा दिला होता.या आंदोलनाची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने आंबोट गौळवाडी या रस्त्याचे डांबरीकरण सुरू झाले असल्याचे दिसून आले. दरम्यान ग्रामस्थ मनेश मसणे यांनी पोलिस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांच्या सोबत उपोषण केले होते. आंबोट गौळवाडी रस्ता गेली २५ वर्षे प्रलंबित होता.रस्त्यावर भर पावसात रस्त्यामधील खड्डयात बसुन पोलीस मित्र संघटनेने आंदोलन केले होते.या रस्त्यावरुन विद्यार्थ्यांना चालणे शक्य होत नव्हते. त्याकडे स्थानिक सर्व राजकीय पक्षांचे नेते व सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले होते. ही समस्या आंबोट गावातील मिनेश मसने आणि ईतर ग्रामस्थांनी पोलीस मित्र संघटनेकडे मांडली.पोलीस मित्र संघटनेने आंबोट गौळवाडी गावातील ग्रामस्थांसमवेत भर पावसाळ्यात तीन दिवस उपोषण केले. आंबोट गौळवाडी रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने काम पूर्ण केले. आंबोट गौळवाडी ग्रामस्थांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. ते राजकारण बाजूला ठेवून एकत्र आले आणि भर पावसात उपोषणात सहभागी झाले.



## पोलादपूरमध्ये अवकाळी पाऊस

**माणगाव :** गेल्या काही दिवसांपासून ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद मोबाईल वरील ॲप दिसत असताना घामाघुम होणाऱ्या पोलादपूरकरांना गुरुवारी सहा वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस, वादळ आणि विजांचा कडकडाट झाल्याने उष्णतेपासून दिलासा मिळाला. मात्र वादळी पावसामुळे अनेक घरांचे पत्रे उडाले आणि काही ठिकाणी झाड कोसळल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पोलादपूर तालुक्यात यापूर्वी लहुळसे येथे अवकाळी पावसाने २० मार्च रोजी हजेरी लावली होती. त्यानंतर दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढू लागली आणि २३ एप्रिल रोजी तब्बल ४३ अंश सेल्सियस तापमानाची मोबाईलवरील ॲपमध्ये नोंद दिसून आली. सायंकाळी सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास अचानक आकाशात ढग दाटून आले आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. वादळी वारे वाहू लागले आणि अवकाळी पावसाला सुरुवात झाली. तब्बल पाऊण तास विजांचा कडकडाट ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पडणाऱ्या या अवकाळी पावसाने सैनिक नगर, आनंदनगर, गोकुळ नगर, जाखमाता नगर, बाजारपेठ तसेच पोलादपूर ते महाबळेश्वर रस्त्यावरील बाजारपेठ या भागांमध्ये झाडाच्या फांद्या पडणे, झाड कोसळणे, घराच्या छपराचे पत्रे उडून जाणे असे अनेकांचे नुकसान घडवून काळोखात विश्रांती घेतली. यावेळी आनंदनगरमध्ये एक झाड कोसळले असून सैनिकनगरमधील गणेश उतेकर यांच्या घराच्या छपराचे काँक्रीटचे पत्रे उडून फुटल्याचे दिसून आले.अवकाळी पावसाच्या निमित्ताने महावितरणकडून विद्युत पुरवठा बंद करण्यात आला. गेल्या काही दिवसापासून महावितरणकडून पूर्व सूचना न देता विजेचा लपंडाव सुरू असताना अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर हवेत काहीचा गारवा निर्माण झाला.

# पाचवी, आठवी उत्तीर्णांनाही दहावी परीक्षेची संधी

- ऑनलाईन अर्जांसाठी २१ मेपर्यंत मुदत
- ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य

| रायगड | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) जून-जुलैमध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना फॉर्म नंबर १७ भरून खासगीरित्या परीक्षा देता येणार आहे. त्यासाठीची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना २१ मेपर्यंत ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत पाचवी किंवा आठवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीसाठी खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी करता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. अनेक शाळाबाह्य विद्यार्थी पात्र असूनही मंडळाने दिलेल्या मुदतीत नोंदणी करून न शकल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून जून-जुलै २०२५च्या परीक्षांसाठी खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी करण्याची संधी देण्यात आली होती. त्यानुसार जून-जुलै २०२६मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी शाळाबाह्य खासगी विद्यार्थ्यांसाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये राज्य मंडळाच्या अटी-शर्तींनुसार नावनोंदणी करण्यासाठी उपलब्ध आहेत.

दहावी-बारावीच्या जून-जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी खासगी विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील जिल्हा, तालुका, निवडलेले माध्यम, शाखेनुसार शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल. त्यातून एका शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाची निवड करावी लागेल. संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा अर्ज, प्रकल्पाअंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा, अनुषंगिक मूल्यमापन या बाबतची कार्यवाही करायची आहे. नोंदणी शुल्क ऑनलाइन भरल्यावर त्याबाबतची पावती विद्यार्थ्याच्या त्याच्या लॉगिनमध्ये उपलब्ध होणार आहे. खासगी विद्यार्थ्यांची नोंदणी नियमित शुल्कानेच केली जाणार आहे. त्यामुळे विलंब, अतिविलंब शुल्काची सुविधा उपलब्ध असणार नाही, तसेच नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



### मूळ कागदपत्रे आवश्यक

विद्यार्थ्यांना नावनोंदणीसाठी https://mahahsscboard.in/ या संकेस्थळाचा वापर करावा लागणार आहे. नोंदणी करताना विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे अपलोड करावी लागतील. काही कारणास्तव शाळा सोडल्याचा दाखला असल्यास त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा मोबाइल आणि ईमेल पुढील संपर्कासाठी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन शुल्क भरल्याच्या पावतीची मुद्रित प्रत, मूळ कागदपत्रे नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करणे आवश्यक असल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## सुधागडमध्ये बेमुदत संपामुळे शुकशुकाट



| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

राज्यव्यापी बेमुदत संपाच्या आवाहनामुळे सुधागड तालुक्यातील सरकारी व निमसरकारी कार्यालयांमध्ये शुकशुकाट पसरला आहे. कर्मचारी समन्वय समितीने प्रलंबित मागण्यांसाठी संप पुकारल्याने तालुक्यातील प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे.

तहसीलदार कार्यालय तसेच इतर शासकीय विभागांतील कर्मचारी संपात सहभागी झाल्याने कार्यालये ओस पडली आहेत. कर्मचारी कामावर नसल्याने दैनंदिन प्रशासकीय कामे, दाखले मिळवणे आणि शासकीय योजनांशी संबंधित सेवा नागरिकांना मिळणे थांबले कठीण झाले आहे.

संपामुळे तालुक्यातील अत्यावश्यक सेवांव्यतिरिक्त इतर सर्व सेवा विस्कळीत झाल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या मुख्य मागण्यांमध्ये २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करणे, सुधारित पेन्शन नियमावलीची अंमलबजावणी करणे तसेच राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित १८ मागण्यांवर ठोस निर्णय घेणे यांचा समावेश आहे.

संपामुळे प्रशासन ठप्प झाले असून नागरिकांना आवश्यक सेवा मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. कर्मचारी संघटनांनी अभी नहीं तो कभी नहीं असा नारा देत एकजुटीचे दर्शन घडवले आहे. सामान्य नागरिकांना या संपामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून, संप लवकरात लवकर मिटावा आणि कामकाज सुरळीत सुरू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विठ्ठल रखुमाई मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

| तळा | प्रतिनिधी |

शहरातील भोईरवाडी येथे विठ्ठल रखुमाई मंदिराचा ६८ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये काकड आरती, अभिषेक, मंगल स्नान, किर्तन, महाप्रसाद यांसह पालखी मिरवणूक काढण्यात आली. गावातील ग्रामस्थ व महिला मंडळाने मोठ्या संख्येने सहभागी होऊन पालखी मिरवणुकीचा आनंद लुटला. सत्यनारायणाची महापूजा, महाप्रसाद, लहान मुलांचे कार्यक्रम, ग्रामस्थांचे भजन, सत्कार समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम असे कार्यक्रम उत्साहात पार पडले.

## छत्रपती करिअर अकादमीचा अभिमान वाढवणारे यश

- विद्यार्थ्यांची पोलीस सेवेत दमदार निवड; कष्टांना मिळाले सोन्याचे फळ

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शहरातील छत्रपती करिअर अकादमीने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीची साक्ष दिली आहे. या अकादमीतील चार विद्यार्थ्यांची विविध पोलीस दलात निवड झाल्याने परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची शिखरे गाठली आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सिया संध्या संतोष सकपाळ यांची पुणे शहर पोलीसमध्ये, रिया स्वाती सूर्यकांत मोरे यांची मुंबई शहर पोलीसमध्ये, राखी गीता नरेश अंधेरे यांची मुंबई कारागृह पोलीसमध्ये तर हर्ष वाठोरे यांची महाराष्ट्र सुरक्षा फोर्समध्ये, दामिनी बाळकृष्ण रेणोसे, आकांक्षा खापरे विविध प्रकारच्या पोलीस दलात निवड झाली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर आज कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबियांची साथ आणि अकादमीचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

या यशस्वी प्रवासात छत्रपती करिअर अकादमीच्या संस्थापिका माधुरी निवास साबळे आणि त्यांच्या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले कठोर प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन निर्णायक ठरले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत सर्वांचे अभिनंदन केले.

अकादमीमध्ये विशेषतः ग्रामीण आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थी मोठ्या आशेने येतात. येथे त्यांना केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक आणि बौद्धिक तयारीही करून घेतली जाते. आर्मी आणि पोलीस भरतीसाठी आवश्यक असलेले सर्वांगीण प्रशिक्षण दिले जात असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलले आहे.

गेल्या दहा वर्षांत या अकादमीने सुमारे ३५० विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवले आहे. होमगार्ड, पोलीस, आर्मी, रेल्वे पोलीस, वनरक्षक आणि राखीव पोलीस दल अशा विविध सेवांमध्ये येथील विद्यार्थ्यांनी आपली छाप उमटवली आहे. महाराष्ट्रभरातून विद्यार्थी येथे प्रशिक्षणासाठी येत असल्याचे संस्थापिका माधुरी निवास साबळे यांनी सांगितले.

ही निवड केवळ चार विद्यार्थ्यांची नाही, तर त्यांच्या स्वप्नांची, कष्टांची आणि संघर्षाची जिंकलेली लढाई आहे. त्यांच्या यशाने इतर तरुणांसाठी प्रेरणेचा दीप प्रज्वलित केला असून, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन असेल तर यश नक्की मिळते, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## मुलांनी मोबाईलपासून लांब राहावे

### नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचे प्रतिपादन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुलांनी काहीतरी नवीन शिकावे आत्मविश्वास वाढवा आणि मोबाईलपासुन दुर राहावे. या कॅम्पमधुन मुलांना खुप मोठ्या गोष्टी शिकायला मिळणार आहेत. पण याकरिता आपण स्वत:कडे लक्ष द्यावे तुमच्या आरोग्याकडे तसेच अभ्यासाकडे लक्ष द्यावे.तुम्ही या कॅम्पच्या माध्यमातून शारिरीक दृष्ट्या सक्षम व्हायला. हाच उद्देश समर कॅम्प घेण्याचा नक्कीच या कॅम्पमधुन तुम्हाला फायदा होणार आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले.



मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने सर एस ए हायस्कूल मध्ये समर कॅम्प आयोजित कार्यक्रमावेळी बोलत होत्या.

यावेळी उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, महिला व बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, बांधकाम सभापती यास्मिन कादिरी, पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, नगरसेवक नितीन आंबुर्ले, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, उपनियंत्रक निवृत्त सोनल मेहरोळे, महाराष्ट्र शरीरसौष्ठव राष्ट्रीय पंच मोहन करंदेकर, संजय बामुगडे, सतेज निमकर, गणेश म्हात्रे, भास्कर मोरे, बालाजी घुगे, महेंद्र घाटवल, दिपक शिंदे, जयेश चोडणेकर आदिंसह शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेला नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या शुभ हस्ते तर उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या शुभ हस्ते राजे शिवछत्रपती महाराजांना पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. तद्नंतर नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या शुभ हस्ते दिपप्रज्वलन, शिवकालीन शस्त्र पूजा व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी गणेश म्हात्रे यांनी ढाल, काठी, भाला, तलवार, दांडपट्टा प्रात्यक्षिक दाखविले.

## सायबर जागरूकतेसह हळदी-कुंकू




| पनवेल | प्रतिनिधी |

कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्था (म.) पनवेल ही संस्था महिलांसाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असते. यावर्षीही चैत्रगौरी निमित्त हळदी-कुंकू समारंभ मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम पतसंस्थेच्या कर्मचारी प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, जयभारत नाका, पनवेल येथे पार पडला.

समारंभाच्या सुरुवातीला संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर यांनी उपस्थित महिला सभासदांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून दक्षता समिती सदस्य तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका आणि सहाय्यक पोलीस सचिन पोवार उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून संस्थेच्या आर्थिक स्थितीची सविस्तर माहिती दिली.




● अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळातील शाळा समितीचे पदाधिकारी, माजी मुख्याध्यापक, माजी शिक्षक, सध्याचे मुख्याध्यापक, शिक्षक कर्मचारी वृंद यांचा गेट टुगेदर भाल येथील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत संपन्न झाले.

## महागाव येथे भव्य जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धा उत्साहात संपन्न

| पाली | प्रतिनिधी |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून महागाव येथे जिल्हास्तरीय भव्य खुल्या नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रिनिका शिंदे प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.

स्पर्धेत ओम साई अकॅडमी, पाली यांनी सादर केलेला समूह नृत्य विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या स्पर्धेत मोठ्या गटात प्रथम क्रमांक रिनिका नरेश शिंदे भार्जे ता. सुधागड, द्वितीय क्रमांक (विभागून) वेदा यादव (पाली) व निलेश म्हात्रे (उरण), तृतीय क्रमांक (विभागून) आर्या नारंगीकर (उरण) व हर्षिनी कदम (पेण) तर लहान गटात प्रथम क्रमांक श्रीजया पाटील (अलिबाग), द्वितीय क्रमांक (विभागून) आरोही पाटील (पेण) व विहान नाईक (रेवदंडा) तृतीय क्रमांक (विभागून) मुग्धा उभारे (उरण) व आरोही लोहकरे (पेण) यांनी पटकवला.

योजनेसाठी मुदत देऊनही टाळाटाळ | लाभार्थींची ई-केवायसी न झाल्याचा फटका

# चौदा लाख बहिणींचा लाभ बंद होणार

| रायगड | प्रतिनिधी |

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील प्रत्येक लाभार्थींची निकषांनुसार पडताळणी झाली आहे. त्यात आता शेवटी लाभार्थींची ई-केवायसी झाली. त्यातून प्रत्येक लाभार्थीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न निकषांनुसार अडीच लाखांपेक्षा कमी आहे का, हे समजणार आहे. परंतु, तीन महिन्यांची मुदत देऊनही राज्यातील सुमारे १४ लाख लाडक्या बहिणींनी ई-केवायसीच केली नाही. त्यांना आता मुदत न दिल्याने त्यांचा लाभ आता आपोआप बंद होणार आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी जुलै २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. १५ सप्टेंबरपर्यंत राज्यातील अडीच लाखांपेक्षा जास्त महिलांनी अर्ज केले. त्या प्रत्येकीला योजनेचा लाभही मिळाला. पण, मार्च २०२५ पासून निकषांनुसार पडताळणी सुरु झाली आणि चारचाकी वाहन असलेल्या, २१ वर्षांपेक्षा कमी वय व ६५ वर्षांवरील महिला, सरकारी नोकदार महिलांचा लाभ बंद झाला.

याशिवाय केंद्र व राज्य सरकारच्या वैयक्तिक योजनांचा लाभ घेणाऱ्यांचाही लाभ बंद अथवा रक्कम कमी झाली. निकषांनुसार एका कुटुंबातील एक अविवाहित मुलगी व एक विवाहित महिलाच योजनेसाठी पात्र आहे, तरीपण एका कुटुंबातच तीन-चार महिला लाभ घेत असल्याची माहिती पडताळणीत समोर आली. त्यांचाही लाभ बंद होणार आहे. तत्पूर्वी, अंगणवाडी सेविकांमार्फत त्याची पडताळणी देखील झाली. आता ई-केवायसीनंतर खुप महिलांचा लाभ बंद होईल, असे महिला व बालकल्याण आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न आवश्यक

लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. परंतु, अडीच लाखांहून अधिक उत्पन्न असलेल्या महिलांनी देखील लाभ घेतला आहे. आता ई-केवायसीच्या प्रक्रियेतून असे लाभार्थी समजणार आहेत. त्यांचा लाभ कायमचा बंद होणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

### लाडक्या बहिणींची स्थिती

- सुरूवातीच्या लाभार्थी २.५७ कोटी
- पडताळणीत अपात्र ७१ लाख
- उत्पन्नात पात्र ३५ टक्के
- ई-केवायसी न केलेल्या १४ लाख.

**“योजनेतील प्रत्येक लाभार्थीची ई-केवायसी केली जात आहे. ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत दिली होती, तरीपण महिलांनी ती प्रक्रिया पूर्ण केली नाही. त्यांना आता मुदत मिळाली नसल्याने त्यांचा लाभ बंद होऊ शकतो. आता ज्यांची ई-केवायसी चुकली, त्यांना दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंतच मुदत आहे.**

**– जामसिंग गिरासे, उपायुक्त, महिला विकास, पुणे.”**

## ४ मे रोजी लोकशाही दिन

| अलिबाग | वार्ताहर |

माहे मे २०२६ चा लोकशाही दिन सोमवारी (दि.४) जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित केला आहे. लोकशाही दिनाकरिता नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. तालुका लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्जदार अर्ज सदर करु शकतात, असे उपजिल्हाधिकारी डॉ.रविंद्र शेळके यांनी कळविले आहे

# लोकशाहीच्या नावाने...

बंगालमध्ये निवडणुकांचा पहिला टप्पा गुरुवारी पार पडला. एकीकडे तिथे विक्रमी मतदान होत असतानाच काही ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या. मुर्शिदाबाद हा सगळ्यात मोठा हॉटस्पॉट आहे. हा मुस्लिमबहुल जिल्हा असून इथेच सर्वाधिक संख्येने मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आलेली आहेत. शिवाय, याच भागातून हुमायून कबीर नावाच्या इसमाने बाबरी मशीद पुन्हा बांधण्याची घोषणा करून खळबळ उडवून दिली आहे. हा आधी तृणमूल काँग्रेसमध्ये होता. पण त्याला पक्षातून काढून टाकण्यात आले. तो भाजपला फायदा होईल, मुस्लिम मतांमध्ये फाटाफूट होईल अशा रीतीने वावरत असून भाजपचा दलाल असल्याचे तृणमूलचे म्हणणे आहे. गेले दोन दिवस इथेच बॉंबस्फोट वगैरे होत होते. मतदानाच्या दिवशीही हल्ले, सुतळी बॉंबचे स्फोट अशा घटना घडल्या. असनसोलमध्ये भाजपच्या नेत्याच्या गाडीवर हल्ला झाला. सिलिगुडी व इतर भागातही चकमकी वगैरे झाल्या. बंगालमध्ये पूर्वापार राजकीय हिंसाचार होत आलेला आहे. कम्युनिस्टांचे सरकार असतानाही कम्युनिस्ट विरुध्द काँग्रेस आणि नंतर तृणमूल काँग्रेस यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामाऱ्या होतच असत. पण भाजपने यंदा प्रचाराच्या नावाने जे काही केले ते पाहता भारत आणि बंगाल यांचे युध्द चालू आहे असेच वाटत होते. अमित शाह आठ दहा दिवस इथे मुक्काम ठोकून होते. साहजिकच सगळ्या पोलिस यंत्रणांची हलवाहलव ते जातीने करत असणार. शिवाय भाजपची सगळी यंत्रणाही त्यांनी कामाला लावली असणार. भाजपला पैशांचा काही तोटा नाहीच. त्यामुळे कार्यकर्ते असोत की कार्यकर्ते या नावाने मारामाऱ्या करणारे गुंड, त्यांच्यावर पैसे खर्चायला त्या पक्षाला काही अडचणच नाही. बंगालच नव्हे तर देशात कोठेही भाजप ज्यांच्याविरोधात लढतो ते पक्ष भाजपच्या लेखी देशद्रोही असतात. तसे आरोप यांचे नेते करतात. बंगालमध्ये तर बांगलादेशी घुसखोर हा एकमेव मुद्दा निवडणुकीच चर्चेत राहील असे भाजपचे धोरण होते. तृणमूल आणि ममता बॅनर्जी या मतांसाठी जाणीवपूर्वक घुसखोरांना पाठीशी घालत आहेत हा भाजपचा एककलमी प्रचार होता.

## जणू दुसऱ्या देशाशी लढाई

हा आरोप सिध्द करण्यासाठी निवडणूक आयोगाची मदत घेण्यात आली. मतदारयाद्यांची तपासणी करण्याच्या मिषाने ९० लाख नावे वगळण्यात आली. यातले काही जण मृत पावलेले किंवा दोनदा नावे असलेले आहेत. पण बाकीचे लोक हे जणू काही घुसखोर बांगलादेशी आहेत अशा रीतीने प्रचार केला गेला. सर्वोच्च न्यायालयाची याबाबतीतील भूमिकाही खेदजनक होती. एकाच कुटुंबातील काहींची नावे ठेवणे, काहींची वगळणे, पूर्वी सरकारी नोकरीत किंवा न्यायमूर्ती असलेल्यांची नावे काढून टाकणे असले पराक्रम निवडणूक आयोगाने केले. न्यायालयाने त्याची हजेरी घ्यायला हवी होती. एकाही वैध मतदारावर अन्याय होता कामा नये असे म्हणायला हवे होते. पण घडले उलटेच. नावे वगळलेल्या मतदारांच्या अपिलांची सुनावणी करण्यासाठी विशेष लवाद नेमण्यात आले होते. पण अनेक ठिकाणी त्यांचे काम नीट झालेच नाही. परिणामी अनेक नामांकित लोकांनाही मतदानापासून वंचित राहावे लागले. मुस्लिमांच्या नावांची तर कत्तलच झाली. हे सगळे भाजपला अनुकूल ठरेल असे घडत गेले किंवा घडवले गेले. दुर्दैवाने निवडणूक आयोग आणि न्यायालयांनी आपला वापर यात होऊ दिला. मोदी, शाह व इतरांची प्रचारातील भाषाही आक्षेपार्ह होती. त्याविरुध्द काहीही कारवाई झाली नाही. पण तिकडे मल्लिकार्जुन खर्गे यांनी मोदी हे दहशत माजवत आहेत असे म्हटले तर आयोगाने त्यांना लगेच माफी मागा अशी नोटीस बजावली. गेल्या निवडणुकीत म्हणजे २०२१ मध्येही असाच विषारी प्रचार व हाणामाऱ्या झाल्या होत्या. तेव्हा तर कोविडचा धोका असताना मोदींनी लाखोंच्या सभा घेतल्या होत्या. नंतर टीका झाल्यावर त्या बंद केल्या. दीदी ओ दीदी अशी असभ्य भाषाही तेव्हा मोदींनी केली. त्याचे फळ त्यांना मिळाले. एक राज्य विधानसभा जिंकण्यासाठी भाजपचा हा आटापिटा भयानक आहे. या देशात विरोधक नावालाही शिल्लक राहता कामा नयेत यासाठी पोलिस, प्रशासन, न्यायालये, स्वायत्त संस्था, मिडिया, पैसा काय वाट्टेल ते वापरू, पण विजयी होऊ हा भाजपचा बाणा लोकशाहीची मुळे उखडून टाकणारा आहे.

## सर्वोच्च यंत्रणांचा गैरवापर

पहिल्या टप्प्यात ८० ते ९० टक्के मतदान झाल्याने सर्वांच्या भुवया ताणल्या गेल्या आहेत. अजून एक टप्पा बाकी आहे. कदाचित यावेळी मतदान करून पुरावा निर्माण करू अन्यथा पुढच्या वेळी आपलेही नाव वगळले जाईल अशी भीती मतदारांना वाटली असावी. कारणे काहीही असोत, हे मतदान आपल्यासाठीच झाले आहे असे भाजपला वाटते आहे. गेल्या वेळीही भाजपने अशीच हवा निर्माण केली होती. प्रत्यक्षात ममता पूर्वीहून अधिक जागा घेऊन निवडून आल्या होत्या. तृणमूलला ४८ टक्के मते मिळाली होती. डावे व काँग्रेस यांची मते खाल्ल्याममुळे भाजपची मतांची टक्केवारी ३८ झाली तरी त्याला २९४ पैकी केवळ ७७ जागा मिळाल्या होत्या. नंतर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या जागा १९ च्या तुलनेत सहाने कमी होऊन बारावर आल्या होत्या. तर तृणमूलला २९ जागा मिळून मोठा पक्ष बनला होता. या स्थितीत भाजप वेडापिसा होणार व २०२६ च्या निवडणुकीत कोणत्याही थराला जाणार हे दिसत होतेच. त्यानुसार आता बंगाल म्हणजे भयंकर बेदिली, हिंसाचार चालू असलेले राज्य अशी प्रतिमा करण्याचा जोरदार प्रयत्न चालू आहे. केंद्रीय पोलिस दलांच्या तब्बल अडीच हजार कंपन्या बंगालमध्ये तैनात करण्यात आल्या आहेत. अक्षरशः दोनतीनशे माणसांमागे एक पोलिस लावण्यात आला आहे. त्यांची रस्त्यावरची गस्त भीती निर्माण करणारी आहे. मध्यंतरी निवडणूक आयोगाने तृणमूलचे नाव घेऊन यावेळी भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त निवडणुका कोणत्याही स्थितीत घेणारच असा इशारा आपल्या सोशल मिडियावरून दिला. आयोग हा एक स्वायत्त संस्था आहे. त्याने एखाद्या पक्षाचे नाव घेऊन असा इशारा देणे अभूतपूर्व होते. याच दरम्यान सर्वोच्च न्यायालयात ममतांना सल्ला देणाऱ्या आयपैकवर पडलेल्या इडीच्या धाडीबाबतची सुनावणी चालूच आहे. त्यात न्यायमूर्ती बंगालमधील स्थितीबाबत जे तोंडी ताशेरे मारत आहेत त्यांना मोदींचा मिडिया भरपूर प्रसिध्दी देत आहे. कालच्या मतदानाच्या आदल्या दिवशी अशीच सुनावणी झाली व ममतांनी लोकशाही कशी धोक्यात आणली आहे याबाबत न्यायमूर्तींनी मतप्रदर्शन केले. गुरुवारी लोक मतदानाला जात असताना ते सर्वत्र छापून आले होते. हा प्रकार टाळता आला असता. आयपैकची सुनावणी आणखी आठ दिवसांनी घेतली म्हणून काही बिघडणार नाही. एरवी अशी शेकडो प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात वर्षानुवर्षे रेंगाळत आहेत. दिल्ली दंगल प्रकरणातील आरोपींना जामीन देण्याच्या अर्जावर सुनावणी घ्यायला न्यायालयाला बराच काळ लागला होता. त्या पार्श्वभूमीवर ही घाई व ही तोंडी शेरेबाजी व त्याला मिळणारी प्रसिध्दी ही चांगली बाब नाही. हे सर्व लोकशाहीच्या नावाने चालू आहे हे आणखीनच वाईट आहे.

विचार

# २०३५ नंतर विस्मृतीत जाणाऱ्या वस्तू

***माणसाला सर्वात हवीशी वाटणारी आणि अत्यावश्यक असलेली एक बाब नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. ती म्हणजे व्यक्तिगत गुप्तता उर्फ 'प्रायव्हसी'! तसे पाहिले तर ती आत्ताच हाताबाहेर जात आहे. दुकानांमध्ये, रस्त्यावर कॅमेरे असतातच. शिवाय संगणकांमध्ये, हँडसेटमध्ये, गाडीमध्ये 'जीपीएस' असते. पण स्मृतिभ्रंशासारख्या रोगांचे प्रमाणदेखील वाढत असल्याने आपले काय हरवले आहे, तेच बहुधा आपण विसरून जाऊ!***



डॉ. दीपक शिकारपूर

'माझ्याकडे १८८० मधले एक दुर्मिळ पुस्तक आहे!' एखादा संग्राहक अभिमानाने सांगतो. आपल्यालाही त्याचे कौतुक वाटते, कारण इतकी जुनी वस्तू त्याने जिवापाड जपलेली असते आणि पुढच्या पिढ्यांना ऐतिहासिक संदर्भ म्हणून तिचा (कदाचित) उपयोग होणार असतो... 'कदाचित' असे म्हटले कारण चक्रावणाऱ्या वेगाने तांत्रिक प्रगती होण्याच्या या दिवसांमध्ये बदलती जीवनशैली आणि संकल्पनांमध्ये कोण जाणे किती व्यक्तींना अशा संग्राहकांचे आणि त्यांच्याकडल्या वस्तूंचे महत्त्व वाटेल! हे झाले वस्तूंचे उदाहरण. तंत्रज्ञानातील बदलांसोबत संबंधित उपकरणांचे दृश्य रूप आणि कार्यपद्धतीदेखील किती आणि कशी बदलते पहा. तसेच होणारे सर्वच बदल चांगलेच असतील असेही नाही. परंतु त्या दिशेने प्रवास सुरू आहे हे नक्की!

२०३५ पर्यंतच्या अत्याधुनिक काळात सर्वात आधी बळी पडणार आहे टपाल आणि तार खात्याचा म्हणजेच पोस्टाचा. गंमत पहा, फक्त दहा-पंधरा वर्षांपूर्वी हे विधान अतिशयोक्तीपूर्ण वाटले असते. कारण शहरी भाग वगळला तरी खेड्यापाड्यांमधील लोक तोपर्यंत संवादाच्या विविध माध्यमांसाठी पोस्टावर अवलंबून असत. परंतु मोबाइल फोनच्या क्रांतीने हे भाकित पार उलटे पालटे करून टाकले. शिवाय येणारा जमाना तत्काळ उर्फ 'इंस्टंट'चा आहे. मोबाइल फोन, संगणक, इंटरनेटच्या वापराने लगेचच संभाषण आणि संदेशवहन होत असताना उशीराने मिळणाऱ्या टपालसेवेवर कोण अवलंबून राहील? तसेच तंत्रज्ञानाबरोबरच खाजगी कुरिअर सेवेने टपाल खात्याचा महसूल बऱ्यापैकी खाल्ला आहे. ही सेवा चालवणे सरकारला दिवसागणिक न परवडणारे होत चालले आहे, हे तर आपण पाहतोच आहोत. खरे तर, हळूहळू का होईना, पोस्ट ऑफिसचे रूपांतर बँकेमध्ये होऊ लागले आहे. बँकेवरून आठवले, चेकदेखील पोस्टाच्याच वाटेने जात आहे, हे वाचून बहुतेकांना आश्चर्य वाटेल; पण ते खरे आहे. चेकवरील प्रशासकीय प्रक्रिया करण्यामागचा खर्च अनेक बँका आणि वित्तसंस्थांना दिवसेंदिवस न पेलवणारा होत आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्ये २०२८ पर्यंत धनादेशाला त्याच्या सिंहासनावरून पायउतार करण्याबाबतची योजना कार्यान्वित झाली आहे.

'प्लास्टिक मनी' म्हणजेच विविध क्रेडिट-डेबिट-प्रीपेड कार्डे, फोन बँकिंग आणि इंटरनेट याद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारांची संख्या जगभर विलक्षण वेगाने वाढत असल्याचाही हा परिणाम आहे.

या यादीमध्ये पुढचे नाव आहे वृत्तपत्रांचे. वाचक म्हणतील आता हे फारच झाले, आपल्याकडे असे होणे शक्यच नाही. शिवाय गरम चहाचे घुटके घेत पेपर वाचण्याची मजा कोण सोडेल? हे घडून येण्यासाठी कदाचित जरा वेळ लागेल (भारतामध्ये २०३५ पर्यंत वृत्तपत्रांचा खप उतरणीला लागलेला असेल असा काहीजणांचा अंदाज आहे.); पण जागतिक पातळीवरचा कल तसा आहे खरा. जगभरातील अनेक युवक-युवतींनी दररोजचे वृत्तपत्र विकत घेणे बंद केले आहे. (अर्थात आपल्याकडच्या तुलनेने बाहेरच्या देशांमध्ये वृत्तपत्रे खूपच महाग असतात हेदेखील तितकेच खरे.) त्यांचे म्हणणे बातम्या काय, इंटरनेट, रेडिओ किंवा मोबाइल फोनवर मिळतातच. शिवाय वृत्तपत्रांच्या मालकांनीही हे वारे ओळखून इ-आवृत्त्या सुरू केल्या आहेतच. त्यावर जास्त तत्परतेने ताज्या बातम्या कळण्याची शक्यता असल्याने त्या लोकप्रिय होत आहेत. छापील वृत्तपत्रांकडून आपला विषय पुस्तकांकडे जाणे नैसर्गिक आणि अपरिहार्य आहे, नाही का? वैयक्तिक तसेच सार्वजनिक पातळीवरचे छापील पुस्तकांचे साम्राज्य प्रचंड असले तरी त्याला दोन अंगभूत मर्यादा आहेत. पुस्तकांचे वजन आणि त्यांना लागणारी जागा. शिवाय देखभाल आहेच. दोन-तीन हजार पुस्तके सहज घरी बाळगणाऱ्या खऱ्या पुस्तकप्रेमींना या अडचणींचा चांगलाच अनुभव असतो. तसेच नव्या पिढीचे वाचन एकंदरीतच कमी झाले आहे, असेही दिसते. त्यामागची कारणे काहीही असोत.

बरे, आजकाल पुस्तके ऑनलाइन खरेदी करता येतात. 'अमेझॉन'वर मिळणाऱ्या 'किंडल' सारख्या इलेक्ट्रॉनिक साधनामध्ये हजारो पुस्तके मावतात. अशी साधने स्वतःच्या बॅटरीवर सात-आठ दिवसदेखील चालतात. कुठेही बसून कितीही वाचा! बोटांना पाने उलटण्याऐवजी 'पेज डाउन'चे बटन दाबण्याची सवय लागली की झाले! दूरध्वनीच्या लँडलाइन जोडणीबाबत मात्र कोणाचे दुमत असेल, असे वाटत नाही. जगात तर सोडाच, भारतातदेखील अनेक कुटुंबांमध्ये मुले लहान असल्याने अशांनी लँडलाइन जवळजवळ नाइलाजानेच सांभाळली आहे. काहींनी तर कित्येक वर्षांची दोन पिढ्यांची सवय आहे म्हणूनच बहुधा लँडलाइन ठेवली असावी. मोबाइल फोनच्या सेवेतील तांत्रिक प्रगती, 'नंबर पोर्टेबिलिटी' अशा सुविधांमुळे लँडलाइनचे अस्तित्वच धोक्यात येणार हे उघड दिसते आहे. संगीत अर्थातच नष्ट होणार नाही; परंतु त्याच्या उपलब्धतेचे मार्ग आणि पद्धती बदलतील. खरे तर संगीत उद्योगातील फायदा दिवसेंदिवस कमी होत आहे. पायरसी उर्फ अनधिकृत वापर आणि वितरण, हे त्यामागील एक मोठे कारण आहेच. परंतु (जरा वादाचा मुद्दा असलेली) आणखी एक गंभीर बाबदेखील यात समाविष्ट आहे. संगीतातील सर्जनशीलता, उत्स्फूर्तता आणि नवनिर्मिती कमी होत आहे. सध्याच्या 'रीमिक्स'च्या संख्येवरून हे सहज समजून येईल. शिवाय फाइल शेअरिंग आणि सुलभ डाउनलोडिंगच्या तंत्रामुळे 'सीडी'च्या जमान्यात भरपूर व्यवसाय करणारा संगीतउद्योग, आता आर्थिक दृष्ट्या मेटाकुटीला आला आहे.

इंटरनेटमार्फत मिळणाऱ्या सुविधा आणि त्यांचा प्रसार अनंत असल्याने रेकॉर्ड्स, कॅसेट आणि सीडी असा प्रवास करून आलेला संगीत उद्योग- त्याने स्वतःचीच भविष्यकालीन धोरणे तपासून न पाहिल्याने सध्या तरी जरा गोंधळलेल्या अवस्थेत आहे. याबाबत 'रोलिंग स्टोन्स' या जगप्रसिद्ध वाद्यवृंदाशी संबंधित असलेल्या स्टीव्ह नॉपरने एक पुस्तकही लिहिले आहे. आपल्याकडे दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या, डीटीएच आदींचे प्रस्थ सध्या वाढत असले तरी जागतिक पातळीवर पारंपारिक अर्थाने टीव्ही पाहणे कमी होत आहे. याची कारणे दोन. एक तर 'लाइव्ह स्ट्रीमिंग' सारख्या तंत्रांमुळे संगणकावर तसेच सेलफोनमार्फत थेट टीव्ही उपलब्ध होण्याचे प्रमाण आणि वेग वाढतो आहे. तसेच कॉंप्युटर गेम्ससारखे करमणुकीचे इतर प्रकारही संगणकावर मिळत असल्याने त्यापासून दूर जाऊन वेगळे माध्यम वापरण्याची गरज कमी होते आहे. 'नेटफ्लिक्स'सारख्या सुविधेमुळे प्रेक्षकाला काय पहावे, याबाबतचे निर्णयस्वातंत्र्य मिळू लागले आहे. शिवाय टीव्हीवरील वाढत्या जाहिरातींमुळे मूळ कार्यक्रमाचा एकंदर कालावधी वाढत चालला आहे. बरे, जाहिराती न दाखवण्याने वाहिन्यांची पंचाईत होते. कारण प्रक्षेपणाचा वाढता खर्च. असे हे दुष्टचक्र किती काळ नीट चालते ते पहायचे!

आता आपल्या ध्यानात आले असेल, की भविष्यात संगणक वा तत्सम सुविधा खरेदी करण्याची किंवा सीडीवरचे सॉफ्टवेअर, पुस्तके वा संगीत जवळ बाळगण्याची कदाचित गरजच भसणार नाही. विशिष्ट सेवाशुल्क देऊन आपण क्लाउडमध्ये मिळणारी सर्व पूरक साधने आणि उपकरणे वापरू शकू. कोणत्याही लॅपटॉप वा हँडसेटमार्फत आपण महाजालात 'ठेवलेल्या' आपल्या वस्तूंपर्यंत 'पोहोचू' शकू. 'मायक्रोसॉफ्ट विंडोज' आणि 'ॲपल मॅक' हे ओएसचे प्रमुख उत्पादक आणि 'गूगल' यांनी एकत्र येऊन, इंटरनेटच्या माध्यमाद्वारे, अशी सेवा पुरवण्याच्या दृष्टीने फार मोठी पावले यापूर्वीच टाकली आहेत. अर्थात यामुळे मानवी मनातल्या 'हे माझे आहे!' या स्वामित्वाच्या कल्पनेला कदाचित तडा जाईल. कारण महाजालावरच्या आपल्या वस्तू प्रत्यक्ष नाही, तर आभासी (व्हर्चुअल) स्वरूपात असतील! आत्तापर्यंतच्या भविष्यकथनात वर्णिलेल्या वस्तू गेलेल्या परवडल्या, असे म्हणण्याची पाळी कदाचित २०३५ पर्यंत येणार आहे. कारण माणसाला सर्वात हवीशी वाटणारी (आणि अत्यावश्यक असलेली) बाब नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. ती म्हणजे व्यक्तिगत गुप्तता उर्फ 'प्रायव्हसी'! तसे पाहिले तर ती आत्ताच जाऊ लागली आहे. दुकानांमध्ये, रस्त्यावर कॅमेरे असतातच. शिवाय संगणकांमध्ये, हँडसेटमध्ये, गाडीमध्ये 'जीपीएस' असते. पण याचीही चिंता करायचे फारसे कारण नाही. स्मृतिभ्रंशासारख्या (अल्झायमर्स) रोगांचे प्रमाणदेखील वाढत असल्याने आपले काय हरवले आहे, तेच बहुधा आपण विसरून जाऊ!

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# आंबा, काजू उत्पादक हवालदिल



अंतरा पारंगे

सध्या हवामानामध्ये सातत्याने बदल होत आहेत. कुठे वाढलेला उष्णतेचा पारा तर कुठे ढगाळ वातावरण आहे. या बदलत्या वातावरणाचा फटका आंबा आणि काजू पिकांना बसला आहे. एकेकाळी खात्रीशीर उत्पन्न देणारी ही आंबा आणि काजू बागायती आता बागायतदारांसाठी चिंतेचा विषय बनली आहे. जगप्रसिध्द असलेल्या हापूस आंब्याचे उत्पादन आता ४० टक्क्यावर आले आहे. यावर्षी त्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे आंबा व काजू उत्पादक हवालदिल झाला आहे. आंबा हे पीक तापमानातील बदलांना अत्यंत संवेदनशील असते. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये थंडीऐवजी वाढलेल्या तापमनाचा आंब्याच्या मोहरावर म्हणजेच फुलधारणेवर परिणाम होतो. त्यांनतर मार्च-एप्रिलमध्ये अचानक येणाऱ्या उष्णतेच्या लाटेमुळे लहान फळांची मोठ्या प्रमाणावर गळ झाली. त्यातच अवकाळी पावसामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने बागायतदार अडचणीत सापडला आहे. अशातच पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार कीटकनाशके आणि बुरशीनाशकांचा वापर करावा लागत आहे. मजुरी आणि खतांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्च ५० टक्क्यांहून अधिक वाढला आहे. यावर्षी फवारणीसह मशागतीच्या कामासाठी झालेला खर्चही बागायतदारांच्या उत्पादनातून मिळणार नसल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एका बाजूला उत्पादनात होणार घट आणि खर्च वाढत आहे. त्यामुळे आता दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या डोक्यावर असणारं कर्जही वाढत आहे. उत्पादनात घट झाल्यामुळे कर्ज फेडणं शेतकऱ्यांना अडचणीचं ठरणार आहे.

कोकणात आंबा पिकाचे क्षेत्र पावणे दोन लाख हेक्टर आहे. त्यात रत्नागिरी जिल्ह्यात एक लाख २० हजार हेक्टर, सिंधूदुर्गमध्ये ३८ हजार हेक्टर, रायगड जिल्ह्यात १९ हजार हेक्टर क्षेत्र आहे. ठाणे व पालघरमध्ये मर्यादीत स्वरुपात लागवड केली जाते. यातून दोन लाख ७० हजार मेट्रीक टन इतके वार्षिक उत्पादन मिळते. दरवर्षी २५ हजार मेट्रीक टन इतकी हापूसची निर्यात होते. यातील निम्मी निर्यात ही मध्य पुर्वेतील देशांमध्ये होते. यंदा आंब्याचे उत्पादन फारच कमी असल्याचे दिसून येत आहे. कोकणातील आंब्याला देशभरासह परदेशातूनही मोठ्या प्रमाणावर मागणी असते. ताज्या आंब्याबरोबरच कोकणातून मोठ्या प्रमाणात मँगो पल्प किंवा आमरसाचीही निर्यात केली जाते. आंबा बागेची काळजी घेणाऱ्या काही बागायतदारांमध्ये यावर्षी चांगले उत्पादन मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र अवकाळी वादळी पावसामुळे आंबा उत्पादनात कितपत फायदा होईल, याबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

हवामान बदलाच्या संकटाबरोबरच अमेरिका-इराण युध्दाचा आंबा निर्यातीला मोठा फटका बसला. युध्दामुळे निर्यात ठप्प झाली. कृषी उत्पन्न बाजार समिती व देशांतर्गत बाजारपेठांमध्ये आंब्याला कमी दर मिळत आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. काजू उत्पादकांचीदेखील तीच अवस्था झाली आहे. अलिकडच्या काही वर्षात वर्षातील आठ ते दहा महिने पाऊस पडतो. तर प्रामुख्याने पिकांनी फळधारणा होण्यासाठी आवश्यक थंडी पडताना दिसत नाही. परिणामी निसर्गाच्या या दृष्टचक्रात येथील शेतकरी, बागायतदार भरडला जात असून वर्षागणिक शेती आणि बागायतीच्या क्षेत्रात कमालीची घट होताना दिसत आहे. आधीच उत्पादन खर्च वाढलेला असताना अवकाळी पावसामुळे झालेले हे नुकसान शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मोठा फटका देणारे ठरले आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कोकणात बदलत्या वातावरणामुळे काही ठिकाणी आंब्यावर तुडतुडा रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. तर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर फळगळ झाली. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. यामुळे आंबा उत्पादनात मोठी घट झाली. आतिउष्णतेने अनेक ठिकाणी झाडांना मोहर आलाच नाही, तर काही ठिकाणी मोहरामध्ये फळधारणा झाली आहे. यावरही बदलत्या हवामानाचा परिणाम झालेला दिसत आहे. त्यामुळे आंबा बागायतरांवर संकट निर्माण झाले आहे. अवकाळी, वाढते तापमान व किड रोगांचा मोठ्या प्रमाणात होणारा प्रादुर्भाव यामुळे नुकसानीची तीव्रता मोठी आहे. यावर्षी आंब्याची मोहर प्रक्रिया थांबली. आलेला मोहर जळून गेला. ४० टक्के झाडांना मोहरच आला नाही. मोहर संवर्धनासाठी शेतकऱ्यांनी महागडी रासायनिक औषधांचा वापर करून भरमसाठ खर्च केला. परंतु, यंदा शेतकऱ्यांच्या पदरात निराशाच पडली आहे. आंबा पीक महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा एक कणा आहे. वेळीच शासनाने हवामान बदलावर उपाय शोधणे आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे.

लोकसंसद

## वैद्यकीय विद्यार्थ्यांवरील दंडप्रक्रिया कठोर !

साडेतीन लाख रुपयांचे वस्तीगृह शुल्क वेळेत भरले नाही म्हणून विद्यार्थ्यावर तब्बल १९ लाखांहून अधिक दंड आकारण्यात आल्याचे वाचनात आले. ही कारवाई केवळ कठोर नाही, तर ती पाशवी आणि अन्यायकारक असल्याचे जाणवते. शिक्षणसंस्था या विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणाऱ्या पवित्र जागा मानल्या जातात. मात्र अशा प्रकारच्या अवास्तव दंडामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक, आर्थिक आणि सामाजिक ताण निर्माण होतो किंबहुना सावकारी पद्धतीतही इतका कठोर दंड आकारला जात नसावा. याहूनही गंभीर बाब म्हणजे, संबंधित विद्यार्थ्याने इंटर्नशिप पूर्ण करूनही त्याला पूर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही. ही कृती म्हणजे विद्यार्थ्याच्या भविष्याशी खेळ करणारी अडवणूकच म्हणावी लागेल. अशा निर्णयांमुळे केवळ एका विद्यार्थ्याचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. ग्रामीण भागातील सर्वच विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम असतातच असे नाही. कांही जिद्द आणि मोठ्या कष्टाने, कुटुंबाच्या आशेवर, कर्जाच्या ओझ्याखाली शिक्षण घेत असतात. अशा विद्यार्थ्यांवर इतका प्रचंड आर्थिक बोजा टाकणे हे अमानुष आहे. म्हणूनच संबंधित प्रशासनाने या प्रकरणाकडे सहानुभूतीपूर्वक पाहून, विद्यार्थ्यांची बाजू समजून घेत योग्य आणि सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते. शिक्षण ही सेवा आहे, व्यापार नाही याची जाणीव सर्वांना असणे महत्त्वाचे आहे.

**– विश्वनाथ पंडित, ठाणे**

दिनविशेष

# जागतिक मलेरिया दिन

मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. प्लाझमोडियम वायवॅक्स या नावाच्या डासांद्वारे तो पसरतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता २५ एप्रिल हा जागतिक मलेरिया दिन म्हणून ओळखला जातो. 'प्लाझमोडियम' या जातीच्या डासांमुळे होणारा हा रोग अनेक शतकांपासून अस्तित्वात आहे. ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरिया सदृश्य आजार माहीत होता.

१७ व्या शतकाच्या पूर्वार्धात, जैलुइट लोकांनी पेरू देशात सिंकोना ही वनस्पती आणली होती. या सुमारास जेव्हा युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ आली होती, तेव्हा या सिंकोना वनस्पतीचा त्या तापावर उपचार करण्यात आला होता. या उपचारांमुळे मलेरिया आणि अन्य प्रकारचे ताप यांतील फरक सिडनर्हेम आणि अन्य वैद्यांना ओळखणे शक्य झाले.

१८९४ मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून तो या जंतूंनी युक्त डास चावा घेऊन नव्हे, तर पाण्यावाटे पसरवीत असावेत. पुढे १८९८ मध्ये रॉस यांनी मलेरिया डासांमुळे नेमका कसा होतो याचा शोध लावला. पक्ष्यांमधील मलेरियाप्रमाणेच मानवी शरीरांतही घडामोडी होत असल्या पाहिजेत, असे त्यांना दिसून आले.

त्याच वर्षी ग्रासी, बिगनमी आणि बास्टिनेली यांनी ॲनोफेलिस जातीच्या डासांमध्ये प्लाझमोडियम, फाल्सिपॅरम या जातीच्या मलेरियाच्या जंतूंची कशी वाढ होते आणि पुढे ते संसर्गित डास चावल्यामुळे माणसांमध्ये मलेरिया कसा होतो हे दाखवून दिले. डासांच्या शरीरांतील मलेरियाच्या जंतूंच्या घडामोडीविषयी आणि हा मलेरिया मानवी शरीरात कसा संक्रमित होतो, याविषयी सर रोनॉल्ड रॉस यांनी मूलभूत संशोधन केले आणि पुढील अभ्यासकांना दिशा दाखविली.

२००८ मध्ये अफ्रिकेत हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. मलेरिया या साथीच्या आजाराने आजवर जगभरात अनेकांचा बळी घेतला आहे. त्यामुळे अवघ्या जगाने एकत्र येत मलेरिया आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. २००७ या वर्षाच्या मे महिन्यात भरलेल्या ६० व्या जागतिक आरोग्य परिषदेत हा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. डास चावल्यानंतर आठ दिवसाने मलेरियाची लक्षणं सुरू होतात. यामध्ये ताप येणे, थकवा, स्नायू दुखणे, डोकेदुखी, चक्कर येणे ही मलेरियाची लक्षणं आहेत. यामधील कोणतीही लक्षणं जर तुम्हाला जाणवली तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेऊन औषध घेऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते मलेरिया हा प्लास्मोडियम परजीवीमुळे होणारा आजार असून तो ॲनोफिलिस जातीच्या मादी डासांद्वारे पसरतो. ताप, थंडी वाजणे, घाम येणे, डोकेदुखी ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. वेळेवर उपचार न झाल्यास हा आजार जीवघेणा ठरू शकतो. राज्यात मलेरिया नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी फॉगिंग, गटार व पाणीसाठ्यांची स्वच्छता, कीटकनाशक फवारणी, तसेच घरगुती पातळीवर जाळीचा वापर यांचा समावेश आहे. तसेच उच्च जोखमीच्या भागांमध्ये 'इंडोअर रेसिड्युअल स्प्रे' आणि 'लॉंग लास्टिंग इन्सेक्टिसाइडल नेट्स'चा वापर वाढवण्यावर भर दिला जात आहे. सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांच्या मते मलेरिया रोखण्यासाठी केवळ सरकारी उपाययोजना पुरेशा नाहीत. नागरिकांनीही घराभोवती पाणी साचू न देणे, डासांपासून संरक्षण करणे आणि ताप आल्यास त्वरित तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक मलेरिया दिनाच्या निमित्ताने आरोग्य तज्ज्ञांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे.मलेरिया हा टाळता येणारा आणि उपचारयोग्य आजार असला तरी दुर्लक्ष केल्यास तो गंभीर रूप धारण करू शकतो. त्यामुळे 'जागरूकता, प्रतिबंध आणि वेळेवर उपचार' हीच मलेरियाविरुद्धची प्रभावी लढाई ठरते.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# अधिकृत डम्पिंग व्यवस्था उभारावी

## • सजग नागरिक मंचची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

शहरात वाढत्या अनधिकृत डेब्रिज डम्पिंगच्या पार्श्वभूमीवर सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेला एकात्मिक डेब्रिज व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी सजग नागरिक मंचाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. डेब्रिज वाहने पकडण्याच्या कारवाया सुरू असल्या तरी अधिकृत पर्याय नसल्याने समस्या कायम राहात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नवी मुंबईत पुनर्विकास, रस्ते सिमेंटीकरण आणि विविध पायाभूत सुविधा कामांमधून मोठ्या प्रमाणात बांधकामातील डेब्रिज निर्माण होत आहे. मात्र या डेब्रिजच्या विल्हेवाटीसाठी अधिकृत डम्पिंग साइट्स, प्रक्रिया केंद्र किंवा पारदर्शक शुल्क प्रणाली नसल्याने डेब्रिज धारकांना अनधिकृत मार्गाचा अवलंब करावा लागत असल्याचे मंचाने म्हटले आहे. परिणामी खाडी किनारे, नाले, मोकळे भूखंड आणि डोंगर पायथ्यांवर बेकायदेशीर डम्पिंग वाढत असून पर्यावरणीय हानीचा धोका निर्माण झाला आहे.

केंद्र सरकारच्या बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी डेब्रिज संकलन, वाहतूक व प्रक्रिया केंद्र उभारणे बंधनकारक आहे. मात्र, नवी मुंबईत अशी व्यवस्था प्रभावीपणे अस्तित्वात नसल्याने डेब्रिज माफियांचा उदय होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय सिडको व महानगरपालिकेच्या स्वतःच्या विकासकामांतून निर्माण होणाऱ्या डेब्रिजची विल्हेवाट नेमकी कुठे लावली जाते, नवी मुंबईत अधिकृत व्यवस्था नसेल तर याचा थेट अर्थ असा होतो की, सिडको, महानगरपालिका देखील आपल्या कामाचे डेब्रिज अनधिकृत पद्धतीनेच डम्प करत आहेत. याबाबतही पारदर्शक माहिती उपलब्ध नसल्याचे मंचाने शंका व्यक्त केली आहे.

सजग नागरिक मंचाने अधिकृत डम्पिंग साइट्स निश्चित करणे, संयुक्त बांधकाम आणि पाडकाम धोरण तयार करणे, डेब्रिज वाहतुकीसाठी ऑनलाईन पास प्रणाली सुरू करणे, शहर प्रवेश बिंदूंवर तपासणी चौक्या उभारणे, अधिकृत शुल्क व पावती प्रणाली लागू करणे, तसेच डेब्रिज पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्र उभारण्याची मागणी केली आहे. पुनर्विकास व पाडकाम प्रकल्पांसाठी डेब्रिज व्यवस्थापन योजना बंधनकारक करण्यासोबतच नागरिकांसाठी 'डेब्रिज ऑन कॉल' संकलन सुविधा सुरू करण्याचीही सूचना करण्यात आली आहे.

नवी मुंबईला अनधिकृत डम्पिंगमुक्त करण्यासाठी नगरविकास विभागामार्फत सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेला कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंतीही मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.

> "जिथे अधिकृत व्यवस्था नसते, तिथेच अनधिकृत माफियांचा जन्म होतो. केवळ कारवाई करून डेब्रिज समस्या संपुष्टात येऊ शकत नाही. अधिकृत पर्याय उपलब्ध करून देणे हाच या समस्येवरील प्रभावी उपाय आहे. 'हे करू नका' बरोबर 'हे करा' अशी व्यवस्था उभारणे हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे. अधिकृत डम्पिंग साइट्स आणि पारदर्शक प्रणालीशिवाय डेब्रिज माफियांना आळा बसणार नाही."
>
> – ॲड. डॉ. विशाल माने, प्रशासकीय सल्लागार सजग नागरिक मंच, नवी मुंबई

## रमेश राऊत यांचे निधन

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील देहन गावचे रमेश रामदास राऊत यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी बुधवारी (दि.२२) निधन झाले. ते दैनिक सकाळमध्ये मेकॅनिक डिपार्टमेंटमध्ये कार्यरत होते. पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय परिवाराचे सक्रिय सेवक होते.



त्यांच्या पार्थिवावर नवीन देहेनच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी विविध आध्यात्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ मोठ्या उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवार दि. ३० एप्रिल तर तेरावे रविवार दि.३ मे रोजी राहत्या घरी नवीन देहेन येथे होणार आहे.

# 'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियान

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान राज्यभरात राबविण्यात सुरू झाले आहे. त्या अनुषंगाने मुरुड तालुक्यात तालुकास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन मुरूड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांनी केले. यावेळी मुरुड पंचायत समिती उपसभापती अश्विनी जंगम, सदस्य गणेश नाक्ती, गटविकास अधिकारी राजेंद्र कुमार खताळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षय कुमार सोळंकी व एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेंडगे, प्रवीण पाटील, राजेंद्र चुनेकर, आरोग्य सहाय्यक गणेश शिंदे, शालीकराव पावरा, वैद्यकीय अधिकारी आरोग्य कर्मचारी आदिंसह मान्यवर उपस्थित होते.



(छायाचित्र–गणेश चोडणेकर)

या अभियानाचा उद्देश गावातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी राज्यभरात माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान राबविण्यात येणार आहे. सर्व वयातील सर्व लोकांना आरोग्यदायी व कल्याणकारी जीवन मिळण्याची खात्री असण्यावर भर देणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. समाजाचे विविध घटक किशोरवयीन मुले व मुली महिला लहान मुले वंचित घटकासह सर्व घटकांना सहभागी व सशक्त करण्यासाठी एक सर्व समावेशक दृष्टिकोन आवश्यक आहे. जेणेकरून आरोग्य लोकांच्या दैनंदिन चर्चा व कृतीमध्ये केंद्रस्थानी येऊ शकेल. प्रजा निरोगी तर राज्य सशक्त या तत्त्वज्ञानावर आधारित गावांमधील नागरिकांना सुदृढ आणि सशक्त बनवण्यासाठी माझं गाव आरोग्य संपन्न गाव हे अभियान राज्यात सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, असे पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ यांनी मत व्यक्त केले. तर गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी आरोग्य विषयक व अभियानामध्ये काम करण्याबाबतचे मार्गदर्शन केले.

तालुका आरोग्य अधिकारी यांनी हे अभियान राबविताना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रामध्ये काय कृती करावी, याबाबतचे सखोल मार्गदर्शन केले.

## महिला बेपत्ता

**कोलाड :** रोहा तालुक्यातील खोंडा (चिंचवली) आदिवासी वाडी येथील अस्मिता विजय पवार (२०) ही तीच्या राहत्या घरातून कोणाला काही न सांगता दि.७ एप्रिल रोजी निघून गेली.



तिचा सावळा वर्ण, उंची १५३ सेमी, मजबूत बांधा, काळे लांब केस, काळे डोळे, कानात सोनेरी रंगाची कुडी, नाकात सोनेरी रंगाची नकली चमकी, गळ्यात काळ्या रंगाचे मंगळसूत्र, पायात निळ्या रंगाची चप्पल, डाव्या हाताच्या मनगटावर मोर पंखाचे गोंदवणे केले असून लाल रंगाची कुर्ती व सफेद रंगाचा पायजमा व मोबाईल नं.९९६०३०९७०२ असे वर्णन करण्यात आला आहे. अधिक तपास कोलाड पोलीस करीत आहेत.

## निवडक

### भारताच्या अपमानावर मोदी गप्प का?

**• ॲड. प्रकाश आंबेडकरांचा पंतप्रधानांवर संताप**

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या सोशल मीडियावरील ट्विटद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आणि त्यांच्या परराष्ट्र धोरणांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी भारताला नर्क संबोधून देशाचा अपमान केल्याचा दावा करत, ॲड. आंबेडकर यांनी या मुद्द्यावरून पंतप्रधानांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव एपस्टीन फाइलमध्ये आल्यापासून ते अमेरिकेसमोर कोणतीही भूमिका न घेता शरणागती पत्करत आहेत, ज्याचा फटका देशाला बसत आहे. या मौनामुळेच भारत आणि पंतप्रधान मोदी यांची जगभरात थट्टा उडवली जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आपल्या ट्विटमध्ये ॲड. आंबेडकर यांनी अशा अनेक घटनांचा उल्लेख केला आहे, ज्यात अमेरिकेने भारताचा अपमान केला आणि पंतप्रधान मोदींनी त्यावर मौन बाळगले. त्यांनी नमूद केले की, अमेरिकेने भारतीय नागरिकांना बेड्या ठोकून भारतात पाठवले, भारतावर भारी आयात शुल्क (टॅरिफ) लादले आणि भारत-पाकिस्तान युद्धाच्या विषयावर ट्रम्प यांनी एकतर्फी भूमिका घेतली, तरीही मोदी गप्प राहिले. तसेच, रशियाकडून तेल खरेदी न करण्याच्या अमेरिकेच्या आदेशाचे भारताने पालन करणे आणि इराणसारख्या आपल्या पारंपरिक मित्राशी संबंध बिघडणे यांसारख्या बाबींवरही पंतप्रधानांनी शांत राहणे पसंत केले आहे, असा आरोप त्यांनी केला. या सर्व पार्श्वभूमीवर, अमेरिकेला पंतप्रधान मोदींच्या अशा कोणत्या काळ्या कारनाम्यांची माहिती आहे, ज्यामुळे ते सातत्याने होणारी ही बेइज्जती गप्प बसून सहन करत आहेत, असा सवाल त्यांनी केला आहे.



### धान्य साठवण टाकीचे वाटप

**चिरनेर :** कोंढरी करंजा येथील शिक्षणप्रेमी दिनेश नारायण म्हात्रे आणि स्नेहबंध समूह उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच उरण तालुक्यातील चिरनेर अक्कादेवीवाडी येथे धान्य साठवण टाकीचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्याचे दातृत्व जपण्यासाठी एकत्र आलेल्या स्नेहबंध समूहाचा वार्षिक गेट-टुगेदर मेळावा चिरनेर येथील ऐतिहासिक भूमित अक्कादेवी डोंगरावर साजरा झाला. या वार्षिक कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप, आदिवासी बांधवांना धान्य साठवण टाकीचे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना स्नेहभोजन आणि खाऊचे वाटप करण्यात आले. समाजाच्या उन्नतीसाठी आपल्या उत्पन्नाचा एक वाटा समाजासाठी अर्पण करावा, ही संकल्पना प्रत्यक्षात राबविणाऱ्या दिनेश म्हात्रे आणि मच्छिंद्र म्हात्रे यांनी आपल्या प्रस्ताविकेतून कौतुक केले. मानवी जीवन हे एखाद्या वृक्षाप्रमाणे परोपकारी झाले पाहिजे, यासाठी प्रत्येकाने धडपडत रहावे, असे आवाहन देखील उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी प्रास्ताविकेतून केले. यावेळी चिरनर अक्कादेवी वाडी येथील ४० आदिवासी बांधवांना धान्य साठवण टाक्यांचे वाटप करण्यात आले.

### एकदिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण

**आगरदांडा :** म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने कोकण विभागीय कर्मचारी प्रतिनिधींचे एक दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबीर मुरूड अलंकापुरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात शनिवार दि.२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत आयोजित केले आहे. या शिबिरामध्ये म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरु म्हात्रे, कार्यालय प्रमुख महेंद्र गायकवाड, मुरूड नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर, उपाध्यक्ष राजू पाटील, सचिव अभिजित चांदोरकर, सल्लागार राकेश पाटील, सदस्य सतेज निमकर, दिपक शिंदे, निलेश शेंडगे, सुदेश माळी, स्मिता मुरूडकर, स्वप्नजा विरकुड, अभिजित कारभारी सदस्य व सर्व म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन कामगार कर्मचारी तज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व कर्मचाऱ्यांनी या शिबिरामध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन मुरूड नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर यांनी केले आहे.

### आंबा पिकाला अवकाळीचा फटका

**खेड :** खेड तालुक्यात गुरुवारी (दि.२३) दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होत विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. खेड शहरासह ग्रामीण भागात मेघगर्जनेसह दमदार पावसाच्या सरी कोसळल्याने नागरिकांची एकच तारांबळ उडाली.



या मुसळधार सरींमुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले असून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक काही काळ मंदावली होती. दरम्यान, भारतीय हवामान विभाग यांनी कोकण किनारपट्टीसाठी गुरुवारी ऑरेंज अलर्ट जारी केला होता. त्यानुसार दुपारनंतर अवकाळी पावसाला सुरुवात झाल्याने हवामान विभागाचा अंदाज तंतोतंत खरा ठरला आहे. पुढील दोन दिवसही अशाच प्रकारचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या अवकाळी पावसाचा फटका एप्रिल महिन्यातील आंबा पिकाला बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या हापूस आंबा तोडणीच्या हंगामात असताना पावसामुळे फळ गळ, गुणवत्तेत घट तसेच शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे.

### सहलीचे आमिष दाखवून फसवणूक

**पालघर :** थायलंड सहलीचे बनावट विमान तिकीट आणि पॅकेज देऊन मिरारोड येथील एका ५६ वर्षीय व्यावसायिकाची १ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. मिरारोडच्या शांतीपार्क परिसरात राहणारे तक्रारदार शशिकांत साळुंखे हे व्यावसायिक आहेत. त्यांनी नेचर नेक्सस नेव्हिगेटर या पेजवर फिरायला जाण्यासाठी संपर्क साधला होता. १३ ऑगस्ट २०२५ ते २२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पेजचा मॅनेजर जसमीत सिंग याने साळुंखे यांच्याशी संपर्क साधून त्यांना मुंबई ते थायलंड असे संपूर्ण ट्रॅव्हल पॅकेज देण्याचे ठरवले. आरोपी जसमीत सिंग याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने एकूण १ लाख ८६ हजार रुपये घेतले. पैसे मिळाल्यानंतर आरोपीने साळुंखे यांना थाय विएत जेट एअरलाईन्सचे विमान तिकीट पाठवले. मात्र, साळुंखे यांनी तिकीटाची पडताळणी केली असता, ते तिकीट बनावट आणि खोटे असल्याचे निष्पन्न झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच साळुंखे यांनी काशिमीरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी पोलिसांनी चौकशी करून आरोपी जसमीत हरपाल सिंग (२३) रा. बलदेव नगर, अंबाला, हरियाणा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## 'ड्रगमुक्त मुंबई' अभियानाची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहरात वाढत चाललेल्या ड्रग्जच्या बेकायदेशीर व्यापाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा युवक मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मातेले यांनी गृहराज्यमंत्री मा.ना. योगेश कदम यांची मंत्रालयात भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी मुंबईतील महाविद्यालयीन युवकांना लक्ष्य करून वाढत असलेल्या नशेखोरीच्या घटनांबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. विशेषतः गोरेगाव येथील नेस्को परिसरातील ड्रग्ज पार्टी प्रकरण, विक्रोळी परिसरातील ड्रग्ज माफियांवर झालेल्या कारवाया, तसेच ओव्हरडोसच्या घटनांमुळे तरुणांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. ड्रगमुक्त मुंबई अभियान तात्काळ जाहीर करून व्यापक स्तरावर राबविणे, ड्रग्ज पुरवठा साखळीचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करणे, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये अँटी-ड्रग्ज जनजागृती मोहीम राबविणे, ड्रग्ज विक्री व पुरवठ्यात सहभागी असलेल्या माफियांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे, पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करून गुप्त माहिती संकलन व प्रतिबंधात्मक कारवाई वाढविणे तसेच, युवकांसाठी समुपदेशन केंद्रे व प्रभावी पुनर्वसन व्यवस्था उभारणे या प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

दरम्यान, मा.ना. योगेश कदम यांनी या विषयाची दखल घेत लवकरच संबंधित विभागांची बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले.

# नॅशनल बर्न्स सेंटरकडून त्वचादानाचे आवाहन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नॅशनल बर्न्स सेंटरने संपूर्ण भारतात त्वचादानाच्या गंभीर तुटवड्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अधिक लोकांनी त्वचादानासाठी पुढे यावे, या उद्देशाने NBC ने हाती घेतलेल्या मोहिमेचे नेतृत्व करताना, संचालक आणि प्लास्टिक सर्जन डॉ. सुनील केसवानी यांनी म्हटले की, त्वचादानाविषयीच्या जागृतीचा अभाव हेच या तफावतीचे मुख्य कारण आहे. मुंबईतील स्किन बँक्सना (त्वचा पेढ्यांना) दरमहा आवश्यक असलेल्या त्वचादानापैकी केवळ २५ टक्केच दान प्राप्त होते.



भाजल्यामुळे जखमी झालेल्या रुग्णांपैकी सुमारे ७० टक्के रुग्ण १५ ते ३५ या वयोगटातील असतात त्वचारोपणाची (स्किन ट्रान्सप्लांटेशन) सुविधा सहज उपलब्ध नसल्यामुळे, भाजल्यातून बचावलेल्या रुग्णावर तसेच त्यांच्या कुटुंबावर मोठा आर्थिक आणि मानसिक ताण पडतो. त्वचेच्या रोपणाची (स्किन ग्राफ्ट्स) सुविधा वेळेवर उपलब्ध झाल्यास, भाजलेल्या रुग्णांवर उपचारांच्या सर्वात नाजूक आणि निर्णायक टप्प्यातच योग्य ते पुनर्वसन करता येते; ज्यामुळे गुंतागुंत निर्माण होण्याचा आणि मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. मृत्यूनंतर ६ तासांच्या आत त्वचेचे दान करता येते; मात्र त्वचेचे दान करण्यासाठी, मृत व्यक्तीची स्थानिक त्वचा बँकेमध्ये नोंदणी झालेली असणे आवश्यक असते.

एका खासगी चर्चासत्रात नॅशनल बर्न्स सेंटरचे संचालक आणि प्लास्टिक सर्जन डॉ. सुनील केसवानी म्हणाले की, कदाचित दर दहापैकी केवळ एकाच व्यक्तीला त्वचेचे दान करण्याच्या पर्यायाबद्दल किंवा त्या प्रक्रियेबद्दल माहिती असावी. जागृतीच्या अभावामुळेच, दरवर्षी भाजलेल्या रुग्णांपैकी केवळ अत्यल्प संख्येतील रुग्णांनाच त्वचेचे प्रत्यारोपण करणे शक्य होते, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. शिवाय, केवळ मुंबईचाच विचार करता, भाजल्यामुळे जखमी होणाऱ्या रुग्णांची खरी संख्या अनेकदा कमी करून सांगितली जाते. ज्यामुळे माहितीच्या अभावाची ही दरी आणखीच रुंदावते.

## फणसाड वन्यजीव अभयारण्यातर्फे वृक्षारोपण

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

कांदळवनाचे वृक्षारोपण हे किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मुरूड तालुका किनारपट्टीवर कांदळवन वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न फणसाड वन्यजीव अभयारण्याकडून केले जात आहेत.

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून मुरूड फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या वतीने उपवनसंरक्षक राजेंद्र गवई यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील बोर्ली मांडला ग्रामपंचायत हद्दीतील तारांबदर फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या कांदळवनाच्या क्षेत्रात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कांदळ, तिवर, पांढरी चिपी या वृक्ष प्रजातींची १०० रोपांची लागवड केली. त्याबरोबर तारांबदर परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आला.



(गणेश चोडणेकर)

यावेळी उपवनसंरक्षक राजेंद्र गवई, वनपरिक्षेत्र अधिकारी नितिन ढगे, वनपाल आदेश पोकळ, किरण मोरे, हरिश्चंद्र नाईक, वनरक्षक नामदेव मुंढे, करेबा खांडेकर, योगेश महिरे, गौरक्षक भांबरे, शशिकांत आरोठे, अभिजित पाटील, सुर्यकांत कुर्मिले, रूपेश, देवरे, वनपुर्णजीवन आणि पर्यावरण शास्वती संस्थेचे नेहा सिंग, एस.आर.धनुष्य, प्राची पवार, वृषाली डांगे, तसेच तारांबदर ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी वनपाल आदेश पोकळ आपल्या मनोगतात म्हणाले की, कांदळवनाची मुळे मासळीच्या प्रजननासाठी हे क्षेत्र उपयुक्त ठरते. फांद्या वादळ आणि लाटांपासून संरक्षण करतात, तसेच कांदळवन वृक्षारोपणामुळे किनारपट्टीची धूप थांबवणे, जैवविविधता टिकवणे आदिंसह फायदा होतो.

## मुरुड-जंजिरा-लातूर बस सेवा सुरु

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद मुरूड आगाराने जपले असून पर्यटनाला चालना मिळावी आणि ताम्हिणी घाटातील डोंगर दऱ्यांचा नयनरम्य प्रवासाचा आनंद घेता यावा, यासाठी मुरुड आगाराने एक पाऊल पुढे टाकले आहे. खास उन्हाळी सुट्टीनिमित्त दि.१६ एप्रिलपासून मुरुड आगारातून मुरूड-लातूर ही प्रवासी सेवा लालपरीच्या माध्यमातून सुरू केली आहे, अशी माहिती आगार व्यवस्थापक एस.टी. शिंदे यांनी दिली. ही बस मुरुडवरुन सकाळी ६ वाजता तळा-इंदापूर-माणगाव-ताम्हीणीमार्गे स्वारगेट (पुणे) येथे साधारण ११ पर्यंत पोहचते. त्यामुळे या मार्गावरून पुणे येथे ५ तासात पोहचणे शक्य झाले आहे. ही बस स्वारगेट-भिगवण-चौफुला-इंदापूर-टेंभूर्णी-बार्शी-येडशीवरुन लातूरला पोहचते. तसेच, लातूरवरून सकाळी ६ वाजत मुरुडसाठी मार्गस्थ होते. या लांब पल्ल्याच्या बस सेवेमुळे मराठवाड्यातील नागरिकांना कोकण दर्शन शक्य होणार आहे.

### हरिहरेश्वरात 'खगोल दर्शन महोत्सव'

### खुले प्रश्नोत्तर सत्राचा समावेश

# ताऱ्यांच्या सान्निध्यात आकाश अनुभवण्याची संधी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त तसेच AstronEra च्या सहकार्याने हरिहरेश्वर येथे 'खगोल दर्शन महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय International Dark Sky Week निमित्त हा उपक्रम राबविण्यात येत असून, नागरिकांना प्रकाश प्रदूषणाविषयी जागरूक करत ताऱ्यांनी नटलेल्या आकाशाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा उद्देश आहे.

'प्रकाश म्हणजेच प्रदूषण' ही संकल्पना जनसामान्यांपर्यंत पोहोचवून अंधारातच



आकाशातील नैसर्गिक चमत्कार अनुभवता येतात, याची जाणीव करून देण्यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव २४, २५ व २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत हरिहरेश्वर येथील MTDC रिसॉर्ट परिसरात होणार आहे. याचबरोबर लोणार येथील पर्यटक स्वागत केंद्राजवळ MTDC रिसॉर्ट परिसरात समांतर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हरिहरेश्वर येथे हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून कोणतीही पूर्वनोंदणी आवश्यक नाही. "Drop-in' पद्धतीने नागरिकांना कधीही येऊन सहभाग घेता येणार असून इच्छुकांना स्वतःचे तंबू घेऊन येण्याची मुभा देण्यात आली आहे.

संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत प्रमाणित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध खगोलशास्त्रीय उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये खगोलशास्त्राची ओळख, इतिहास, दुर्बिणींचे कार्य यांची माहिती देण्यात येणार असून Venus, Jupiter, Moon तसेच Orion यांचे दुर्बिणीतून थेट निरीक्षण करता येणार आहे. याशिवाय 'Live Sky Storytelling', 'Guided Sky Navigation' आणि खुलं प्रश्नोत्तर सत्र यांचाही समावेश आहे.

या उपक्रमातून नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून आकाश निरीक्षणाची संधी मिळणार असून, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दलची आवड वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कार्यक्रमासाठी प्रवास, निवास व भोजनाची व्यवस्था स्वतः करावी लागणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. लोणार येथे प्रा. व्यवस्थापक म्हणून योगेश निरगुडे, तर हरिहरेश्वर येथे दीपक माने हे समन्वयक म्हणून कार्य पाहणार आहेत.

पर्यटन विभागाच्या या अभिनव उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले असून, 'चला, अविस्मरणीय क्षण अनुभवूया आकाश सगळ्यांसाठी आहे!' असा संदेश देण्यात आला आहे.

# अलिबागमध्ये सोमवारी जाहीर व्याख्यान

## ● डॉ. उदय निरगुडकर करणार अलिबागच्या नागरिकांना संबोधित

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमध्ये सोमवारी (दि.२७) जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. देशविघातक निरेटीव्हचा पर्दाफाश आणि २०४७ चा विकसित भारत या विषयांवर थोर विचारवंत, विश्लेषक, सुप्रसिध्द वक्ते डॉ. उदय निरगुडकर हे व्याख्याते असणार आहे. अलिबागमधील रविकिरण हॉटेलमधील सभागृहात सायंकाळी सहा वाजता हा उपक्रम अलिबागमधील कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने राबविला आहे.

कमळ कला व क्रीडा मंचातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबागकरांना डॉ. उदय निरगुडकर संबोधित करणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून प्रवेश सर्वांना खुला असल्याची माहिती कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके आणि कमळ कला व क्रीडा मंचच्या संयोजक ॲड. पल्लवी तुळपूळे यांनी दिली.

---

### कर्जत नगर परिषद

ता. कर्जत जि.रायगड पिन-४१०२०१
E-mail : karjatcouncil@gmail.com

जावक क्र. कनप/३०७/२६-२७ | दिनांक: २४/०४/२०२६

### ई-निविदा सुचना

कर्जत नगरपरिषद, जि. रायगड १. कर्जत नगरपरिषद जलशुद्धीकरण केंद्र येथे क्लोरीन गॅस पुरविणे. २. कर्जत नगरपरिषद जलशुद्धीकरण केंद्र येथे टी. सी. एल पावडर, आलम, पी. ए. सी पावडर पुरविणे. ३. कर्जत नगरपरिषद हद्दीतील वितरण जलवाहिनीवरील लिकेज ची कामे व इतर आवश्यक कामे करणे. ४.कर्जत नगरपरिषद येथील दहिवली जलशुद्धीकरण केंद्र व वंजारवाडी जॅकवेल येथील मशिनरी देखभाल व दुरुस्ती करणे. ५. कर्जत नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी हातपंप/ बोरिंग दुरुस्ती करणे. या कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपुर्ण निविदा प्रक्रीया ई निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धिपत्रक इत्यादीची माहिती : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद,कर्जत**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- मुद्रे खुर्द, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं./सि.स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नम्रता सुनिल गुप्ता | १५/१४/अ/ ९ | ४२५.६० | ८.५१ |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

---

### -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे आतोणे, तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील मिळकती त्यांचे मूळ मालक श्री.बालाजी ज्ञानोबा चिलमे रा.वडगांव पुणे यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भूधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| आतोणे | ४१ खाता नं.४९५ | १-३८-५० | ४-४४ | वर्ग-१ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

पाली
दिनांक : २४/०४/२०२६

**(ॲड. अमोल रामचंद्र कांबळे)**
मु.पो.पाली ता. सुधागड जि. रायगड
मो. ९०२८२४८५१७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे इंजिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक गणू खंडू मोडक यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४/१/क | ०१.४९.२० या एकूण क्षेत्रापैकी गणू मोडक यांचे मालकीचे ००.५२.०० हेक्टर आर. पॉ. या क्षेत्रापैकी ००.३०.०० हेक्टर आर. पॉ. इतके क्षेत्राच्या मिळकतीबाबत | ०४.१२ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५ एप्रिल २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गोंडाळे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-गोंडाळे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. रोहिदास गोविंद शिंदे | ४७६ | ०-४९-०० | ०-२५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी, वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १५ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली-सुधागड
दिनांक २४/०४/२०२६

सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु. पो. नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो. बा. नं. ८१४९६५१५०८

---

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) सचिन अनंत गोंधळी, २) संतोष अनंत गोंधळी, ३) प्रांजली प्रविण राऊत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | ६७२/२ | ०-०५-५० पो.ख. ०-००-०० एकुण ०-०५-५० | १.८६ |

दिनांक : २४/०४/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम
कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती वैशाली मनोहर धसाडे यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ११२/१/ब | ०-५३-६० | ११.४६ |

सदर मिळकतीपैकी श्रीमती वैशाली मनोहर धसाडे यांचे मालकीचे ०-२१-६० हे.आर. इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २५/०४/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
"अन्नपूर्णा", मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

---

### -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे अडुळसे, तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील मिळकती त्यांचे मूळ मालक श्रीम. देवर्ध्या रॉय, रा.अडुळसे, ता.सुधागड, जि. रायगड यांच्याकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भूधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| अडुळसे | ६५/अ खाता नं.९९९ | १६-२२-०० पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०-२०-०० | १७-४२ | वर्ग-१ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

पाली
दिनांक : २४/०४/२०२६

**(ॲड. अमोल रामचंद्र कांबळे.)**
मु.पो.पाली ता. सुधागड जि. रायगड
मो. ९०२८२४८५१७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हुमगांव ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक राजेश शांताराम राणे व अभिजित शत्रुघ्न शिंगोळे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४/४ | ००.५६.०० या एकूण क्षेत्रापैकी राजेश राणे व अभिजित शिंगोळे मालकीचे ००.२९.०० हेक्टर आर. पॉ. इतके क्षेत्राच्या मिळकतीबाबत | ००.३० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५ एप्रिल २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सरस्वती चिंतामण म्हात्रे, २) प्रदिप चिंतामण म्हात्रे, ३) गजानन चिंतामण म्हात्रे, ४) सुजाता रामचंद्र ठाकूर, यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| लोणारे, ता. अलिबाग | २३/५/ड | ०-१२-३० पो.ख ०-००-८० एकुण क्षेत्र ०-१३-१० | १.६३ |
| | २३/५/ब | ०-०५-८० पो.ख ०-००-५० एकुण क्षेत्र ०-०६-३० | १.०० |

अलिबाग,
दिनांक- २५/०४/२०२६

सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

---

# क्लासिफाईड

## जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **३५ गुंठे शेतजमीन विकणे आहे.** मौजे कावीर- गरूडपाडा, बोअरवेल आणि इलेक्ट्रिक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क : ९८६७५३०७२७
- **अलिबाग येथील होलसेल किराणा दुकानात** ऑफिस कामाकरीता योग्य कर्मचारी हवे आहेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. शिक्षण : १०, १२ आवश्यक. ९४२२६९११४७
- **अलिबागमधील नाश्ता बनविण्यासाठी** बाई पाहिजे. ७०६६१३८३६८
- **इलेक्ट्रिशिअन कामासाठी पाहिजे.** ७३७८४८०१५१
- **उसर, अलिबाग येथील गेल/एचपी कंपनीजवळ**, वेलवली बसस्टॉप नजीक नवीन इमारत (एकूण ११ सुसज्ज फ्लॅट) पार्किंग व्यवस्थेसह भाडे तत्त्वावर देणे आहे. कृपया इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. मोबाईल नंबर : ९४२३३८१६९४/८४५४८६२७६७

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत श्री. महेश माणिकराव पाटील यांच्याकडुन कायम मालकी हक्काने आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५१/१/ब/३/अ/२ | २.५२.०० | २५.२० |

वर नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत, तसेच त्यामध्ये बांधण्यात आलेली ग्रुप ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील घर मिळकत क्रमांक १३०३/१, क्षेत्र ७३० चौ. फूट अशा वर्णनाच्या मिळकती या नोटीसीचा विषय आहेत.

सदरच्या मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असून त्या विकणेचा त्यास हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या निरंतरचा हक्क, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज, वारसाहक्क, दान, लिएन, चार्ज, पोटगी अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत तक्रारी अथवा हरकती न आल्यास वरील मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे गृहित धरून माझे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/४/२०२६

सही/-
**ॲड. गीता सं. पवार**
०५ श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड

नोटीस प्रसिद्ध करण्यास आमची हरकत नाही.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक कु. श्वेता जितेंद्र म्हात्रे रा. वढाव, तालुका-पेण, जिल्हा - रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन - जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, तलाठी सजा वढाव, मौजे मोठे वढाव येथील गट नं. ५६ क्षेत्र ०-१५-२० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. १-९४ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-१५-२० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २५/०४/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७. मोबा. ९८८१९१५२१९

---

### सुधागड तालुका शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या.पेडली

मु. पेडली, पो. तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड नोंदणी
क्र. आरजीडी/एसजीडी/जीएनएल (ओ) ११३०/२०२२-२०२३/सन -२०२३
२३/०४/२०२६

### जाहिर सूचना

सुधागड तालुका शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या., पेडली, ता. सुधागड, जि. रायगड या संस्थेमार्फत नवीन पॅराबॉईल्ड राईस मिल प्रकल्पासाठी मशिनरी खरेदी व बांधकामाकरिता मध्यम मुदत कर्ज तसेच संचालक (कृषी प्रक्रिया व नियोजन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अनुदान मंजूर झालेले आहे. हा प्रकल्प सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) अंतर्गत सामाईक पायाभूत सुविधा (CIF) योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पासाठी खालील बाबींसाठी पात्र व अनुभवी पुरवठादार/ठेकेदारांकडून कोटेशन (दरपत्रके) मागविण्यात येत आहेत:

राईस मिलसाठी नवीन मशिनरी, बॉयलर, ETP, विद्युत जनरेटर व ट्रान्सफॉर्मर, इलेक्ट्रिकल मशिनरी, केबल व पॅनेल बोर्ड, सिव्हिल वर्क, मशिनरी इरेक्शन व फॅब्रिकेशन

सदर मशिनरी यादी व बांधकामासंबंधी सविस्तर माहिती संस्थेच्या राजेश राईस मिल इमारत, मु. कान्हीवली, पो. तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड -४१०२०५ येथील कार्यालयात नोटीस बोर्डवर दिनांक २५/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६ या कालावधीत उपलब्ध आहे.

इच्छुक व पात्र पुरवठादारांनी वरील कालावधीत कोटेशन सादर करावेत.

माहितीसाठी संपर्क:
मो. नं.: ८०८७८६२३८५
ई-मेल: sudhagadfarmer01@gmail.com

**चेअरमन**
**सुधागड तालुका शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या., पेडली,**

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अलिसन विवेक अरांनहा वगैरे ४ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २१ | २ | १-८३-९० पैकी ०-३७-०० इतके लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र | १-४५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२५/०४/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
फ्लॅट नं ३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
अभिनव ज्ञान मंदीर जवळ, कर्जत, कर्जत, रायगड

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. दत्ता मुरलीधर म्हात्रे रा. शिवडी, वडाळा, मुंबई व श्री. विलास शांताराम म्हात्रे रा. विठ्ठलवाडी, पेण-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, तलाठी सजा मोठे भाल, मौजे विठ्ठलवाडी येथील गट नं. २४९ क्षेत्र ०-२३-३० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ०-६६ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२३-३० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २५/०४/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७. मोबा. ९८८१९१५२१९

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे धोकवडे, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अविनाश माधव गद्रे यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता. अलिबाग | ५५४/२ | ०३-९६-९० पो.ख. ००-०९-०० एकुण क्षेत्र ०४-०५-९० | ०.०० |

वर नमुद मिळकतीपैकी श्री. अविनाश माधव गद्रे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-६३-४० हे. आर यापैंकी क्षेत्र ०-२२-०० हे. आर क्षेत्र खरेदीचा विषय आहे व सदर मिळकतीमध्ये श्री. अविनाश माधव गद्रे यांचे मालकीचे असलेले शेतघर त्यांची लांबी रूंदी उंची १४ X११ X५ ही शेतघर मिळकत ह्या सर्व बाबी जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी

कळावे,
श्री अविनाश माधव गद्रे.
अलिबाग,
दिनांक- २४/०४/२०२६

सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता- गुरूदत्त सोसायटी,
कन्याशाळेच्या बाजूला,
गाळा नं. २ ता. अलिबाग
जि. रायगड ४०२२०१
मो. नं. ९७६४२१४०१०

---

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

## १ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

## दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : कार्याची योग्य दखल घेतली जाईल. आत्मविश्वास ढळू देऊ नका. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **वृषभ** : सरकारी कामं मार्गी लागतील. दिलासादायक घटना घडतील. मित्र-नातलगांचं सहकार्य मिळेल,
- **मिथुन** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. विवाहाचे प्रयत्न सफल होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत ताण राहील. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. नोकरीचे प्रयत्न सुरू ठेवावेत.
- **सिंह** : मोठे आर्थिक व्यवहार तुर्तास नको. चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. विचारानं, संयमानं रहावं.
- **कन्या** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. नव्या योजना मार्गी लागतील. व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **तूळ** : अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. प्रवास शक्यतो टाळावा. विद्यार्थ्यांच्या कलांना उत्तम वाव मिळेल.
- **वृश्चिक** : भांवडांचं सौख्य लाभेल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. खरेदीचे व्यवहार मनासारखे होतील.
- **धनु** : कामाचा ताण वाढेल. प्रापंचिक समस्या हैराण करतील. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मकर** : व्यवहाराची बोलणी सफल होतील. आनंददायी घटना घडतील. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल.
- **कुंभ** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. धार्मिक यात्रेचं समाधान लाभेल.
- **मीन** : अनपेक्षित घटना संभवतात. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. कुलदेवतेची उपासना करा.

स्टाईल स्टेटमट

## पादत्राणांचं मनोहारी विश्व

✻ उन्हाळ्यातल्या कॅज्युअल लूकसाठी तुम्ही 'बो स्टाईल' स्लीपर घेऊ शकता. यामध्येही बरीच व्हरायटी पहायला मिळते. थ्रेड वर्कवाल्या स्लीपर्सही जीन्स, पलाझोवर चालून जातील. डेनिम स्टाईल स्लीपरही ट्रेंडी दिसते. या दिवसात डेनिम विथ थ्रेड वर्कवाल्या स्लीपर भाव खाऊन जातील.

✻ बूट स्टाईल पंजाबी मोजडी हा प्रकारही इन आहे युनिक प्रिंटवाल्या या मोजड्यांमुळे तुम्ही स्टाईल आयकॉन ठराल.

✻ पंजाबी मोजडी स्टाईल लोफर्स हा प्रकारही ट्राय करता येईल. अशा लोफर्सवरचं नाजूक काम तुम्हाला आकर्षित करेल.

✻ कॅज्युअल आउटिंग किंवा भटकंतीसाठी तुम्ही फ्लोरल प्रिंटवाले शूज घेऊ शकता. अशा प्रिंट्सची उन्हाळ्यात चलती असल्याने तुम्हाला बरीच व्हरायटी पहायला मिळेल.

## २५ एप्रिल

दिनविशेष

- २०१३ : रेल्वेच्या आगाऊ आरक्षणाची मुदत ६० दिवसांवर आणण्यात आली.
- २०१६ : विजय मल्ल्यांची खासदारकी रद्द केली पाहिजे, राज्यसभेच्या शिस्तपालन समितीचं मत.
- २०१७ : मालेगाव बॉंबस्फोटाच्या खटल्यातील आरोपी साध्वी प्रज्ञासिंहला जामीन मंजूर.
- २०१८ : आश्रमातील अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जोधपूरमधील विशेष न्यायालयाने आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

व्हॉट्स न्यू?

## आग विझवणारा 'फायर वास'

आग लागल्यावर आपण अग्निशमन दलाला फोन करतो. पण ते येईपर्यंत बराच वेळ जातो. पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न होतो. पण यात इजा होण्याची शक्यता असते. म्हणूनच सॅमसंगने अनोखा फ्लॉवरपॉट तयार केला आहे. हा फ्लॉवरपॉट फेकल्यावर आग पटकन विझते. यात आग विझवण्यासाठी वापरलं जाणारं पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण भरण्यात आलं आहे. आग लागलेल्या ठिकाणी हा फ्लॉवरपॉट फेकल्यानंतर तो तुटतो आणि त्यातून पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण बाहेर पडल्याने आग विझते. 'फायर वास' असं नाव या फ्लॉवरपॉटला देण्यात आलं आहे. नेहमीच्या फ्लॉवरपॉटप्रमाणेच तो घरात ठेवायचा. शोभेची वस्तू म्हणूनही तो वापरला जातो. मुख्य म्हणजे वेळेला पटकन मिळतो. या फ्लॉवरपॉटमधलं पोटॅशियम कार्बोनेट आग विझवतं. शिवाय आगीशी ऑक्सिजनचा संपर्क होऊ देत नाही. यामुळे आग पसरत नाही. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्र लावलेली असतात. पण त्यांच्या तुलनेत हा फ्लॉवरपॉट वापरायला अगदी सोपा आहे. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त आग विझवू शकतो. या 'फायर वास'चे व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहेत.

### पंचांग

**शनिवार, २५ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
वैशाख शु. ९, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : आश्लेषा, योग : गंड,
सूर्योदय ६.१७, सूर्यास्त ६.५७

### फॉरवर्ड्स

**अब ख़्वाईशें ख़ामोश होना सीख़ ग़यी...**

**शायद असर उम्र क़ा हावी हो रहा हों...!**

जाणून घ्या

## आत्मनिर्भर होण्यासाठी...

जगभरात अक्षय ऊर्जेचा वापर वाढला आहे. यामध्ये सौर ऊर्जेची महत्त्वाची भूमिका आहे. जगात सौर ऊर्जा मॉड्यूल तयार करण्यात चीनचा दबदबा आहे. चीनमधून इतर देशांना संसाधनांची निर्यात करण्यात येते. सौर ऊर्जा तयार करणारे पॅनल आणि इतर महत्त्वाचे साहित्य चीनमधूनच आयात करण्यात येते; पण ही परिस्थिती लवकरच बदलणार आहे. मोदी सरकारने देशातच सौर ऊर्जा साहित्याचे उत्पादन वाढवण्यावर आणि चीनकडील आयात कमी करण्यावर भर दिला आहे. यासाठी कंपन्यांना १९ हजार पाचशे कोटी रुपयांचे आर्थिक प्रोत्साहन दिले जात आहे.



त्यासाठी मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीज आणि रतन टाटा यांच्या टाटा पॉवरसहीत इतर परदेशी कंपन्यांनी बोली प्रक्रियेत सहभाग घेतला आहे. 'ब्लूमबर्ग'च्या एका अहवालानुसार रिलायन्स आणि टाटा या कंपन्याशिवाय अमेरिकेतील कंपनी 'फर्स्ट सोलर इंक', 'जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड', 'अवाडा ग्रुप अँड रिन्यू एनर्जी ग्लोबल पीएलसी' या कंपन्या स्पर्धेत आहेत. त्यांनीही वित्तीय बोली लावली आहे. 'हिंडेनबर्ग' अहवालाच्या दणक्यानंतर अदानी समूहाने या प्रक्रियेतून माघार घेतली. अदानी हा देशातील सर्वात मोठा सौर ऊर्जा उत्पादने तयार करणारा समूह आहे. ही बोली प्रक्रिया सरकारी कंपनी 'सोलर एनर्जी कॉर्पोरेशन'ने आयोजित केली होती. सरकार सौर ऊर्जा प्रकल्पात भारताला अग्रेसर करण्यासाठीही उपाययोजना आखत आहे.

### फॅशन पॅशन

✻ चिनोज तुम्ही वर्षभर कॅरी करू शकता. उन्हाळ्यात पेस्टल शेड्सच्या कॉटन चिनोजची निवड करा. या दिवसात काही भडक रंगही ट्राय करता येतील.

✻ फॉर्मल लूकमध्ये असाल तर चिनोजसोबत ऑक्सफर्ड, ब्रॉज किंवा लोफर यापैकी एखादे शूज घाला.

✻ कॅज्युअल लूकसाठी व्हाईट स्नीकर्स हा सर्वात बेस्ट पर्याय आहे. मात्र पांढऱ्या चिनोजवर त्याच रंगाचे स्नीकर्स घालू नका. तसंच चिनोज आणि स्नीकर्सचा रंग एक असणार नाही,याची काळजी घ्या.

करिअरवाटा

## औषधनिर्माणाच्या क्षेत्रात

विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या अनेकांचा वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि आय.टी. क्षेत्राकडे ओढा असतो. परंतु त्यामानाने फार्मसीकडे जाणाऱ्यांची संख्या कमी असते. वास्तविक या शाखेतही कारकिर्दीच्या अनेक चांगल्या संधी निर्माण होऊ शकतात. फार्मसीला 'औषध निर्माण शास्त्र' म्हणतात. या शाखेचं शिक्षणही अतिशय महत्त्वाचं आहे. मात्र या क्षेत्राविषयी अनेकांना व्यापक प्रमाणात माहिती नसते. फार्मासिस्ट म्हणजे औषधाच्या दुकानात चिठ्ठ्या वाचून औषधं देणारे एवढ्यापर्यंतच सामान्य माणसाचं या विषयीचं ज्ञान मर्यादित आहे. बऱ्याच लोकांना यापलीकडे फार्मासिस्टची काही कामं असतात याचीही माहिती नसते. मात्र हे सगळे गैरसमज दूर सारायला हवेत. अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश मिळाला नाही तर या अभ्यासक्रमाकडे वळण्याची मानसिकता बदलायला हवी. हा अतिशय महत्त्वाचा आणि खर्चिक असा अभ्यासक्रम आहे. त्याची उपयुक्तताही खूप मोठी आहे. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे औषधं तयार करणं, औषधांची मिश्रणं बनवणं ही कामंही फार्मासिस्ट करू शकतात. ही औषधे बनवताना त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांची माहिती त्यांना असते.



खेचाखेची

## अपमान !

जिव्हारी लागेल असा अपमान...
एम्लॉयी वर्किंग फ्रॉम होम.
**आई:** जा बाळा, बाजारातून जरा सामान घेऊन ये...
**मुलगा:** आई , आत्ता क्लएंटचा कॉल आहे. नंतर जाऊ का?
**आई:** 'आय ॲम वर्किंग ऑन इट' आणी 'आय विल गेट बॅक टू यू', एवढच बोलायच आहे ना? मी बोलते...
.
.
.
तू सामान घेऊन ये!

### वेगळं काही

जपानमधल्या एका रेस्टॉरंटमध्ये सोन्याचा बाथटब तयार करण्यात आला आहे. भाडं देऊन एक ते दहा तासांसाठी या टबमध्ये निवांत डुंबता येईल. एका तासाच्या वापरासाठी ग्राहकांना भारतीय चलनात तीन हजार रुपये भाडं भरावं लागेल. १८ कॅरेट सोन्यापासून बनवण्यात आलेला हा जगातला पहिलाच बाथटब असल्याचा या रेस्टॉरंटचा दावा आहे. इथल्या 'हॉट स्प्रिंग' रेस्टॉरंटने हा अनोखा टब तयार करून घेतला असून तो पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहे. चीन आणि दक्षिण कोरियातल्या ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन हा बाथटब तयार करण्यात आला आहे. या देशांमधल्या पर्यटकांकडून सोन्याच्या बाथटबची मागणी होत होती, असं रेस्टॉरंटच्या मालकांचं म्हणणं आहे.

## टेस्टी मँगो चीजकेक

रुचिरा

आंबा हे उन्हाळ्यातलं महत्त्वाचं आकर्षण असतं. मुबलक मिळणाऱ्या आंब्याचा वापर करुन विविध पाककृती बनवता येतात. आपण मँगो चीजकेक कसा बनवायचा ते पाहू या...



सामग्री – २० गोड बिस्किटं, पाव वाटी बटर, एक टेबलस्पून पिठीसाखर, एक वाटी मँगो पल्प, एक वाटी साखर, चवीपुरतं मीठ, चार अंड्यांचा बलक, तीन टेबलस्पून जिलेटीन, दोन वाट्या क्रीम, दोन वाट्या दही, आंब्याच्या फोडी इत्यादी.

कृती– बिस्किटांचा चुरा करून त्यात बटर आणि थोडी पिठीसाखर मिसळावी. मिश्रण एकजीव करुन केकच्या भांड्यात पसरुन घ्यावं. अर्धा कप पाण्यात जिलेटिन घालून सेट करायला ठेवावं. एका पातेल्यात मँगो पल्प, साखर, मीठ आणि अंड्याचा बलक एकत्र करुन मिश्रण मंद आचेवर एकजीव करून घ्यावं. गरम असतानाच मिश्रणात जिलेटिन मिसळून पातेलं गॅसवरून उतरवून घ्यावं. थंड झाल्यावर त्यात क्रीम घालावं. त्यानंतर दही मिसळावं. आता ते बिस्किटांच्या थरावर पसरून घ्यावं आणि सेट करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवावं. सर्व्ह करताना आंब्याच्या फोडींची सजावट करावी.

## सुडोकू ९६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | २ | | ७ | ३ | ९ | | | |
| | ७ | | २ | | १ | ९ | | ५ |
| | १ | | | | ४ | | | २ |
| | ८ | | | | | | | ७ |
| | | | १ | | ३ | | | |
| ५ | | | | | | | ४ | |
| २ | | | ४ | | | | ६ | |
| १ | | ७ | ३ | | २ | | ८ | |
| | | | ५ | ६ | ७ | | ९ | १ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ९५चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ५ | ९ | १ | ६ | ४ | ३ | ८ | २ |
| ३ | ८ | १ | ५ | ७ | २ | ९ | ४ | ६ |
| २ | ६ | ४ | ३ | ९ | ८ | ५ | १ | ७ |
| १ | ३ | ६ | ८ | ५ | ९ | ७ | २ | ४ |
| ९ | २ | ७ | ६ | ४ | ३ | १ | ५ | ८ |
| ५ | ४ | ८ | ७ | २ | १ | ६ | ९ | ३ |
| ६ | ९ | ३ | ४ | ८ | ५ | २ | ७ | १ |
| ४ | १ | २ | ९ | ३ | ७ | ८ | ६ | ५ |
| ८ | ७ | ५ | २ | १ | ६ | ४ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ९६



**आडवे शब्द :-**
१) गुरांचा घोळका
३) छ.शिवाजीराजांचा धर्मवीर पुत्र
७) मनात हेतू धरुन केलेले काम
९) मस्तकाखालचे शरीर
१०) होडी
११) आवाज
१२) वागणूक
१३) स्तुतीची गाणी,स्तोत्र
१५) मोठी टोपली
१७) सापाने टाकलेली त्वचा
१८) चाळीस शेर
१९) उत्सवाचे दिवस
२१) सावली
२२) तात्पर्य
२३) विविध
२४) मऊ, बारीक केस
२५) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी
२६) पोथीचे वाचन
२८) ग्रामप्रमुख
३०) पाठविलेला
३२) अरण्य
३३) सत्ता
३४) मागणारा
३६) बंगाल
३८) सारखा
३९) कपात
४१) तफावत
४२) वेड्यांचा दवाखाना
४३) पादत्राण
४४) एक धान्य
४५)अथवा, किंवा
४६) नामशेष
४९) सहाय्यक
५२) खोदकाम
५३) सामान
५४) सांभाळ
५५) जाडे भरडे कापड
५७) सूर्याचे एक नाव
५९) नशीब
६०) रुग्णालय
६२) शाळेतील शिक्षक
६४) घनदाट अरण्य
६६) अक्षरापुढची उभी रेघ
६८) वर्ष,साल
६९) सवती बद्दलचा द्वेष
७२) पतंगाचा धागा
७३) निर्लज्ज व्यक्ती
७४) एकूण एक, सर्व
७५) झकास, मस्त
७६) प्रजा, कुळे, कुळावरील कर
७८) शक्ती,बळ,चुरस
८०) कणीदार पीठ
८२) आणि
८३) वेल
८४) मनाला आकर्षित करणारा,सुंदर

**उभे शब्द :-**
१) पांढरसर रंग, कडक
२) पडणे
३) बाण,काठ
४) हिन्दुस्थान
५) प्राण
६) भोजन
७) खळबळजनक बातमी
८) माजलेला
९) द्रव्य
१४) वरपांगी
१६) भूमितीतील तीन कोन
१७) पूर्ण बदल
१८) प्राणांतिक वेदना
२०) ज्याचे नाव खराब झालेले असे असं
२२) मलई
२३) अपवित्र
२५) ओरखडा
२७) पोपट
२९) विड्याला टोचणारा मसाल्यातील पदार्थ
३१) वाईट इच्छा
३५) खरबरीत, झोंबणारे
३७) जहाज
४७) लक्ष्मीचे एक नाव
४८) सरकारी शालेय पुस्तक
५०) दयाळू
५१) जीवलग मित्र
५२) गाढव
५६) दुबळा,गरीब
५८) तमाशातील कलाकार
६०) जाळण्यास योग्य असे
६१) चौक
६३) च्या साठी
६५) मवाळ धोरण
६७) नावातील बदल
७०) गर्विष्ठ,माजलेला
७१) यशदायक
७५) संन्यासाचा अंगरखा
७७) कुबेराचा सेवक
७९) दारुचा एक प्रकार
८१) मित्र,प्रियकर.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

## हे कळ्यांना धुंदी फुलांना आशाताईंची मराठी सफर

**दिग्दर्शक राजा ठाकूर यांच्या 'धाकटी बहीण' या चित्रपटाचे काम पूर्ण होत आले होते. या चित्रपटाला सुधीर फडके यांनी संगीत दिले होते. अचानक एक दिवस राजा ठाकूर यांनी गीतकार जगदीश खेबुडकर यांच्याकडे माणसे पाठवली व आणखी एक गीत जे मध्यंतरापूर्वी चित्रपटात येणार होते, गाण्याची चाल ही तयार होती, ती चाल त्यांनी खेबुडकर यांच्या पुढे ठेवली व या चालीमध्ये एक चांगले प्रेम गीत लिहा, ज्यामध्ये पाने, फुले, चंद्र असे वातावरण तयार करा. हे गाणे ऐकून प्रेक्षक अगदी धुंद होतील याची काळजी घ्या. या मंडळींनी खेबुडकर यांना गाण्याची चाल ऐकवली. ते गेल्यानंतर त्यांनी त्या मंडळींचे शेवटचे शब्द 'धुंद ' हे लक्षात ठेवले आणि सुधीर फडके यांनी तयार केलेल्या चालीवर गाणे बांधले. ज्याची सुरुवात 'धुंद'ने झाली, गाण्याचे बोल होते 'धुंदी कळ्यांना, धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना'. हे गाणे आशा भोसले यांनी सुधीर फडके यांच्यासह चित्रपटात गायले. ते गाणे नायक अरुण सरनाईक व नायिका अनुपमा यांच्यावर चित्रित झाले व ते खूप गाजले.**




रंगबहार

**शरद कोरडे**

आशाताईंनी मराठीमध्ये मास्टर विनायक कर्नाटकी यांच्या 'माझे बाळ' या १९४३ सालच्या चित्रपटात पहिले गाणे दत्ता डावजेकर यांच्या संगीतात गायले होते. पुढे दत्ता डावजेकर यांनी आशा भोसले यांना आपल्या पुढील चित्रपटांसाठी विविध प्रकारची गाणी दिली. १९६३ सालच्या 'सुखाची सावली' या गजानन जागीरदार दिग्दर्शित चित्रपटांत आशा भोसले यांनी एक सुंदर गीत गायले होते 'रामा रघुनंदना, आश्रमात या कधी रे येशील रामा रघुनंदना', त्यानंतर 'वैशाख वणवा' या १९६४ सालच्या चित्रपटांत दोन अवघड गाणी आशा भोसले यांना दिली ती होती 'झाली बहाल मर्जी सख्याची साडी दिली शंभर रुपयांची' व 'सासरच्या घरी आले' ही दोन लोकप्रिय गाणी अशा ताईंनी गायली. या चित्रपटात रमेश देव, जयश्री गडकर व जीवनकला हे कलाकार होते. हा चित्रपट खूप यशस्वी झाला. त्यानंतर राजा परांजपे यांच्या 'पडछाया' या १९६५ सालच्या चित्रपटात आशाताईंनी एक लावणी गायलेली होती 'ऐन दुपारी, यमुना तिरी, खोडी उगी काढली बाई माझी करंगळी मोडली' ही लावणी लीला गांधी व सचिन यांच्यावर चित्रीत झाली होती. दत्ता डावजेकर यांनी आशाताईंच्या शैलीत बसतील अशी गाणी मराठीमध्ये दिली. संगीतकार सी. रामचंद्र यांनी राजा ठाकूर यांच्या 'घरकुल' या चित्रपटासाठी 'मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे' व 'पप्पा सांगा कुणाचे', हे गाणी आशाताईंना गायला दिली व त्यांनी त्याचे सोने केले. संगीतकार सुधीर फडके यांच्यासोबत मराठीत अनेक चित्रपटांतून आशाताईंनी गाणी गायली, त्यानंतर 'का रे दुरावा का रे अबोला, अपराध माझा असा काय झाला'- मुंबईचा जावई. 'तुला पाहते रे तुला पाहते, जरी आंधळीने तुला पाहते'- जगाच्या पाठीवर, 'या सुखांनो या'- या सुखांनो या, 'बाई मी पतंग उडवीत होते', 'चंद्र आहे साक्षीला', आदी गाजलेली गाणी आशाताईंच्या वाट्याला आली.

वसंत जोगळेकर यांच्या १९७६ च्या 'हा खेळ सावल्यांचा' या चित्रपटातील अतिशय गाजलेले हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीत दिलेले 'काजळ रातीत ओढून नेला, सखे ग साजना माझा' हे वेगळ्या घाटण्यातील गाणे आशा भोसले यांनी आपल्या अप्रतिम आवाजात लोकप्रिय केले. गुरुदत्त फिल्म 'जिव्हाळा' या मराठी चित्रपटात संगीतकार श्रीनिवास खळे यांनी 'चंदाराणी चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी' हे बालगीत खेळकर आवाजात अशा भोसलेंकडून गाऊन घेतले. या चित्रपटातील सर्वच गाणी लोकप्रिय झालेली होती.

गीतकार सुधीर मोघे एकदा पुण्याहून पहाटे मुंबईकडे निघाले होते, त्या दिवशी त्यांच्या 'लक्ष्मीची पावले' या चित्रपटांतील गाण्याचे ध्वनिमुद्रण होणार होते. पुण्याहून निघाल्यावर वाटेल सुधीर मोघे यांचा डोळा लागला, ते जेव्हा जागे झाले तेव्हा गाडी खंडाळ्या घाटातून उतरत होती, बाजूला आत्ताच सूर्योदय झाल्यामुळे किरणे दरी खोऱ्यातून पसरली होती. डोंगरांतील धुक्यामुळे ती किरणे सोनेरी आणि आकर्षक दिसत होती. ते दृश्य पाहून मोघे विस्मईत व चकित झाले. पुढे घाटातून मुंबईपर्यंतच्या प्रवासात त्यांनी एक गीत तयार केले. मुंबईत पोहोचल्यानंतर श्रीधर फडकेंकडे त्यांनी ते गीत दिले. त्यांना ते खूप आवडले. त्यांनी त्याच चित्रपटासाठी ते गीत संगीतबद्ध केले. ते गीत होते 'फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश, दरी खोऱ्यातून वाहे एक प्रकाश प्रकाश'. दिग्दर्शक जी. जी. भोसले व संगीतकार श्रीधर फडके यांनी या चित्रपटासाठी सात गाण्याची योजना केली होती, त्यात हे नवीन गीत मिळविण्यात आले. या चित्रपटांतील आठ गाण्यांपैकी पाच गाणी आशा भोसले यांनी गायली होती, ही सर्व ही गाणी खूप लोकप्रिय झाली. पुढे श्रीधर फडके यांनी

१९९४ मध्ये 'ऋतु हिरवा' नावाचा गाण्यांचा अल्बम तयार केला, त्यात मराठीतील नामवंत गीतकारांची गीते घेण्यात आली होती. त्यात सुरेश भट, शांता शेळके, बा.भ. बोरकर सौमित्र, नितीन आखावे व सुधीर मोघे यांच्या गाण्याचा समावेश होता. ही सर्वही गाणी आशा भोसले यांनी गायले होती. 'ऋतू हिरवा' या अल्बमला खूप मोठी लोकप्रियता मिळाली.

संगीतकार अनिल अरुण यांनी कवी शांताराम नांदगावकर यांच्या गीतांवर 'रुपेरी वाळूत माडाच्या बनात' हा अल्बम तयार केला होता, त्यांतील सर्व गाणी आशा भोसले यांनी गायली होती. त्यात 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात ये ना', हरिनाम मुखी रंगते, 'स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाच केव्हा', 'येऊ कशी प्रिया', आदी गाण्यांचा समावेश होता. त्यानंतर अनिल अरुण यांच्यासह नवरी मिळे नवऱ्याला, धूम धडाका, भुताचा भाऊ, अशी ही बनवाबनवी व अष्टविनायक आदी चित्रपटांसाठी आशा भोसले यांच्याकडून गाणी गाऊन घेतली. आशा भोसले यांनी अनेक दिग्गज संगीतकारांच्या मार्गदर्शनाखाली अजरामर मराठी गाणी गायली. त्यांत भावगीते, प्रेम गीते, लावणी, गझल, लोकगीते, भक्तीगीते अशा विविध शैलीतील गाण्यांचा समावेश आहे. हृदयनाथ मंगेशकर आणि आशा भोसले यांची जोडी मराठी भावगीते व भावसंगीतांत यशस्वी मानली जाते, त्यांचे अनेक प्रयोगात्मक गाण्यांनी इतिहास घडविला आहे. केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली,- सुधीर भट, नभ उतरू आलं,- ना.धों महानोर, तरुण आहे रात्र अजून,- सुरेश भट. जांभुळ पिकल्या झाडाखाली, - महानोर. चांदणे शिंपीत जाती चालता तू चंचले, आदी गाण्यांचा समावेश आहे. आशा भोसले यांनी संगीतात प्रवेश करण्यापूर्वी जरी कोणा गुरूकडून शिक्षण घेतले नसले तरी त्यांनी लहानपणापासून आपल्या वडिलांचे गाणे व मोठे बहीण लता मंगेशकर यांची गाणी ऐकून त्यांनी त्यावर रियाज करून आपल्या गाण्याची एक स्वतंत्र शैली निर्माण केली होती. संगीत क्षेत्रात स्थिर झाल्यावर त्यांनी मास्टर नवरंग नागपूरकर यांच्याकडे काही काळ शिक्षण घेतले, त्यांच्या उत्तरआयुष्यात त्यांनी उस्ताद अली अकबर खा साहेब यांचा गंडा बांधला होता. सुरश्री केशरबाई केरकर म्हणाल्या होत्या की, ''आशाने मेहनत घेतली तर ती ख्याल गायकी ही चांगल्या प्रकारे गाऊ शकेल''. आशा भोसले यांनी गायलेल्या अजरामर गाण्यांमध्ये साधी भोळी मीरा साधी भोळी राधा, देश हा देव असे माझा, हृदयी प्रीत जागते जाणता अजाणता, येरे घना येरे घना, जिवलगा कधी रे येशील तू, दूर राहुली पाहू नको रे, चंदाराणी चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी, सखी ग मुरली मोहन मोही मना, एक झोका चुके काळजाचा ठोका, प्रिया तुझं काय दिसे स्वप्नात, काजळ रातीत ओढून नेला सखे ग साजण माझा, कशी झोकात चालली कोळ्याची पोर, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला, विसरशील खास मला दृष्टी आड होता, विकत घेतला शाम, खुलविते मेहंदी माझा रंग गोरापान, अत्तराचा फाया तुम्ही मला आणा राया, आज आनंदी आनंद झाला, रिमझिम पाऊस पडे सारखा, आज प्रीतीला पंख हे लाभले रे, आदी गाण्याचा समावेश आहे. आशा भोसले ह्या मराठी चित्रपट क्षेत्रातील महान पार्श्वगायिका होत्या. त्यांना एकूण १८ वेळा महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. हा एक विक्रम होता. त्यांच्या आवाजात एक नवीन महिलावादी आवाजाचा उदय होता, चंचलपणा, आत्म विश्वास व आत्मजागृती तसेच विना संकोच भावनांच्या प्रकटी करण्याचा एक सुरेख संगम होता. एक शांत वेदना होती, तसेच उत्साहाने भरलेल्या आनंदाचा झरा होता. आवाजाचा चढउतार आणि शब्दांमधील भाव व्यक्त करण्याची शैली यामुळे त्यांची गाणी आजही लोकप्रिय आहेत. आशाताईंनी सन २०१३ मध्ये 'माई' या चित्रपटात महत्त्वाची भूमिका केली होती, ज्यांत त्यांनी अल्झायमर, स्मृतीभ्रम झालेल्या वृध्देचे काम केले होते. त्यात ८९ वर्षाच्या आशाताईंनी ६५ वर्षाच्या महिलेचे काम केले होते. हा एक पारिवारिक नाट्यमय चित्रपट असून त्यात मुले आपल्या वृद्ध माता-पित्यांना सोडून अन्य ठिकाणी राहतात व त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात या समस्येवर हा चित्रपट बेतलेला होता. या चित्रपटात त्यांनी दोन गाणीही आशाताईंनी गायली होती. पद्मिनी कोल्हापुरे, राम कपूर, क्षिति जोग, अनुपम खेर या कलाकारांनी यांत कामे केले होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन महेश कोडियन यांनी केले होते. असे आशाताईंचे सर्व समावेशक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. आशाताईंच्या जाण्याने मराठी हिंदी चित्रपटसृष्टीतच नव्हे, तर सर्वच क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे, जी कधीही भरून येणार नाही. ●●

## फर्स्ट लेडी सुपरस्टार ऑफ बंगाली सिनेमा कानन देवी

चित्रपटसृष्टीत जेव्हा चित्रपटाचे बजेट १५ - २० हजार असायचे आणि सिनेमाचे तिकीट सुमारे ३० पैसे होते, त्याकाळात एक सुपरस्टार गायक अभिनेत्री होती जी एका गाण्यासाठी १ लाख रुपये आणि एका चित्रपटासाठी ५ लाख रुपये घेत असे. ती चित्रपटसृष्टीतील पहिली अभिनेत्री होती, जिचे पोस्टर्स रस्त्यावर विकले गेले आणि तिच्या सौंदर्याचे दिवाने असणारे तरुण हे पोस्टर आपल्या रुममधील भिंतीवर लावत असत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीच्या गायक तारकांपैकी एक असणाऱ्या आणि बंगाली चित्रपटसृष्टीतून हिंदी चित्रपटसृष्टीत आलेल्या पहिल्या सुपरस्टार काननदेवी यांना एवढी प्रसिध्दी मिळाली, हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुपरस्टार झाल्यात, हॉलिवूडलाही जावून आल्यात तरी कानन देवी यांचा प्रवास सोपा नव्हता. संघर्ष लहानपणापासूनच जीवनाच्या पाचवीला पूजला होता. कानन देवी यांचा जन्म २२ एप्रिल १९१६ रोजी पश्चिम बंगालमधील हावडा येथे एका गरीब कुटुंबात झाला. घरच्या गरीबीच्या परिस्थितीमुळे मूळ पालकांनी रतनचंद्र दास आणि राजोबाला या जोडप्याला कानन देवी दत्तक दिल्या. श्रीमंत असणाऱ्या रतनचंद्र यांनी काननदेवींवर खऱ्या मुलीपेक्षा जास्त प्रेम केले. त्यांना अगदी लहान वयातच संगीताचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. मात्र नशीबात फार काळ सुख नव्हते. काननदेवी ६ वर्षाच्या असतांना त्यांना दत्तक घेणाऱ्या रतनचंद्र यांचे निधन झाले.



रतन आणि राजोबाला यांच्याशिवाय त्या घरात कोणीच नव्हते. रतनचे कर्ज फेडण्यासाठी आई राजोबाला यांचे दागिनेही विकले गेले. कुटुंब रस्त्यावर आले होते. घराचे भाडे भरण्यासाठी पैसे नसल्याने राजोबाला व कानन यांना भाड्याच्या घरातून बाहेर निघावे लागले. राजोबाला ६ वर्षांच्या काननसोबत कोलकात्यातील श्रीमंत लोकांच्या घरात काम करू लागल्या. काननही त्यांना छोट्या छोट्या कामांमध्ये मदत करू लागली. शाळेत जाण्याच्या वयात कानन यांच्या नशीबी नोकराचे जीणे आले.

**श्रीराम शेटये**


त्यांच्या परिस्थितीची दया येवून एका नातेवाईकाने त्यांना स्वतःच्या घरी राहण्यास बोलावले. आतातरी दोन घास सुखाचे मिळतील म्हणून दोघी या नातेवाईकाकडे राहण्यास गेल्या पण इथेही दुर्दैवाने पाठ सोडली नाही. या नातेवाईकाने परिवारातील सदस्य म्हणून नाही तर घरातील कामे करायलाच त्यांना बोलावले होते. तो त्यांना तासनतास त्यांना घरातील काम करायला लावायचा. सोबत दूषणंही द्यायचा. या नातेवाइकांचे अत्याचार वाढत होते पण दुसरीकडे आधार नाही म्हणून दोघी त्याच्याकडे रहात होते. पण एक दिवस जेव्हा राजोबाला यांच्या हातून काचेची डिश फुटली तेव्हा अत्याचाराची मर्यादा ओलांडली गेली. प्रतिदिन अपमान सहन करत जगण्यापेक्षा स्वाभिमानाने उपाशी मेलेले चालेल या विचाराने राजोबाला यांनी सात वर्षाच्या काननदेवींना घेऊन नातेवाईकाचे घर सोडले. या घटनेचा काननदेवींच्या मनावर कायमचा ओरखडा उमटला. तिने मनाशी ठरवले की ती आता कोणाच्या घरात राहणार नाही. हा निर्णय त्यांनी आजीवन अंमलात आणला. पुढे लग्नानंतरही त्या पतीच्या घरी रहायला गेल्या नाही तर त्यांना आपल्या घरी राहण्यास भाग पाडले. ज्या नातेवाईकांनी अपमान केला होता, त्यांना कधीच माफ केले नाही. केवळ आईच्या सांगण्यावरून त्यांना मदत केली. नातेवाइकांचे घर सोडल्यानंतर कानन आणि राजोबाला हावडा येथे परतले. एका वैश्यावस्तीजवळ छोटेसे घर घेवून, छोटी कामे मिळवून उदरनिर्वाह करु लागल्या. या दोघींच्या हलाखीच्या परिस्थितीवर दया येवून त्यांचे नाटकातून अभिनेता काम करणारे कौटुंबिक मित्र तुलसी बॅनर्जी म्हणजे काननदेवींचे काकाबाबू यांनी १० वर्षाच्या काननची मदन थिएटर आणि ज्योती थिएटरमध्ये शिफारस केली. बालपणापासूनच अतिशय सुंदर दिसणाऱ्या व तीक्ष्ण स्मरणशक्ती असणाऱ्या काननदेवींच्या हुशारी आणि सौंदर्याने प्रभावित होऊन मदन मूव्ही स्टुडिओने त्यांना चित्रपटातील भूमिकांसाठी दरमहा ५ रुपये पगार देऊन करारबद्ध केले. जयदेव या चित्रपटात त्यांना छोटीशी भूमिका मिळाली. खरे तर, कानन यांचा करार २५ रुपयांचा होता, परंतु मदन मुव्हीवाले त्यांना फक्त ५ रुपये देत असत. १९२८ - १९३१ पर्यंत कानन यांनी काही चित्रपटांमध्ये भूमिकांसोबत त्या काळातील संगीतकार हीरेन बोस, गीतकार धीरेन दास आणि कवी काझी नझरूल इस्लाम यांच्यासोबत काही गाणीही रेकॉर्ड केली.

तो काळ चित्रपटसृष्टीत महिलांची मोठी कमतरता असण्याचा होता. तरीही चित्रपटांमध्ये महिलांना कधीही आदराने वागवले जात नसे. कानन देवी परिस्थितीने चित्रपटांमध्ये आल्या होत्या. आपल्या अभिनय गुणांवर त्यांना ओळखही मिळाली, पण आदर मिळाला नाही. दिसायला सुंदर होत्या तरी अनेक दिग्दर्शकांनी त्यांचा अपमान केला परंतु कानन यांनी आत्मसन्मानाशी कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे अनेक चित्रपट हातातून गेले. काही चित्रपटांचे चित्रीकरण थांबले. कानन बालपणातील आर्थिक अडचणींमुळे कधीही शाळेत जाऊ शकल्या नाहीत, पण चित्रपटसृष्टीत काम सुरु केल्यावर पैसे येताच कानन यांनी इंग्रजी, गणित, इतिहास शिकण्यासाठी एक वैयक्तिक शिक्षक नियुक्त केला. या अभ्यासाच्या जोरावर मग पुढे शंकराचार्य, ऋषिर प्रेम, जोरेबरत, विष्णू माया, प्रल्हाद यांसारख्या गाजलेल्या चित्रपटात आपल्या स्पष्ट शब्दोच्चार आणि अभिनयाने बंगाली चित्रपटसृष्टीवर अमीट छाप सोडली. काननदेवींचे नाव गाजू लागले होते. त्यांच्या नावाने चित्रपटाला गर्दी होत असे. विशेष म्हणजे विष्णू माया आणि प्रल्हाद या चित्रपटात तर कानन देवींनी चक्क मुख्य पुरुष भूमिका साकारल्या होत्या. प्रसिध्दी मिळाल्यावर आपले कानन बाला हे नाव बदलून त्यांनी काननदेवी केले. वयाच्या २१ व्या वर्षापर्यंत आपल्या सौंदर्याने आणि उत्कृष्ट अभिनयाने त्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणून प्रसिध्द झाल्या होत्या.

राधा फिल्म कंपनीसोबत काम करत असताना कानन देवी सुपरस्टार बनल्या होत्या. त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये सर्वाधिक मानधन घेणाऱ्यांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर होते. चित्रपटाचे बजेट १५-२० हजार रुपये आणि तिकीट सुमारे ३० पैसे असतांना होते, तेव्हा कानन एका गाण्यासाठी १ लाख रुपये आणि एका चित्रपटासाठी ५ लाख रुपये मानधन घेत असत. त्या काळातील त्या फॅशन आयकॉनही होत्या. चित्रपटांमध्ये कानन देवी यांनी परिधान केलेले कपडे, दागिने त्यांची केशरचना यांची सर्वस्तरातील महिलांकडून अनुकरून केले जात होते. त्या कुठे गेल्या की, त्यांना बघायची इच्छा असलेल्या लोकांची गर्दी जमायची त्यामुळे त्यांना मोठ्या सुरक्षेसह इच्छित स्थळी पोहचावे लागत असे. काननदेवी यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत, एकूण ५७ चित्रपटांमध्ये काम केले, तर सुमारे ४० गाण्यांना आवाज दिला.चित्रपटातील मूक युगा संपल्यानंतर चित्रपट बोलू लागला. या ध्वनीपटांमध्ये काननदेवींना यश गवसले. त्यांच्या अभिनय व गाण्याची चर्चा भारतातच नव्हे, तर हॉलिवूडच्या मासिकातदेखील झळकू लागली. उत्कृष्ट गायनामुळे, त्याकाळातील मेगाफोन या ग्रामोफोन कंपनीने त्यांना गायिका म्हणून नियुक्त केले होते. कानन यांनी भीष्मदेव चॅटर्जी, अनादी दस्तीदार यांसारख्या दिग्गजांकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले होते. त्या न्यू थिएटर्स कंपनीच्या आघाडीच्या गायिका झाल्यात, परंतु १९४१ मध्ये कंपनीशी असलेला करार संपुष्टात आणत त्यांनी हिंदी आणि बंगाली चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते के. एल. सेहगल, पंकज मलिक, प्रथमेश बरुआ, पहाडी संन्याल, छबी बिस्वास, अशोक कुमार यांच्यासोबतही कानन देवींनी भूमिका केल्यात. जवाब या चित्रपटातील दुनिया ये दुनिया, है तूफान मेल हे कानन देवींचे गाणे इतके हिट झाले की त्यांनी ते नंतर हॉस्पिटल, बनफूल, राजलक्ष्मी या तीन चित्रपटांमध्ये वापरले. १९३० मध्ये काननदेवींच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. कानान देवी यांचे आयुष्य अनेक अदभूत प्रसंगानी भरलेले होते. ●●

## 'वध २'चा रहस्यमय प्रवास

'वध २' हा चित्रपट म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीतील गूढ आणि थराराचे एक गडद लेणे असून नेटफ्लिक्सच्या पडद्यावर हा रहस्यमय प्रवास उलगडत आहे. या चित्रपटाची मूळ कल्पना एका सामान्य मध्यमवर्गीय दांपत्याच्या आयुष्यातील कठोर वास्तव आणि त्यांच्या हातून घडलेल्या अनपेक्षित संघर्षाभोवती गुंफलेली आहे. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्यासारख्या उत्तम कलाकारांनी आपल्या मर्मभेदी अभिनयाने या कथानकात प्राण फुंकले आहेत. लव फिल्म्स आणि जे स्टुडिओज या प्रतिष्ठित संस्थांनी या थ्रिलरची निर्मिती केली असून दिग्दर्शक राजीव बर्नवाल आणि जसपाल सिंग संधू यांच्या निमित्ताने हा चित्रपट प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवण्यासाठी सज्ज झाला आहे. ग्वाल्हेरच्या ऐतिहासिक आणि शांत गल्ल्यांमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून, तेथील रांगड्या वातावरणाने चित्रपटाला एक अनामिक भीती आणि वास्तववादाची जोड दिली आहे. सुमारे १५ ते २० कोटी रुपयांच्या मर्यादित पण प्रभावी बजेटमध्ये साकारलेला हा चित्रपट दृष्टीसुखापेक्षा मानवी मानसिकतेच्या खोलात जाणारा एक अद्भूत नमुना आहे. हा चित्रपट रहस्यमय चित्रपटांच्या चाहत्यांसाठी बुद्धीचातुर्य आणि थराराची एक अविस्मरणीय मेजवानी ठरेल.



## रंगभूमीवर हास्याची कारंजी

'कॅरी ऑन स्पायगिरी' हे सध्या मराठी रंगभूमीवर चर्चेत असणारे नाटक हास्याचे कारंजे उडवणारा एक अस्सल विनोदी नजराणा आहे. जाहिरातक्षेत्रातील दिग्गज आणि उपरोधाचे बादशहा भरत दाभोळकर यांच्या कल्पकतेतून आणि दिग्दर्शनातून ही विचित्र पण रंजक कथा आकाराला आली आहे. एका मध्यमवर्गीय भारतीय गुप्तहेराची आणि त्याच्या अतरंगी मोहिमांची ही शब्दांच्या पलीकडची कहाणी प्रेक्षकांना खळखळून हसवण्यासाठी सज्ज आहे. अश्विन गिजरे निर्मित हे नाटक बुद्धीचातुर्य आणि विनोदाचा एक अथांग महासागर आहे. या नाटकाचे मुख्य आकर्षण म्हणजे भरत दाभोळकर यांची अमोघ शैली आणि त्यांना साथ देणारी अभिनयसम्राटांची मांदियाळी. मुंबई-पुण्यासारख्या सांस्कृतिक पंढरीतील विविध नाट्यगृहे या नाटकाच्या प्रयोगांनी दुमदुमून निघत आहेत. नाटकाचे नेपथ्य म्हणजे दृश्यसौंदर्याचा एक आविष्कार असून, संवादातील धार आणि टायमिंगमुळे हे नाटक रसिकतेच्या दरबारात नशीब आजमावत आहे. तालमींच्या वेळी कलाकारांच्या समयसूचकतेमुळे होणाऱ्या हास्याच्या स्फोटांची प्रचिती आता प्रेक्षकांना प्रयोगादरम्यान येत आहे.



'हाऊस मेट्स' ही मिनी-सीरीज म्हणजे आधुनिक शहरी जीवनातील मैत्रीचा एक अवीट गोडवा आणि नात्यांमधील रेशीमगाठी उलगडणारा एक हृदयस्पर्शी कलाविष्कार आहे. लोकप्रिय डिजिटल प्लॅटफॉर्मच्या कल्पकतेतून साकारलेली ही मालिका म्हणजे तरुणाईच्या मनाचे पडसाद उमटवणारे एक मखमली दालन आहे. एकाच छताखाली राहणाऱ्या भिन्न स्वभावाच्या मित्रांमधील भावभावनांचा कल्लोळ आणि निखळ मैत्रीचा ओलावा यात अत्यंत सहजसुंदर पद्धतीने गुंफला आहे. अत्यंत मर्मभेदी पद्धतीने या मालिकेची मांडणी केली गेली असून यात झळकणारे कलाकार हे मराठी रंगभूमी आणि डिजिटलविश्वातील उदयोन्मुख तारे आहेत. मध्यमवर्गीय गृहसजावटीच्या पार्श्वभूमीवर मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील गजबजलेल्या वातावरणात याचे चित्रीकरण झाले आहे. सुमारे ५ ते १० लाखांच्या कौशल्याने नियोजित केलेल्या बजेटमध्ये साकारलेली ही मिनी-सीरीज गुणात्मकतेच्या शिखरावर विराजमान आहे. चित्रीकरणादरम्यान कलाकारांमधील उत्तम केमिस्ट्रीमुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मर्मबंधातील ठेव ठरु शकते. एकंदरीत, एप्रिलचा हा अखेरचा टप्पा कलासक्त रसिकांसाठी आनंदाची एक अलौकिक पर्वणी ठरणार आहे.

पडद्यावरील चंदेरी दुनियेतील थरार असो किंवा रंगभूमीवर साक्षात घडणारा जिवंत अभिनय, प्रत्येक कलाकृती मानवी भावविश्वाला स्पर्श करणारी आहे. सर्जनशीलतेचा हा बहर मनाला तृप्त करून सांस्कृतिक श्रीमंतीचा समृद्ध वारसा नव्या जोमाने आपल्यासमोर मांडत आहे.





## नात्यांमधील रेशीमगाठी : हाऊस मेट्स

# शंकूच्या आकाराचा फूजियामा

फूजियामा हा जपानमधील सर्वात उंच आणि प्रसिद्ध पर्वत आहे. जपानी भाषेत याला फुजी-सान असे म्हणतात. त्याची उंची सुमारे ३,७७६ मीटर आहे. हा एकस्तरित ज्वालामुखी प्रकारातील पर्वत आहे. म्हणजेच तो लाव्हा, राख आणि खडकांच्या थरांपासून तयार झाला आहे.

फूजी पर्वताचे वय साधारण १ लाख वर्षे मानले जाते. मात्र सध्याचा दिसणारा शंकूसारखा आकार सुमारे १०,००० वर्षांपूर्वी तयार झाला असे संशोधकांचे मत आहे. हा ज्वालामुखी अजूनही सक्रिय मानला जातो. त्याचा शेवटचा उद्रेक १७०७ साली झाला होता. पण भविष्यात पुन्हा उद्रेक होऊ शकतो असे शास्त्रज्ञ मानतात. फूजियामा हा जपानमधील फुजी ज्वालामुखी पट्ट्याचा भाग आहे. हा पट्टा पॅसिफिक रिंग ऑफ फायरमध्ये येतो. त्या स्थानी पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील प्लेट्स एकमेकांवर आदळतात. त्यामुळे या भागात ज्वालामुखी आणि भूकंप जास्त प्रमाणात होतात. कोमिताके, जुना फूजी आणि नवीन फूजी या तीन जुन्या ज्वालामुखींच्या थरांवर फूजी पर्वत तयार झाला आहे. अर्थात फूजी पर्वत पूर्णपणे ओसाड नाही. त्याच्या पायथ्याशी आणि मधल्या भागात झाडे, जंगले आणि वन्यजीव आढळतात. मात्र वरच्या भागात हवामान थंड आणि कठीण असल्यामुळे फारशी वस्ती नाही. साधारणपणे पर्वताच्या पायथ्यापासून काही किलोमीटर अंतरावर गावे आणि शहरे सुरु होतात. टोकाजवळ मात्र कायमस्वरूपी मानवी वस्ती नाही. फूजी परिसरात ज्वालामुखीमुळे तयार झालेले बेसॉल्ट आणि लाव्हा खडक आणि खनिजे आढळतात. हे खडक जमिनीला सुपीक बनवतात. हा ज्वालामुखी सध्या शांत असला तरी तो पूर्णपणे मृत झालेला नाही. शास्त्रज्ञांच्या मते तो सक्रिय श्रेणीतच येतो. म्हणजेच भविष्यात कधीतरी पुन्हा उद्रेक होण्याची शक्यता आहे. शांत होणे म्हणजे कायमचा उद्रेक थांबणे. पण फूजी अजून त्या टप्प्यावर पोहोचलेला नाही. हजारो वर्षे तो शांत राहू शकतो. पण पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता कायम असते. म्हणूनच शास्त्रज्ञ त्यावर सतत लक्ष ठेवून असतात.



गोष्टी पर्वतरांगांच्या


# एटीएम ओळखणार चेहरा!

सध्या एटीएम मशीनद्वारे पैसे काढले जातात. रस्तोरस्ती, गल्ली-गल्ली एटीएम बूथ पहायला मिळतात. काही वेळा भलताच माणूस एटीएममधून एखाद्याचे पैसे काढून नेऊ शकतो. सुरक्षेचें कितीही उपाय केले तरी गैरप्रकार होतच असतात.म्हणूनच इंटेलने अनोखं तंत्रज्ञान सादर केलं असून यामुळे एटीएम मशीन वापरकर्त्याचा चेहरा बघून त्याला ओळखेल. यासोबतच घरातली विविध उपकरणं चालू किंवा बंद करण्यासाठीही या तंत्रज्ञानाचा वापर करता येणार आहे. यामुळे स्मार्ट लॉक तसंच घराचं प्रवेशद्वार पटकन उघडता येईल.

महत्त्वाचं म्हणजे हे तंत्रज्ञान अत्यंत सुरक्षित असल्याचा इंटेलचा दावा आहे. 'रियलसेंस आयडी' या नावाने ओळखलं जाणारं हे तंत्रज्ञान माणसांना अगदी नीट ओळखू शकतं. यामुळे एटीएम मशीनमधून पैसे चोरी होण्याच्या घटनांना आळा घालता येणार आहे. दुसरं म्हणजे एखाद्याच्या चेहऱ्यात काही बदल झाले, म्हणजे समजा त्याने वाढवली, मिशा राखल्या, केस कापले तरी हे तंत्रज्ञान अगदी सहज ओळख पटवू शकेल.

खनिजांची

हे तंत्रज्ञान चेहरा,डोळे आणि तोंडावरून व्यक्तीचं ओळख पटवू शकतं. माणसाच्या चेहऱ्याची थ्रीडी प्रतिमा तयार होऊन ती तंत्रज्ञानाच्या डेटाबेसमध्ये साठवली जाते. यावरून हे तंत्रज्ञान व्यक्तीला ओळखू शकतं.



# महत्त्वाचे खनिज: फॉस्फेट

फॉस्फेट हे एक महत्त्वाचे खनिज आहे. ते मुख्यतः फॉस्फरस या घटकाचे संयुग असते. हा घटक वनस्पतींच्या वाढीसाठी खूप आवश्यक असतो. फॉस्फेट साधारणपणे पांढऱ्या, करड्या किंवा तपकिरी रंगाच्या दगडांच्या रूपात आढळते. फॉस्फेट जमिनीच्या आत खडकांच्या थरांमध्ये सापडते. हे खनिज बहुतेक वेळा समुद्रातील जुने जीव, मासे आणि त्यांच्या हाडांच्या अवशेषांपासून लाखो वर्षांमध्ये तयार झालेले असते. हे अवशेष जमिनीत साठत गेले आणि त्यावर इतर थर जमा झाले की हळूहळू फॉस्फेट तयार होते.




भारतात राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि झारखंड या राज्यांत फॉस्फेटचे साठे आढळतात. जगात मोरोक्को, चीन आणि अमेरिका या देशांमध्ये फॉस्फेट मोठ्या प्रमाणात मिळते. खाणीतून हे खनिज दगडांच्या रूपात काढले जाते. काही वेळा ते जमिनीच्या वरच्या थरात असल्यामुळे उघड्या खाणींमधून सहज मिळते. फॉस्फेट काढल्यानंतर सुरुवातीला दगड फोडून लहान केले जातात. त्यानंतर त्यातील माती, वाळू आणि इतर अशुद्ध घटक वेगळे केले जातात. काही ठिकाणी ते धुऊन स्वच्छ केले जाते. पुढे त्याची बारीक पूड तयार केली जाते. काही उद्योगांमध्ये त्यावर आणखी प्रक्रिया करून अधिक शुद्ध स्वरूप तयार केले जाते. फॉस्फेटचा सर्वात मोठा उपयोग शेतीत खत म्हणून होतो. पिकांना वाढण्यासाठी आवश्यक असलेले अन्नद्रव्य फॉस्फरस यातून मिळते. त्यामुळे पिकांची मुळे मजबूत होतात, वाढ चांगली होते आणि उत्पादन वाढते. म्हणूनच शेतकरी फॉस्फेटयुक्त खतांचा वापर करतात.

खनिजांची माहिती

फॉस्फेट हा आपल्या शरीरासाठी आवश्यक घटक आहे. आपल्या हाडे आणि दात मजबूत ठेवण्यासाठी तो महत्त्वाचा असतो. शरीरातील उर्जा तयार होण्यासाठीही त्याची मदत होते.

# रहस्य फेसाळणाऱ्या शीतपेयांचं

टीव्हीवर शीतपेयांच्या विविध जाहिराती पहायला मिळतात. तुम्हीही अधूनमधून शीतपेय पित असाल. कार्बनयुक्त शीतपेयं ग्लासमध्ये ओतल्यानंतर फसफसतात. बाटली उघडल्यानंतरही पटकन फेस बाहेर येतो. हे का बरं होत असावं? यामागचं विज्ञान काय असावं? असे प्रश्न तुमच्या मनात येत असतील.



शीतपेयांवर बुडबुडे येण्यामागचं कारण म्हणजे त्यातला कार्बन डाय ऑक्साइड हा वायू! ही पेयं कार्बनयुक्त असतात. म्हणजेच त्यात कार्बन डाय ऑक्साइड हा वायू विरघळवलेला असतो. या वायूमुळे पेयाला विशिष्ट चव येते. पेयं आकर्षक दिसतंच त्याचप्रमाणे कार्बनमुळे ते लवकर खराब होत नाही. यात बॅक्टेरियांची वाढ होत नाही.

अत्यंत उच्च दाबाखाली कार्बन डाय ऑक्साइड द्रव पदार्थामध्ये विरघळवला जातो. शीतपेयाची बाटली उघडल्यानंतर हा दाब नाहीसा होतो आणि कार्बन एकदम वर येतो. यामुळे पेयं फसफसतं आणि त्यावर असंख्य बुडबुडे तयार होतात. फसफसण्याचा आवाजही येतो. बाटली उघडण्याआधी ती हलवली तर काय बरं होतं? हलवल्यानंतर बाटली उघडली नसल्याने झाकण आणि शीतपेयादरम्यान असणाऱ्या जागेत हा वायू साठून राहतो. यामुळे दाब तयार होतो. झाकण उघडल्यावर मात्र कार्बन एकदम बाहेर येतो आणि पेयं आजूबाजूला पसरतं. कार्बन डाय ऑक्साइड हा रंगविरहीत, गंधविरहीत वायू आहे. तो ज्वलनास मदत करत नाही. द्रवपदार्थात कार्बन विरघळवण्यच्या प्रक्रियेला 'कार्बोनेशन' असं म्हटलं जातं.

नॉलेज अपडेट

# क्षेत्र मानवाधिकाराचं

मानवाधिकार ही सुद्धा एक शाखा आहे. लोकांसाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा असेल तर या क्षेत्रात कारकिर्द घडवता येईल. विविध स्तरातल्या लोकांना अधिकार नाकारले जातात. मानवाधिकार कायद्याचा अभ्यास करून तुम्ही अशा लोकांसाठी झगडू शकता. या क्षेत्रात अनेक संस्था, संघटना कार्यरत आहेत. मानवाधिकाराच्या क्षेत्रात काम करण्यासाठी काही मुद्दे महत्त्वाचे ठरतात.

देशभरातल्या विविध विद्यापीठांमध्ये तसंच महाविद्यालयांमध्ये मानवाधिकारांशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जातात. बारावीनंतर या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. यात प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पदवीनंतर मास्टर्स करता येईल. पदवीनंतरही पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येईल.




कोण होणार?

सामाजिक न्याय, लहान मुलांवरील अन्याय-अत्याचार, महिलांवरील अत्याचार, लिंगभेद आदी विविध क्षेत्रांमधल्या मानवाधिकारांसाठी तुम्ही लढू शकता. आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक संधी मिळू शकतात. राष्ट्रीय तसंच राज्याचा मानवाधिकार आयोग या प्रश्नांबाबत जागरूक असतो. या आयोगात तुम्ही नोकरी करू शकता. 'एशियन सेंटर फॉर ह्युमन राईट्स'पासून संयुक्त राष्ट्रांसारख्या संघटनेतही तुम्हाला संधी मिळू शकते. या क्षेत्रात काम केल्यानंतर तुमचा आत्मविश्वास वाढू शकतो. अर्थातच इथे काम करण्यासाठी संवादकौशल्य गरजेचं असतं. विविध विषयांचं ज्ञानही गरजेचं ठरतं.

# त्वचा असावी निरोगी

त्वचा हा एक अवयव आहे हे तुम्हाला माहीत आहे का? या त्वचेमुळे शरीरातल्या आतल्या भागाचं संरक्षण होतं. त्वचा हा शरीराचा अत्यंत महत्त्वाचा अवयव... पण आपण त्वचेकडे साफ दुर्लक्ष करतो. त्वचारोग झाल्यानंतरच डॉक्टरांकडे जाण्याचे कष्ट घेतो. एकप्रकारे त्वचेच्या आरोग्याला आपण गृहीत धरतो. त्वचेची काळजी घ्यायला हवी, हे आपल्याला माहीतच नसतं. खरंतर त्वचा अत्यंत महत्त्वाची कामं करत असते. शरीराचं रक्षण करण्याचं काम ती करते. त्वचेमुळे जंतू शरीरात लवकर प्रवेश करू शकत नाहीत आणि तुम्ही आजारी पडत नाही. म्हणूनच लहान वयापासूनच त्वचेची काळजी घ्यायला हवी. यामुळे चेहऱ्यावर मुरूमं येणं, सुरकुत्या पडणं, खाज येणं अशा संभाव्य समस्या टाळता येऊ शकतात.



स्किन केअर

त्वचेची काळजी घेताना ती स्वच्छ ठेवायला हवी. हात स्वच्छ हवेत. घाणेरड्या, बरबटलेल्या हातांच्या स्पर्शामुळे त्वचेला जंतूसंसर्ग संभवतो. म्हणूनच कोमट पाण्याने हात धुवा. सौम्य साबणाचा वापर करा. हाताचा पंजा, बोटांच्या मधला भाग, मनगट नीट स्वच्छ करा. टॉवेलने हात कोरडे करा. आंघोळ करताना कोमट पाणी वापरा. गरम पाण्यामुळे त्वचा कोरडी पडू शकते. रसायनयुक्त साबण वापरू नका. चेहऱ्याच्या त्वचेची विशेष काळजी घ्या. त्वचा तेलकट असेल तर दिवसातून दोन ते तीन वेळा चेहरा धुवा. त्वचेची काळजी घेणारी बरीच क्रीम्स बाजारात उपलब्ध आहेत. पण ती सगळीच तुम्हा छोट्यांसाठी नसतात हे लक्षात घ्या. लहान वयातच त्वचेची काळजी घेतली तर पुढे त्रास होणार नाही.

# आर्टेमिस २ मिशन

चंद्राची प्रदक्षिणा करण्याच्या १० दिवसांच्या मोहिमेसाठी १ एप्रिल २०२६ या दिवशी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरमधून चार अंतराळवीरांनी उड्डाण केले. नासाच्या शक्तिशाली स्पेस लाँच सिस्टिम रॉकेटने 'ओरायन' अंतराळयानाला घेऊन अवकाशात झेप घेतली. या मोहिमेत चार शूर अंतराळवीरांचा समावेश असून यामध्ये नासाचे रीड वाईजमन, व्हिक्टर ग्लोव्हर, क्रिस्टिना कोच आणि कॅनडियन स्पेस एजन्सीचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट चंद्राभोवती फेरी मारून सुरक्षितपणे पृथ्वीवर परतणे हे आहे. सुमारे १० दिवसांच्या या चाचणी मोहिमेत 'ओरायन' अंतराळयानाची क्षमता तपासली जाणार आहे. प्रक्षेपणाच्या साधारण ४९ मिनिटांनंतर रॉकेटच्या वरच्या टप्प्याने ओरायन अंतराळयानाला पृथ्वीभोवतीच्या लंबवर्तुळाकार कक्षेत नेले. त्यानंतर या यानाने पृथ्वीपासून सुमारे ४६,००० मैल दूर असलेल्या उच्च कक्षेत प्रवेश केला. या प्रवासादरम्यान अंतराळवीरांनी यानातील 'लाईफ सपोर्ट सिस्टीम' आणि हाताळणी क्षमतांची सविस्तर चाचणी घेतली. विशेष म्हणजे या मोहिमेसोबत अर्जेंटिना, जर्मनी, सौदी अरेबिया आणि दक्षिण कोरियाचे चार छोटे उपग्रहदेखील संशोधनासाठी सोडले गेले. सोमवार, ६ एप्रिल रोजी हे यान चंद्राच्या जवळून गेले, तेव्हा अंतराळवीरांनी चंद्राच्या पृष्ठभागाचे निरीक्षण केले. विशेषतः चंद्राच्या मानवाने अजून न पाहिलेल्या बाजूचे फोटो आणि निरीक्षणे त्यांनी नोंदवली. या निरीक्षणांचा उपयोग भविष्यातील 'मून बेस' आणि 'मंगळ मोहिमेसाठी' केला जाणार आहे. नासाचे प्रशासक जॅरेड आयझॅकमन यांच्या मते, 'आर्टेमिस २' ही केवळ एक मोहीम नसून चंद्रावर मानवाचा कायमस्वरूपी मुक्काम ठोकण्यासाठी पायाभरणी आहे. चंद्राची प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर हे अंतराळवीर पॅसिफिक महासागरात सुरक्षितपणे उतरले.



रंजक विज्ञान


# काजवा प्रकाश कसा देतो?

काजवा प्रकाश देतो तो एक विशेष रासायनिक प्रक्रियेमुळे. या प्रक्रियेला बायोल्युमिनेसन्स असे म्हणतात. काजव्याच्या शरीराच्या शेवटच्या भागात लुसिफेरिन नावाचे रसायन असते. त्यावर लुसिफेरेज नावाचे एन्झाइम आणि ऑक्सिजन यांचा परिणाम झाला की प्रकाश तयार होतो. या प्रक्रियेत उष्णता जवळजवळ निर्माण होत नाही. त्यामुळे काजव्याच्या प्रकाशाला थंड प्रकाश म्हणतात. काजवा आपल्या इच्छेनुसार प्रकाश सुरू किंवा बंद करू शकतो. काजव्याला सिग्नल द्यायचा असतो, विशेषतः जोडीदाराला आकर्षित करायचे असते तेव्हाच तो प्रकाश देतो. प्रत्येक प्रकारच्या काजव्याचा प्रकाश चमकण्याचा वेगळा पॅटर्न असतो. थोडक्यात काजवा स्वतःच्या शरीरात चालणाऱ्या रासायनिक प्रक्रियेमुळे सुंदर प्रकाश निर्माण करतो.



# हिऱ्यांचा पाऊस

विज्ञान सांगते, की खरोखरच काही ग्रहांवर हिऱ्यांचा पाऊस पडू शकतो. हा पाऊस नेपच्यून आणि युरेनस या ग्रहांवर होतो. या ग्रहांवरील वातावरणात कार्बन भरपूर असतो. तिथे प्रचंड दाब आणि अतिशय कमी तापमान असते. अशा परिस्थितीत कार्बनचे रूपांतर हिऱ्यांमध्ये होऊ शकते. हे छोटे हिरे पावसासारखे खाली पडतात. म्हणून याला हिऱ्यांचा पाऊस म्हणतात. याची कल्पना सर्वप्रथम १९८०-९० च्या दशकात वैज्ञानिकांनी मांडली. त्यांनी व्हॉयेजर २ या नासाच्या अंतराळमोहिमेतून मिळालेल्या युरेनस आणि नेपच्यूनच्या माहितीचा अभ्यास केला. त्या डेटामधून तिथे प्रचंड दाब आणि कार्बन असल्याचे समजले. नंतर २०१७ साली, शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत असे वातावरण तयार करून हे सिद्ध केले. नेपच्यून आणि युरेनसवर निसर्ग इतका वेगळा आहे की तिथे पाण्याऐवजी हिऱ्यांचा पाऊस पडू शकतो.



# विनाझोप प्राणी जगतात?

खरे पाहिले तर बहुतेक सर्व प्राण्यांना विश्रांती लागतेच. मात्र काही प्राणी आपल्यासारखी ठराविक झोप घेत नाहीत. डॉल्फिन आणि व्हेल पूर्णपणे झोपत नाहीत. त्यांच्या मेंदूचा एक भाग झोपतो. तर दुसरा भाग जागा असतो. त्यामुळे ते पाण्यावर येऊन श्वास घेऊ शकतात. तसेच काही मासे आणि कीटक सतत सक्रिय दिसतात. पण त्यांना अगदी क्षणभरची विश्रांती पुरते. काही स्थलांतर करणारे पक्षी खूप लांब उड्डाण करताना उडतानाच थोडी झोप घेतात. थोडक्यात, कोणताही प्राणी पूर्णपणे झोपेशिवाय जगत नाही, पण त्यांची झोपण्याची पद्धत वेगळी असते. त्यामुळे कायम पूर्णपणे जागा असणारा प्राणी आज तरी अस्तित्वात नाही.



गंमत ग्यान

# चॅनेल्सवर कार्यक्रम कसे दिसतात?

आपण टीव्हीचे चॅनेल बदलतो तेव्हा प्रत्येक चॅनेलवर वेगळा कार्यक्रम दिसतो. वेगवेगळे चॅनेल आणि रेडिओ स्टेशन वेगवेगळे कार्यक्रम कसे दाखवतात किंवा ऐकवतात, यामागे फ्रिक्वेन्सी हा महत्त्वाचा भाग असतो. आकाशात एकाच वेळी अनेक अदृश्य लहरी फिरत असतात, पण प्रत्येक लहरीची ओळख वेगळी असते. प्रत्येक टीव्ही चॅनेल किंवा रेडिओ स्टेशन आपला सिग्नल एका ठराविक फ्रिक्वेन्सीवर पाठवते. तुमचा टीव्ही किंवा रेडिओ म्हणजे एक रिसीव्हर असतो. आपण चॅनेल बदलतो किंवा रेडिओ स्टेशन बदलतो, तेव्हा तुमचे उपकरण त्या विशिष्ट फ्रिक्वेन्सीवर ट्यून होते. त्यामुळे त्या चॅनेलचा किंवा स्टेशनचा सिग्नल पकडला जातो आणि तुम्हाला वेगळा कार्यक्रम दिसतो किंवा वेगळी गाणी ऐकू येतात.



दोस्त हे मस्त

## अनोखा ग्रीन इग्वाना


या पृथ्वीवर असंख्य सजीव आहेत. असाच एक सजीव म्हणजे ग्रीन इग्वाना. हा पालीसारखा सरपटणारा प्राणी असून आकाराने बराच मोठा असतो. तो प्रामुख्याने दक्षिण अमेरिकेत आढळतो. मध्य आणि उत्तर अमेरिकेतही त्याचं वास्तव्य आढळतं. बरेचदा तो घनदाट जंगलांमध्ये आढळतो. हे जीव झाडावर चढून बसतात. त्यांची लांबी ६ फुटांपर्यंत असू शकते. हा प्राणी हिरव्यासोबतच निळा, केशरी, जांभळा या रंगांमध्येही आढळतो.



खादाडी

## बेक्ड ॲपल आईस्क्रीम


तुम्हाला आईसक्रीम आवडत असेलच. आता हे आईसक्रीम नुसतं खाण्यापेक्षा सफरचंदासोबत खाल्लं तर जास्त मजा येईल. नाही का... यासाठी सफरचंद घ्या. बेदाणे, व्हॅनिला आईस्क्रीम आणि थोडी दालचिनी पूड घ्या. आपल्याला सफरचंदाच्या मधला भाग काढून टाकायचा आहे. यानंतर सफरचंदाचे दोन तुकडे करा. त्यावर बेदाणे ठेवा. आता हे सफरचंद ओव्हनमध्ये भाजायचं आहे. १५ मिनिटांसाठी भाजून घ्या. ओव्हन नसेल तर तव्यावर भाजून घ्या. आता या भाजलेल्या सफरचंदावर थोडी दालचिनी भुरभुरा. त्यावर आईस्क्रीमचा गोळा ठेवून खा.



लाईफस्टाईल

## हेडफोन्स वापरताय?

स्मार्टफोनसोबत हेडफोन्सही असतात. हे हेडफोन्स लावून तुम्ही गाणी ऐकता. पण याचे धोकेही असतात बरं का! मोठ्या आवाजात गाणी ऐकल्याने कानांसोबत मेंदूवरही परिणाम होतो. सतत गाणी ऐकल्याने एकाग्रता कमी होते. इतरांचे हेडफोन्स वापरल्याने जंतूसंसर्ग होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हेडफोन्स वापरताना काळजी घ्या.



योगा टाईम

## रक्तशुद्धीसाठी निर्मल मुद्रा

संपूर्ण शरीरात रक्त वाहत असतं. प्रत्येक अवयवाला रक्तपुरवठा होणं आवश्यक असतं. रक्त अशुद्ध असेल तर त्रास होऊ शकतो. निर्मल मुद्रा या आसनामुळे रक्त शुद्ध होण्यास मदत होते. नर्मल मुद्रा करण्यासाठी पद्मासनात बसा. अंगठ्याचा वरचा भाग पहिल्या आणि मधल्या बोटाच्या मध्यभागी ठेवा. इतर दोन बोटं सरळ ठेवा. आता हळूहळू श्वास घ्या आणि सोडा. साधारण पंधरा मिनिटं हे आसन करा.



# घरच्या मैदानावर मुंबई पलटन फेल

## ■ 'यलो आर्मी'कडून सर्वात मोठा पराभव ■ मुंबई इंडियन्सची परिस्थिती बिकट

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सची परिस्थिती आता बिकट होत चालली आहे. मागील सामन्यात या हंगामातील आपला दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरलेल्या मुंबई इंडियन्सला, हंगामातील ३३ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सकडून दारुण पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करताना, संजू सॅमसनच्या शतकाच्या जोरावर सीएसकेन २०७ धावा फलकावर लावल्या. प्रत्युत्तरात, मुंबईचा संघ १९ षटकांत केवळ १०४ धावाच करु शकला आणि १०३ धावांनी सामना गमावला. ७ सामन्यांमधील मुंबईचा हा ५ वा पराभव आहे. तर सीएसके संघानं या हंगामातील आपला तिसरा सामना जिंकला आहे. विशेष म्हणजे आयपीएलच्या इतिहासात हा मुंबईचा धावांच्या बाबतीत सर्वात मोठा पराभव ठरला.





सीएसकेसाठी संजू सॅमसन आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड यांनी डावाची सुरुवात केली. गायकवाड १४ चेंडूंमध्ये २२ धावांवर बाद झाला. त्यानंतर संजू सॅमसनने सूत्रं हाती घेतली आणि शेवटपर्यंत नाबाद राहिला. संजूनं २६ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने ५४ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले. त्याची १०१ धावांची खेळी ५४ चेंडूंमध्ये पूर्ण झाली, ज्यात १० चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. मुंबईकडून गझनफरने चार षटकांत २५ धावा देऊन दोन बळी घेतले, तर अश्विनी कुमारनं चार षटकांत ३७ धावा देऊन दोन बळी घेतले. बुमराह आणि सँटनर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात खराब झाली. अवघ्या २.३ षटकांत आपले तीन महत्त्वाचे फलंदाज गमावले. सलामीवीर डी-कॉक १० चेंडूंत सात धावा करुन बाद झाला, तर दानिश मलेवार शून्यावर परतला. नमंधरही शून्यावर बाद झाला. त्यानंतर सूर्यकुमारने ३० चेंडूंत ३६ धावा केल्या, तर तिलकने २९ चेंडूंत ३७ धावा केल्या. कर्णधार पांड्याने दोन चेंडूंत एक धाव काढली. मुंबईचा संघ १९ षटकांत १०४ धावांवर सर्वबाद झाला. सीएसकेकडून अकील हुसेनने उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्यानं ४ षटकांत १७ धावा देऊन ४ बळी घेतले, तर नूर अहमदनंही २ बळी मिळवले.

### मुंबईचे गोलंदाज फ्लॉप

मुंबईच्या गोलंदाजांनी सुरुवातीला काही प्रमाणात अंकुश ठेवला होता. गझनफरने ४ षटकांत २५ धावा देत २ महत्त्वाचे बळी टिपले. अनुभवी जसप्रीत बुमराहने भेदक मारा करत १७ व्या षटकात केवळ २ धावा दिल्या आणि कार्तिक शर्माला बाद केले. अश्विनी कुमारने २ विकेट घेतल्या. तर मिचेल सँटनरला १ विकेट मिळाली. पण, हार्दिक पांड्या आणि क्रिश भगत यांची गोलंदाजी महागडी ठरली.

## बीपीसीएलला नमवत 'आयएसपीएल' अजिंक्य

**| मुंबई | प्रतिनिधी |**

चार दिवसांपूर्वीच्या पराभवाची जखम ताजी असतानाच आयएसपीएलने मैदानात उतरून अक्षरशः सुडाची ज्वाला पेटवली आणि बीपीसीएलचा हिशेब चुकता करत आमदार चषकावर आपले नाव कोरले. क्रीडाप्रेमी आ. सुनील राऊत यांच्या पुढाकाराने आयोजित व्यावसायिक गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या अंतिम लढतीत त्यांनी बीपीसीएलला थरारक पाच-पाच चढायांच्या संघर्षात ९-४ (४६-४१) असे नमवून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कबड्डीच्या महासंग्रामाचा शेवट अक्षरशः हृदयाचे ठोके वाढवणारा ठरला. हा सामना म्हणजे जणू एखाद्या अक्शनपटाचा क्लायमॅक्ससारखा रंगला.



सामन्याच्या सुरुवातीलाच नीरज मिसाळ आणि राकेश खटकर यांनी सुसाट खेळ करत आयएसपीएलला १०-३ अशी झंझावाती आघाडी मिळवून दिली. किशोर जाट आणि वैभव रबाडे यांच्या अचूक पकडींनी बीपीसीएलला अक्षरशः जखडून टाकले आणि आयएसपीएलने मध्यंतराला २१-१३ अशी पकड मजबूत केली. उत्तरार्धात मात्र मिलन दहियाने एकहाती झुंज देत बीपीसीएलला परत सामन्यात आणले. त्याच्या वेगवान आणि धडाकेबाज चढायांनी सामना रंगत गेला. १९-३३ अशा पिछाडीवरून बीपीसीएलने शेवटच्या क्षणी जबरदस्त कमबॅक करत ३७-३७ अशी बरोबरी साधली आणि इथेच सामन्याने खरया अर्थाने नाट्यमय वळण घेतले. या थरारक लढतीत आयएसपीएलचा नीरज मिसाळ चमकला. त्याच्या तुफानी चढायांमुळे आयएसपीएल विजेता ठरलाच, पण त्याने पूर्ण स्पर्धेत आपल्या चढायांचा हल्ला प्रतिस्पर्धी संघावर केला, म्हणून त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा किताब मिळाला.

## पाकिस्तानचे सॅफमधून पलायन

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दक्षिण आशियातील प्रतिष्ठेच्या सॅफ महिला फुटबॉल चॅम्पियनशिपपूर्वीच पाकिस्तानने माघार घेत पुन्हा एकदा खेळावर राजकारणाची सावली टाकली आहे. मैदानात लढण्याऐवजी राजकीय कारणांचा आधार घेत पाकिस्तान फुटबॉल महासंघाने स्पर्धेतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला आणि क्रीडाजगतात अक्षरशः संतापाची लाट उसळली. येत्या २५ मे ते ६ जूनदरम्यान गोव्यातील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे रंगणाऱ्या या स्पर्धेकडे संपूर्ण दक्षिण आशियाचे लक्ष लागलेले असताना पाकिस्तानच्या या निर्णयाने स्पर्धे पूर्वीच वादाची ठिणगी पडली आहे. भारत-पाकिस्तान संबंध



तणावपूर्ण असल्याचे कारण पुढे करत पाकिस्तानने माघार घेतली, पण हा निर्णय म्हणजे खेळाडूंच्या स्वप्नांवर घाला असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. पाकिस्तानच्या माघारीनंतर स्पर्धेचा रंग कमी होण्याऐवजी आता सहा संघांमध्ये जोरदार लढत रंगणार आहे. भारत, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, भूतान आणि मालदीव हे संघ मैदान गाजवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

## सचिनवर शुभेच्छांचा वर्षाव

**| मुंबई | प्रतिनिधी |**

'क्रिकेटचा देव' सचिन तेंडुलकर यांना आज कोणत्याच ओळखीची गरज नाही. मैदानावर आल्यानंतर आपल्या दमदार खेळाच्या जोरावर सचिन यांनी क्रिकेटप्रेमींच्या हृदयावर राज्य केलं. आज सचिन क्रिकेट खेळत नसले तरी, अनेक नव्या क्रिकेटपटूंसाठी प्रेरणा स्थान आहेत. शुक्रवारी (दि. २४) एप्रिल रोजी सचिन तेंडुलकर याचा वाढदिवस असल्यामुळे असंख्य चाहते, त्यांच्या घराजवळ जमले होते.

या खासप्रसंगी सचिन यांनी पत्नी अंजली यांच्यासोबत सर्व चाहत्यांची भेट घेतली. पण एका चिमुकली सोबत सचिन आणि अंजली यांची भेट खास ठरली. त्यांचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यावर असंख्य नेटकऱ्यांनी लाईक्स आणि कमेंटचा वर्षाव केला आहे.




## आंतर-विद्यापीठ खो-खो स्पर्धेत
# मराठवाडा विद्यापीठाचे यश

**| मुंबई | प्रतिनिधी |**

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या जुहू कॅम्पसमध्ये आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ खो-खो स्पर्धा (महिला) २०२५-२६ चा अंतिम सामना उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने विजेतेपद पटकावले, तर एसएनडीटी महिला विद्यापीठाने उपविजेतेपद मिळवले. या स्पर्धेत तृतीय क्रमांक मुंबई विद्यापीठाने, तर चतुर्थ क्रमांक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पटकावला.



देशभरातील विविध विद्यापीठांच्या संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली होती. अंतिम सामना प्रेक्षकांसाठी मेजवानी ठरला. सामन्याच्या सुरुवातीला एसएनडीटी विद्यापीठाने ४ गुण मिळवले. परंतु मराठवाडा विद्यापीठाने ७ गुण मिळवत ३ गुणांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. दुसऱ्या डावात एसएनडीटीने चिवट झुंज देत ३ गुण मिळवले, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने संयमित खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदाला गवसणी घातली. विजेत्या संघाच्या पूजा फरगडे हिने ५ गडी बाद करत विजयात सिंहाचा वाटा उचलला, तर अश्विनी शिंदे हिला तिच्या अष्टपैलू कामगिरीसाठी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. एसएनडीटी विद्यापीठाकडून अश्विनी शिंदे, दिव्या सरिता, विद्या मीरके यांनी उत्कृष्ट खेळ करत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पारितोषिक वितरण सोहळा कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला होता.

## क्रिकेटचे ऑलिंपिकमध्ये 'महापुनरागमन'

**| लॉस एंजेलिस | वृत्तसंस्था |**

ऑलिंपिकमध्ये तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेट या खेळाचा समावेश करण्यात येणार आहे. २०२८ मध्ये लॉस एंजेलिस येथे होत असलेल्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेट या खेळाचा समावेश करण्यात आला आहे.कॅलिफोर्निया येथील पोमोना येथे क्रिकेट स्टेडियमची उभारणी करण्यात येत आहे.




याआधी १९०० मध्ये फ्रान्स येथे झालेल्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेट या खेळाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी यजमान फ्रान्स व ग्रेटब्रिटन या दोनच खेळांचा समावेश करण्यात आला होता. आता तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेट या खेळाला स्थान देण्यात येणार आहे. पोमोना हे मैदान लॉस एंजेलिस नाइट रायडर्स संघाचे होम ग्राऊंडही आहे.

आयसीसीचे विशेष कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता म्हणाले, की आज आपण फक्त क्रिकेट मैदानाचे भूमिपूजन करत नाही, तर १२८ वर्षांपासून अपूर्ण राहिलेल्या वचनाची पूर्तता करत आहोत. क्रिकेट हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे आणि २.५ अब्जांहून अधिक लोक हा खेळ आवडीने पाहतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने क्रिकेटचा समावेश करणे म्हणजे या खेळाच्या लोकप्रियतेची दखल घेणे आहे. आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनीही या निर्णयाचे स्वागत केले.



## झोरास्ट्रियन संघाचा ऐतिहासिक विजय

**| पुणे | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र क्रिकेट संघटना (एमसीए) आयोजित वरिष्ठ महिला गट ङ्गएमसीएफ निमंत्रित एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद झोरास्ट्रियन संघाने प्रथमच पटकाविले. गहुंज्यातील एमसीए मैदानावर गुरूवारी झालेल्या या अंतिम लढतीत संचिता सापटे व कर्णधार ईशा पठारेच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर झोरास्ट्रियन संघाने सांगलीवर १३६ धावांनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना झोरास्ट्रियन संघाने २१५ धावा केल्या. त्यात सोनल पाटील, तन्वी गुप्तेचा मोलाचा वाटा होता. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ९१ चेंडूंत ७५ धावांची भागीदारी केली. सोनल पाटीलने ५८ चेंडूंत सात चौकारांसह ४५ धावांची, तर तन्वी गुप्तेने ६७ चेंडूंत चार चौकारांसह ४३ धावांची खेळी केली. त्यानंतर तेजल हसबनिसने ४६ चेंडूंत पाच चौकारांसह ४१ धावांचे योगदान दिले.

प्रत्युत्तर देताना सांगलीचा डाव ७९ धावांतच आटोपला. सांगलीकडून सह्याद्री कदम आणि संस्कृती राठोड या दोघींनाच दोन आकडी धावसंख्या नोंदवता आली. संचिता सापटेने चार, ईशा पठारेने तीन तर सायली काळेने दोन गडी बाद केले.

**संक्षिप्त धावफलक :** झोरास्ट्रियन संघ - (४६.३ षटकांत) सर्वबाद २१५ (सोनल पाटील ४५, तन्वी गुप्ते ४३, तेजल हसबनिस ४१, श्रुती नाबाद १९, अवसरे १७, सरस्वती कोकरे २-२२, क्रिशी ठक्कर २-२३, भक्ती मिरजकर २-३९, भावी पुनमिया २-४६) विजयी विरुद्ध सांगली - (२४.५ षटकांत) सर्व बाद ७९ (सह्याद्री ३३, संस्कृती १६, संचिता सापटे ४-११, ईशा पठारे ३-२४.

## निवडक





### थॉमस उबेर करंडकासाठी भारत सज्ज

**हॉर्सेन :** भारतीय बॅडमिंटनपटूंचा थरार सुरु होत असलेल्या थॉमस व उबेर बॅडमिंटन करंडकामध्ये कस लागेल. थॉमस करंडक हा पुरुष विभागात, तर उबेर करंडक हा महिला विभागात खेळवला जातो. चार वर्षांपूर्वी अर्थातच २०२२ मध्ये बँकॉक येथे झालेल्या थॉमस करंडकात भारतीय पुरुष संघाने जेतेपदावर मोहर उमटवत इतिहास रचला होता. २०२४ मध्ये भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाला चीनकडून हार पत्करावी लागल्यामुळे त्यांचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच आव्हान संपुष्टात आले होते. यंदा भारतीय पुरुष संघाकडून पुन्हा एकदा अपेक्षा बाळगल्या आहेत. लक्ष्य सेन, आयुष शेट्टी हे एकेरीतील खेळाडू फॉर्ममध्ये आहेत. तसेच सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी ही दुहेरीतील जोडीही सज्ज झाली आहे. थॉमस आणि उबेर करंडक बॅडमिंटन स्पर्धेसाठी भारताचे संघ जाहीर झाला असून महिला संघासमोर खडतर आव्हान असणार आहे. साखळी फेरीमध्ये भारतीय महिला संघाला युक्रेन व चीन यांचा सामना करावयाचा आहे.

### बोरिवलीत रंगणार क्रिकेटचा जल्लोष

**मुंबई :** महिला क्रीडापटूंना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने महिला क्रिकेट स्पर्धाफ जाहीर करण्यात आली आहे. बोरिवली (प.), गोराई-३ येथील फोर्स टर्फ मैदानावर ही स्पर्धा रंगणार असून, मुंबईतील महिला क्रिकेटपटूंमध्ये याबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही स्पर्धा ओपन कॅटेगरी अंडर आर्म टेनिस बॉल स्वरूपात खेळवण्यात येणार आहे. एकूण २० संघांना सहभागाची संधी मिळणार आहे. स्पर्धेची रचना गट पद्धतीने करण्यात आली आहे. प्रत्येक संघाला किमान चार सामने खेळण्याची हमी आयोजकांनी दिली आहे. सामन्यांचे स्वरूप पाच षटकांचे असणार असून, प्रत्येक गोलंदाजाला जास्तीत जास्त दोन षटके टाकण्याची मर्यादा असेल. सहभागी खेळाडूंना दिवसभरासाठी नाश्ता, दुपारचे जेवण आणि हाय-टी देण्यात येणार आहे, ज्यामुळे स्पर्धेचा अनुभव अधिक सुखद होणार आहे. यासाठी असोसिएट स्पॉन्सर म्हणून रिलायन्स डिजिटल आणि सेनसोडंटचे विशेष सहकार्य लाभले आहे. विजेत्या संघाला रु.५० हजार व ट्रॉफी, तर उपविजेत्या संघाला रु.२५ हजार व ट्रॉफी देण्यात येणार आहे. तसेच सामनावीर, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना प्रत्येकी रु. पाच हजार व ट्रॉफी, तर सीरिजमधील सर्वोत्तम खेळाडूला रु.१० हजार व ट्रॉफी देऊन गौरवण्यात येणार आहे.

### पाकिस्तान सुपर लीगचा फज्जा

**नवी दिल्ली :** पाकिस्तान सुपर लीग २०२६ मध्ये रोज त्यांचा फज्जा उडताना दिसत आहे. कधी खेळाडू भांडताना दिसत आहेत, कधी फ्रँचायझीने दिलेल्या जर्सीचा रंग उडून चेंडू गुलाबी होत आहे, तर कधी गचाळ क्षेत्ररक्षण पाहायला मिळत आहे. आता एक नवीन प्रकरण समोर आले आहे, आणि यावेळी पाकिस्तानींना येडे गबाळेच म्हणावं लागेल. लाहोर कलंदर्स विरुद्ध कराची किंग्स, सामन्याच्या नाणेफेकीच्या वेळेस लाहोर कलंदर्स व कराची किंग्स यांच्यात टॉसच्या वेळी अजब घटना घडली. यावेळी कराची व लाहोर यांचे मॅस्कॉट मैदानावर होते आणि टॉस होण्यापूर्वी दोघांमध्ये मैत्रीपूर्ण भांडण दाखवण्यात आले. हा सर्व प्रकार पाहून बाजूलाच उभ्या असलेल्या डेव्हिड वॉर्नरला ही काय वेड्यांची जत्रा सुरू आहे, असे वाटले. सामन्यात लाहोरने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद १९९ धावा केल्या. फखर जमानने ४१ चेंडूंत ५ चौकार व ३ षटकारांसह ६१ धावांची खेळी केली. वॉर्नरने भन्नाट थ्रो करून मोहम्मद फारूकला ( १८) रन आऊट केले.

### बुद्धिबळमध्ये आर्यन धुळपचे यश

**रत्नागिरी :** रत्नागिरी येथील आर्यन धुळप या बुद्धिबळपटूने मागील काही कालावधीत विविध स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण यश प्राप्त केले आहे. कुडाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या खासदार चषक खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत आर्यनने सात फेऱ्यांमध्ये पाच गुणांसह खुल्या गटात पारितोषिक प्राप्त केले. तसेच सांगली येथे पार पडलेल्या खुल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातून सर्वोत्तम द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले. त्या आधी रत्नागिरीत झालेल्या रामचंद्र सप्रे स्मृती राज्य अमॅच्युअर अजिंक्यपद क्लासिकल फिडे मानांकन स्पर्धेत आर्यनने १४२९ इतके क्लासिकल फिडे गुणांकन प्राप्त केले. आर्यनने दहावीची बोर्ड परीक्षा दिली. परीक्षेच्या तयारीत असताना अभ्यास सांभाळून विविध बुद्धिबळ स्पर्धांत सहभागी होत यश प्राप्त केल्याबद्दल त्याचे विशेष कौतुक होत आहे.

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड | स्पर्धा चुरशीच्या वातावरणात पार

# रायगडच्या बाल बुद्धिबळपटूंची बाजी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने आणि लायन सुयोग पेंडसे (डिस्ट्रिक्ट युथ कोऑर्डीनेटर, लायन डिस्ट्रिक्ट ३२३१ -४) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील गोखले सभागृहात जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेतून ७ आणि ९ वर्षांखालील गटातील गुणवान खेळाडूंची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत महाड, पनवेल, अलिबाग, पेण, कर्जत आणि नवी मुंबई अशा विविध भागांतून एकूण १४६ स्पर्धकांनी आपला बुद्धीचा कस लावला. निवड चाचणीसोबतच ११, १३, १५ आणि १७ वर्षांखालील वयोगटांच्या स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या आणि चुरशीच्या वातावरणात पार पडल्या.



कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी संघटनेचा प्रवास आणि बुद्धिबळ खेळाच्या प्रसारासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी संघटनेच्या कार्यकारिणी मंडळाशी चर्चा करुन खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले. सुयोग पेंडसे यांनी स्पर्धेसाठी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

यशस्वी स्पर्धकांना एकूण ४२ चषक आणि ४० पदके प्रदान करण्यात आली. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये ७ वर्षांखालील गटात आद्वीक वर्मा, विहान वैद्य (मुले) आणि मनस्वी आडे, सानवी निमावत (मुली) यांचा समावेश आहे, जे पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. तसेच ९ वर्षांखालील गटात आद्वीक वर्मा, अंश दधीच (मुले) आणि लावण्या सिंग, अस्मी राजपूत (मुली) यांची छत्रपती संभाजीनगर येथे २ व ३ जून रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यासह ओजस पाटील, कुणाल खारतोडे, हृतवी म्हात्रे, ओवी समेल, लन जॅकोब, अनिष्का कोळी यांसारख्या खेळाडूंनीही आपापल्या गटात चमकदार कामगिरी करत पहिल्या पाच क्रमांकांत स्थान पटकावले.

स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी चंद्रशेखर पाटील, आविष्कार मरभळ, श्रेयस पाटील, सुशील गुरव, अथर्व दातार आणि सिद्धी वानखेडे यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण समारंभाला सचिव सुशील गुरव, आल्हाद पाटील, सी.एन. पाटील, पनवेल चेस असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर परांजपे आणि अंकित जोशी यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)